
शव केळकर
भाकर पेंढारकर
. ना. शेणई
हिदायत खान
अनंत मनोहर
. ग. जोग
भाऊ लिमये
कोहिमा
वादळ
अंधाराचे अ
प्रतिष्ठा
आणि कि
सात दिव
माणूस
११ एप्रिल १९७०
चाळीस पैसे

महाराष्ट्र शासन पुरस्कार

लाभलेले

आमचे एक

गौरवास्पद प्रकाशन

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

११ एप्रिल १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक पंचेचाळीसावा

संपादक : **श्री. ग. माजगावकर**

**सहाय्यक : दिलीप माजगावकर** । सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३०   दूरध्वनी : ५७३५९

किमत : ४० **पैसे**   वार्षिक वर्गणी : वीस रुपये   परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

या अंकातील शिवसैनिकाची कैफियत का छापली? असल्या अतिरेकी विचारांना प्रसिद्धी देण्यासाठी माणूसचे मुखपृष्ठ खर्च व्हावे ही खेदाची गोष्ट.

७ मार्चच्या अंकात 'ऑपरेशन फ्लड' योजनेची माहिती आहे. या योजनेविरुद्ध 'लोकप्रतिनिधी जागृतीचे' आंदोलन सुरू करता येणार नाही का? वाचक व सामान्य जनता निश्चितच अशा आंदोलनास उचलून धरील.

आधुनिक विज्ञानेश्वरीचा अभाव जाणवतो. हे सदर तसेच दादूमिया असायलाच हवेत.

प्रत्येक साप्ताहिकाचे संघटन असते. उदा. Blitz Forum, पेट्रियट युवक संघ. तसेच माणूसच्या वाचकांचे संघटन असावे असे वाटते.

नाग-विदर्भात माणूसचा खप बराच असूनही येथून पत्रे जवळजवळ नसतातच. माणूसचा वाचक संघ निर्माण झाल्यास या विभागाची मतेसुद्धा माणूस व्यक्त करू शकेल.

**मार्च ३१, १९७०**   **रवींद्र चव्हाण, नागपूर.**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

# अशी ही महानगरी!

महानगरी बृहन्मुबई हे एक अत्यंत सुरक्षित ठिकाण आहे. कलकत्ता, दिल्ली, मद्रास यासारख्या भारतातल्या मोठमोठया बकाल शहरांपेक्षा महाराष्ट्राच्या गळयातील ताईत, मोहक मुबापुरी ही कितीतरी पटीने शांत आणि सुरक्षित आहे. उपनगरातल्या तुमच्या वसाहतीतून बाहेर पडायचे, सरळ रस्त्याने रेल्वे-स्टेशनवर यायचे. खचखचून भरून येणारी एखादी गाडी मजेने पकडायची. डोळे मिटून बोरीबंदर किंवा चर्चगेटला पोचायचे. ऑफीस सुटले की त्याच रस्त्याने परत यायचे. बस्स्. मोठीच मौज आहे. कुणाच्या अध्यात मध्यात नाही. खरोखर मुबई हे एक अतिशय सुरक्षित ठिकाण आहे. त्याशिवाय का अल्ल्या देशातले लोक पोटापाण्यासाठी मुबईत येतात आणि इथेच चिकटून राहतात!

मात्र एक करायचे. तुमच्या डोळयांना बाजूनं चांगली मजबूत झापडं पाहिजेत. तुमच्या वसाहतीतून स्टेशनाकडे जाणारा रस्ता कदाचित एखाद्या झोपडपट्टीतून नेत असेल. कदाचित (क्वचितच) एखाद्या 'पॉश' वस्तीतून. पण तुम्ही आपल्या रस्त्यावरची नजर वळवता कामा नये. रस्त्यावर मोकाटपणे हिंडणाऱ्या एखाद्या तरुणाचा तुम्हाला धक्का लागला तर तुम्ही तिकडे दुर्लक्ष तरी केले पाहिजे किंवा तुमच्या या गंभीर अपराधाबद्दल आर्जवून दिलगिरी प्रदर्शित केली पाहिजे. कधी एखादी जोरदार मारामारीही चालली असेल. पण तिथे डोकावून आपली करमणूक करून घेण्याचा मोह मोठ्या संयमाने टाळला पाहिजे. (तेवढा वेळही नसेल म्हणा) स्टेशनवर पोचलात की तुमची अस्मिता वगैरे सर्व बाजूला काढून पाकिटात ठेवायला हवी. (खिशातल्या पाकिटावर एक हात कायम हवा) कुलदेवतेचे स्मरण करून थर्डमध्ये मुसंडी मारायची. दाराजवळच्या कडीवर हात लोंबकळत ठेवायचा आणि दडावर मान टाकायची. कुणाच्यातरी डोक्यावरचे तेलाचे थपथपलेले भरगच्च केस तुमच्या छातीशी लाडीकपणे लगट करू पाहतील तर कुणाचा घाणेरडा उच्छ्वास थेट तुमच्या नाकात शिरत असेल. गर्दी जर कमी असेल तर तुम्ही तुमचा एखादा पाय हलवू शकाल. थोडी जरा अधिक गर्दी असेल तर पाय हलवण्याचा किंवा खाजविण्यासाठी वगैरे पायाला हात लावायचा प्रयत्न करायचा नाही (केलात तर मार खाण्याचा संभव).

दाराजवळची अथवा खिडकीजवळची जागा कदाचित मिळालीच तर बाहेर बघायचे नाही. बाहेर बऱ्याच झोपडपट्ट्या असतात. आणि झोपडपट्टीवासियांचे अनेक विधी रुळाच्या कडेने चालू असतात. ते बघणे तुमच्या मध्यमवर्गीय सुसंस्कृत

मनाला जड जाईल. काही ठिकाणच्या झोपडपट्ट्यांजवळून गाडी जाताना भयानक दुर्गंध तुमच्या संवेदनशील घ्राणेंद्रियावर अचानक हल्ला करतील. असे प्रसंग टाळण्याचा सोपा उपाय म्हणजे नाक मुठीत धरायचे. तेव्हा बहुतेक प्रवास डोळे मिटून आणि नाक मुठीत धरून अशा ध्यानमग्न अवस्थेत उरकायचा.

फोर्टात पोचलात की बूटपॉलिशवाल्यांच्या सूचक (आणि खोचक) हाकांकडे दुर्लक्ष करीत, फूटपाथवरच्या फेरीवाल्याची जाळी चुकवीत आणि भरधाव धावणाऱ्या टॅक्स्याना शिताफीने बगल देऊन रस्ते ओलांडीत ऑफीस गांठायचे. सहा तास काम करायचे (काही तास कॅन्टीनमध्ये) आणि ऑफिस सुटल्यावर हेच नियम पाळीत घर गाठायचे. बस्स्. सुरक्षिततेचा कळस. मध्यमवर्गीयाना आणखी काय हवे हो? म्हणूनच तर आम्ही म्हणतो की मुबापुरीसारखी सुरक्षित नगरी नाही.

आता काही नतद्रष्ट लोक अपुऱ्या माहितीच्या आधारावर बेजबाबदारपणे उगाच भित्रेपणाने म्हणतात, 'मुबईत हल्ली असुरक्षितता फार झाली हो. काही कसचा नियम नाही!' या बोलण्याला काही अर्थ नाही. असुरक्षितता कोणती हो? म्हणे घरात शिरून थोड्याशा कारणासाठी खून होतात. उदाहरणार्थ गिरगावच्या कर्णिक, गोरेगावचा सिंधी व्यापारी, सांताक्रूझचे शाह कुटुंब वगैरे वगैरे. म्हणजे याची कमाल आहे. समजा तुम्ही तुमच्या घराची खिडकी उघडी ठेवली तर चोराने पाईपवरून चढून आल्यावर काय तुम्हाला अंगाई गीत गायचं? चोरी करायची, प्रसगी मारामारी करायची हा त्या लोकांचा धंदाच. मारामारीत कधीतरी एखादं माणूस मरेलही. आणि म्हणे नोकरावरही विश्वास ठेवता येत नाही — नोकर ठेवायचेच कशाला? आणि घरगडी ठेवायचाच असला तर अगोदर त्याची सी. आय. डी. कडून चौकशी करून घ्यायची हे परवाच तर मुंबईच्या माजी पोलीस कमिशनरांनी सागितलय. एवढी सोय असताना भीतीनं असुरक्षिततेचा बाऊ करायचा म्हणजे कमालच.

आणखी काय तर म्हणे स्टेशनच्या रस्त्यावर झिंगलेले लोक. कधी अंगावर पडतील किंवा तुमच्या पायात घोटाळतील याचा नियम नाही. संध्याकाळनंतर तर मुलाबाळाना आणि बायकाना फिरणे कठीण. घ्या! या लोकाना झिंगलेल्या लोकांची पंचाईत कशाला? असा कुणी माणूस रस्त्याच्या डाव्या बाजूनी आला की आपण उजव्या बाजूला जायचे आणि उजव्या बाजूला आला की डाव्या. दोन्ही बाजूनी झिंगलेले लोक असले की तुम्ही सरळ रस्त्याच्या मधून. बेस्टचे ड्रायव्हर फार हुशार असतात. ते एवढ्या वेगाने गाड्या हाणतात; पण तुम्हाला शक्यतो चाकाखाली सापडू न देण्याचा त्याचा प्रयत्न असतो. झोपड्यांमध्ये हातभट्ट्या चालतात. हातभट्टीची स्वस्त मिळते. म्हणून पिणारे पितात. पण म्हणून तुम्ही कशाला ही गोष्ट उगाच मनाला लावून घ्यायची.

११ एप्रिल १९७०

खिसेकापूंसंबंधी उगाचच बोंब मारली जाते. तुम्ही जर सतत खिशावर हात ठेवलात तर काय बिशाद आहे खिसेकापूंची तुमच्या खिशावर नजर टाकण्याची. (मुंबईत तुमच्या एखाद्या शत्रूची खोडकी जिरवायची असेल तर त्याला भर-गर्दीच्या गाडीत गाठायचे आणि त्याच्याकडे बोट करून 'पॉकिटमार...चोर साला...' असा आरडाओरडा करायचा की झालं तुमचं काम. सारा डबा काहीही चौकशी न करता तुमच्या शत्रूवर तुटून पडेल आणि त्याला यथेच्छ बडवून काढील.) *आणि समजा चुकून आपलं पाकीट मारलं गेलंच तर काय?* आपण काय मध्यमवर्गीय गरीब इसम. आपल्या पाकीटात असणार काय? थर्ड क्लासचा पास आणि काही नाणी. बस्स्.

घाई गर्दीत गाडीखाली कटले जाण्याची भीती कुणी सांगितली की आपण तर बुवा पोट दुखेपर्यंत हसतो. अ ऽऽ यला साधी गाडीच पकडता येत नाही तर लेको जगता काशाला! रूळ ओलांडताना डावी-उजवीकडे बघायचं. गाडी थांबल्यावर चढायचं आणि थांबल्यावरच उतरायचं. एवढ्या सोप्या गोष्टी पाळल्या की तुमचा जीव एकदम बँकेच्या सेफ्‌व्हॉल्टमध्ये ठेवल्यासारखा. आता रोज मुंबईमध्ये आठ-दहा माणसं गाड्यांखाली किंवा रस्त्यांवर मोटारीखाली सापडून चिरडतात ही गोष्ट खरी. पण एवढ्या प्रचंड मुंबईत अशा गोष्टी घडणारच. त्यात असुरक्षितता कसली बुवा? प्रॉबेबिलीटीच्या शास्त्राप्रमाणे अशा तऱ्हेने मरण्याचा शंभर लाखात एक एवढाच तुम्हाला चान्स आहे. साधं गणित कळत नाही.

राग येतो रामन राघवचं नाव काढणाऱ्यांचा. अहो असे लोक काय फक्त मुंबईतच झाले? *अमेरिकेतल्या वगैरे बातम्या आपण वाचतो ना! आणि शिवाय* रामन राघव झोपड्यांवरच हल्ला करायचा. आपण मध्यमवर्गीयातले ना. आपण घाबरायचे काय कारण? मंदा पाटणकरासारखी प्रकरणं देखील रोज थोडीच घडतात.

काही लोक उगाच वेडेपणा करतात. घर ते ऑफिस आणि परत, घर ते सिनेमा आणि परत, घर ते हॉटेल आणि परत असा छान सालस मध्यमवर्गीय टाईमटेबल न पाळता ते कधीकधी उगाच इकडे तिकडे भरकटतात. उदाहरणार्थ संध्याकाळ-नंतर आझाद मैदान क्रॉस करणे, प्रेयसीला घेऊन बोरीवली नॅशनल पार्कमध्ये जाणे किंवा शिवाजीपार्कच्या अंधारात बसणे, चौपाटीवर उगाचच रात्री हिंडत राहणे वगैरे वगैरे. हे धंदे या लोकांना कुणी सांगितले? अशा ठिकाणी कुणी यांना सुरा दाखवून लुबाडले किंवा मंगळसूत्र लुटले तर त्याला जबाबदार कोण? यांचा वेंधळेपणाच ना! आणि म्हणे यांना सुरक्षितता हवी.

खरोखर मुंबई हे अतिशय सुरक्षित शहर आहे. तुम्ही तुमच्या आखलेल्या रस्त्याच्या बाहेर जाऊ नका म्हणजे झाले. मुंबईत अशा अनेक वस्त्या आहेत की जिथे जाण्याचे तुमच्या जन्मात कधीच काम पडणार नाही. मग अशा ठिकाणी जा

कशाला ? काही लोक खवचटपणाने म्हणतात की मुंबईतल्या अनेक वस्त्यांमध्ये, झोपडपट्ट्यांमध्ये शिरणे हे बाहेरच्या लोकांना धोक्याचे असते. लोक संशयी नजरेने बघतात, तुमचा पाठलाग करतात. आणि वेळप्रसंगी ठोकूनही काढतात. हे सांगणाऱ्यांना गाढव म्हणावे की मूर्ख म्हणावे हेच कळत नाही. अहो या वस्त्यांमध्ये नाक खुपसायला तुम्हाला कुणी सांगितले ? गरज काय ?

परवा आम्ही असला गाढवपणा केला होता. म्हणजे तसा नेहमीच करतो. पण परवा पुन्हा केला. एका उपनगरातल्या दाटवस्तीच्या मधोमध एक टेकडी आहे. टेकडीवर झोपडपट्टी. टेकडीवरून आपली लाडकी मुंबापुरी कशी दिसते हे प्रत्यक्ष बघावे अशी एक प्रकाशशलाका डोके लखलखून गेली. खरे म्हणजे गरज काहीच नव्हती. पण आपल्या रिकामपणाच्या चांभार चौकशा ! गेलो. टेकडी चढू लागलो. झोपड्यातल्या संशयी नजरा पाठलाग करू लागल्या. थोडे चढून झाल्यावर नम्रपणे पृच्छा झाली, "कुछ चाहिये साब ?" झटकून पुढे निघालो. काही पावलांवर पुन्हा दुसऱ्याकडून, "कुछ मंगता है साब ?" हेही झटकले. पुन्हा एका वळणावर एक बलदंड आसामी "किधर जाता है साब ?" ह्या वेळपर्यंत झोपड्यांमधून खडी ताजीम देण्यासाठी बरेच बाहेर पडले होते. एवढा साहेबी मान आतापर्यंत कुणी दिला नव्हता. एकाने सूज्ञ सल्ला दिला, "साब, उधर रस्ता जाताच नही साब." एवढ्या आत्मीयतेने पृच्छा करणारी मंडळी एस्कोर्टप्रमाणे मागे काही पावलांवर होतीच. टेकडीवरून खाली उतरलो तोवर अंगाला घाम फुटला होता.

आता हा प्रकार काय सांगतो ! तिथे जाण्याची आपल्याला गरजच काय होती ? आपण तरी बुवा असुरक्षिततेची तक्रार करणार नाही. तुमच्या मार्गाच्या बाहेर गेलात तर असे काही घडणारच.

हां ! चाकोरीच्या बाहेर करमणुकीसाठी जायचं असेल तर त्यालाही काही नियम आणि जागा आहेत. दिवे लागणी झाल्यानंतर फौंटन, रीगल, कुलाबा या ठिकाणच्या प्रमुख रस्त्यावरून आपल्या प्रेयसी किंवा बायकोसह एक चक्कर टाकण्यास काहीच हरकत नाही. तिथल्या त्या प्रचंड नियॉन साईन्स, दुकानांची आकर्षक रंगीबेरंगी सजावट, मोहक शो रुम्स्, झकाकणारे रस्त्यावरचे दिवे, चिकण्या रस्त्यावरून सुळसुळ सरकणाऱ्या निमुळत्या इंपोर्टेड मोटारी, लुसलुशीत अंगाच्या चित्रविचित्र पोशाख केलेल्या लोभसवाण्या तरुणी. सारे तुम्हाला मोहून टाकील. एकदा डोळे मिटायचे, तुमची कॉलनी, लोकलचा थर्डचा डबा, झोपडपट्ट्या—सारे विसरायचे आणि दीर्घ श्वास घेऊन पुन्हा डोळे उघडायचे. ओहो ! मोहमयी, स्वप्ननगरी मुंबापुरी हीच ती. एकदम वेगळी. काचेच्या शोरूमला नाक घासून आकर्षक डिझाईनचा नव्वद रुपये किमतीचा शर्ट उगाचच पुन्हा पुन्हा न्याहाळायचा. सव्वादोनशेच्या साड्याही उगाच बघायच्या. मोठमोठ्या हॉटेलाच्या

[ पृष्ठ ६० वर ]

स्केअर-क्रो म्हणजे बुजगावणे.
पाखरांना दूर ठेवण्यासाठी शेतात उभे करतात ते.
मनात आले, थिएटरात तर असले
अनेक दिसताहेत.
उत्तमोत्तम पोषाखातले
पोकळ आणि केविलवाणे
स्केअर-क्रोज-सपत्नीक...

# स्केअर-क्रो

दिवसभराच्या हवेने आणि श्रमानी मुबईत सध्याकाळी थकून गेलेले असावे. अपेक्षेने बदिस्त रगमदिरात जाऊन बसावे. आणि तिथली कुबट वातानुकूलित हवा, मरगळलेले इतर प्रेक्षक नाहीतर श्रोते आणि रंगमचावर चालणारा कार्यक्रम यांनी आणखीच थकवा यावा, आणखीच उदास वाटावे, आणखीच त्रास वाढावा असे खूपदा होते. कशाला मरायला इथे आलो असे होऊन जाते. पश्चात्ताप वगैरे सुद्धा होतो.

वाईट आणि भिकार कार्यक्रमाला हे व्हावे यात आश्चर्य नाही पण बऱ्या कार्यक्रमालाही हे का व्हावे ? तो कार्यक्रमच बिनचूक, कोणताही गडबड गोंधळ न होता चालू असतो. पण त्यात मुळी जीवच नसतो. निष्प्राण पण सुदर शरीराने चालावे तसा तो चालतो. मनावरचे ताण तो झाडून झटकून टाकीत नाही. जडावलेल्या मेंदूला तरतरी आणीत नाही. तो मुळी आपल्या दृष्टीआत रिघतच नाही आणि आतल्या सवेदनाच्या तारा छेडीत नाही. तो आनंद देत नाहीच पण बरीशी चीडही आणीत नाही. जिवत मढ्यासारखे आपण खुर्चीत असतो आणि एखाद्या कारखान्यातल्या यंत्रांसारखा तो कार्यक्रम तिकडे रंगमचावर चालू असतो.

पण कधी कधी—फार कमी वेळा—वेगळे काही घडते. आपण बिर्ला मातु.श्री सभागाराच्या तळघरात उतरतो, तेथल्या तेवत्या दिव्याच्या उजेडातून प्रेक्षागृहाच्या काचेच्या मोठाल्या हवाबद दारापर्यंत पोचतो. आतल्या गडद काळोखात समोर रंगमच उजळलेला असतो. रगीबेरगी आकृत्या नाचत असतात. हवाबंद दारावाटे आवाज तेवढे येत नसतात. वाटेतल्या बिर्ला मातु.श्रीच्या पुण्यशील वयोवृद्ध पुतळ्यासारखे आपण उभ्या दिवसाच्या काचाने नि शारीरिक—मानसिक व्यापानी

## रातराणी । रातराणी

### विजय तेंडुलकर

वाकलेले, भारावलेले असतो. आणि उघडल्या दारावाटे प्रेक्षागृहातले स्वर आपल्या कानात शिरतात. लय आपल्यावर येऊन आदळते. आपण अंधाऱ्या प्रेक्षागृहात शिरतो, द्वारपालमहाशयामागून आज्ञाधारकपणे आसनापर्यंत जातो, आसनस्थ होतो, पाय जरा पसरतो, श्वास टाकतो रंगमंचाकडे काळजीपूर्वक नजर टाकतो. काही सेकंद जातात.

विश्वास ठेवा वा ठेवू नका, पण येथवर रंगमंचावरच्या स्वरांनी आणि लयीने आपला निम्मा शीण पळवून लावलेला असतो. आपण चांगलेच तरतरीत आणि तवाने झालेले असतो. हलके आणि उल्हसित वाटू लागलेले असते. आणखी काही मिनिटात, आपण कधी थकलो होतो, उदास होतो, हेच लक्षात रहात नाही. भोवतालच्या कुबट थडाव्याचा त्रास होत नाही, जागोजाग गोठल्यागत बसलेल्या आसपासच्या सूटबूटवाल्या प्रेक्षकांचे भान रहात नाही, एका वेगळ्या, नित्य नव्या, नित्य टवटवीत आणि रसरशीत आणि मुक्त आणि स्वच्छंद आणि विलक्षण नैसर्गिक अशा जगात आपण पोचतो. नव्हे, आपल्याला उचलून नेण्यात येते. अल्लद, नकळता. आपण नाचतो. आपण गातो. बाथरूममधले नव्हे, खरे. शरीरातल्या प्रत्येक कणातून. अनिर्बंध. एका बेहोषीने. लयीची झिंग चढून.


हे कधी होते सांगा. लोकसंगीताच्या आणि लोकनृत्याच्या खरोखरी चांगल्याशा कार्यक्रमात. या संगीत–नृत्याचा हा रानावनात नि डोंगरदऱ्यात, थडीवाऱ्यात, पिढ्यान्‌पिढ्या आपल्या वन–वासी जमातींनी जपलेला ठेवा म्हणजे चैतन्याचा कधीही न आटणारा एक उचंबळता झरा आहे. हा कुठेही उचंबळू लागला की सारे वातावरण, सारी हवा कशी बदलून जाते, पहाता पहाता ओसाड शहरी संस्कृतीत हिरवीजर्द रानेवने नि निळे निळे डोंगरपहाड नि गाणारे पक्षी नि कोसळणारे जल-प्रपात निर्माण होतात शिणल्या भागल्या मनाच्या आभाळाखाली हे सारे भराभरा असे धावत येते आणि गाऊ–नाचू लागते. कधी प्रणयधुंद; कधी विरहव्याकूळ; कधी युद्धाच्या मत्त उन्मादाने अंग अंग फुलून-फुशारून-आणि शिणले मन शिणलेही रहात नाही, आपलेही रहात नाही.

अर्थात यासाठी नाचणारे–गाणारेही लोककलेतल्या चैतन्याशी अचूक नाते

जोडणारेच असावेत. एरवी स्वर-लय लोकगीताची आणि लोकनृत्याची आणि नाचणारी-गाणारी मने-शरीरे हे सारे न उमजू शकणारी, न पेलू शकणारी, सकोचं, तकलादू, शहरी, नाजूक, स्वत.ला विसरू न शकण्याइतकी जून, वातड; मग मात्र काहीच खरे नव्हे.

पण बिर्ला मातुश्री सभागारातली ती सध्याकाळ मात्र वेगळी होती. चांगली होती. स्थापत्यशास्त्रज्ञाच्या सस्थेतर्फे ग्वाल्हेरच्या लिट्ल बॅले ट्रुपचा नृत्यांचा कार्यक्रम चालला होता. पोचल्याबरोबर पहिल्या, चालू असलेल्या गुजराती बिराज-लीलेनेच कसे, नुकते छानशा झोपेतून जागे व्हावे तसे वाटले. काठियावाडचे वेगळे विश्व. भाबडे. शालीन. जीव लावणारे. लयीत, स्वरात एक नाजूकपणा. साधेपणा. यालाच गीतात, नृत्यात हळूवारपणे, समजदारीने, शैलीदार आकर्षक आकार दिलेला. नर्तकाच्या अंगप्रत्यगातून काठियावाडी मातीचा गध जसा व्यक्त होत होता, गात्या कठावाटे तोच झरत होता. ऐकत्या-पहात्या गात्रामध्ये हाच स्रवत होता. कुबट बिर्ला मातुश्री सभागारात काठियावाड दाटदाटून आले होते. हे नृत्य सपले आणि रंगमचावर मंतरल्यासारखे राजस्तान आकारले. राजस्तानचा गोर-बध. तपशिलातपाशलात काठियावाडच्या बिराजलीलेहून अगदी वेगळा. तरी रंग-रसाने सारखाच न्हालेला. मुक्त बेहोषीत भिजलेला. एका वैराण मुलखातला उत्कट विरगुळा. पाठोपाठ आली मणिपूरच्या टेकड्यातली खबा-थोइबीची प्रणय-कथा. खरे तर या शोकान्त रक्तरंजित लोक-कथेतला हा एक विलक्षण नाजूक, हळवा, निरागस असा देखणा कथाभाग. गुजरात-राजस्तानच्या तुलनेने एकसुरी सगीताने आणि एकाच लयीने बाधलेला. परंतु हा एकसुरीपणा काळजात एका एकसुरी जीवनातल्या असख्य सवेदना जाग्या करणारा. त्यात दोन्ही नर्तकाचे डोळे, नाके, चेहऱ्याची नि शरीराची ठवण मणीपूरच्या मगोल वशाच्या वारशाची थेट साक्ष देणारी. मग झडले युद्धाचे ढोल. रणशिंगे वाजू लागली. वाद्यांच्या मेळातून युयुत्सू पुरुषार्थ फुसाडू लागला-नागा प्रदेशातला. शरीरे शृगारून खड्गे परजणारे अनेक युद्ध-वीर एकाद्या धर्मविधीप्रमाणे नृत्याचे धीरोदात्त, गभीर, निश्चयपूर्ण, समर्थ पदक्षेप करीत वेगवेगळ्या रचना करीत आणि मोडीत विस्तीर्ण रगमंचावर फिरू लागले. जगली आरोळ्या उठू लागल्या. प्रत्येक पवित्र्यात आणि पदक्षेपात प्रेक्षागृहात नि.स्तब्धता ठेवणारे मूर्तिमत सामर्थ्य, युद्धमद आणि मरणाच्या छायेतली मर्दानी बेहोषी. याही साऱ्याला एक कलापूर्ण, शिस्तबद्ध रूप आणि आकार-मूळच्या मुक्त जीवनाचा चुकूनही अधिक्षेप न व्हावा अशा काळजीने दिलेला.

मध्यंतर कसे, केव्हा, का झाले तेही कळले नाही; इतका वेळ छान चालला होता. आतबाहेर जणू कितीतरी दिवसानी एक परिपूर्ण, खरीखुरी जाग नुकती येत होती, या देशाच्या मातीशी, त्या मातीतल्या बहुरंगी चैतन्याशी आताच कुठे एक रक्ताचे नाते जडत होते. युद्धविधीच्या पावित्र्याने आणि गाभीर्याने आणि



नागानृत्य

सामर्थ्याने कारकुनी मनात नुकते थोडे चलनवलन होत होते आणि मध्यंतरच आले. युद्धविधी संपून खाद्यविधीसाठी कार्यक्रमाच्या चालकांनी वेळ दिला.

कार्यक्रमपत्रिका पाहिली तर मुख्य कार्यक्रम यानंतर होता. ग्वाल्हेरचे 'लिट्ल बॅले ट्रूप आपले नवे नृत्य-नाट्य आता सादर करणार होते. नाव होते 'स्केअर-क्रो.' म्हणजे बुजगावणे; शेतात पाखरांना दूर ठेवण्यासाठी उभे करतात ते. (मनात आले, थिएटरात तर असले अनेक दिसताहेत. उत्तमोत्तम पोषाखातले पोकळ आणि केविलवाणे स्केअर-क्रोज, सपत्नीक...)

काळोख झाला. पडदा वर गेला. अंधुक उजेड. खेड्यातले शेत. दूर एक मंदिर. पाखरे हाकवण्याचा गोफणगुंडा चालवण्यासाठी शेतात एक मचाण. एक, दोन अवजारे. कुठेतरी बासरीचे मंद सुस्त सूर. पाखरांचे थवे शेतावरून उडत जाऊ लागतात. किलबिल पाखरांचे चित्रविचित्र मजेदार स्वर. वाऱ्यावर पंख पसरून अंतराळातून अल्लद वाहत जाणाऱ्या, गिरगिरणाऱ्या पक्षांच्या तरल, मोहक हालचाली आणि विभ्रम. उजाडता उजाडता देवदर्शनाला नाहीतर कामाला नाहीतर फकिरी-साठी जाणाऱ्या गावातल्या माणसांच्या छायाकृती. जागणाऱ्या खेड्याचे ध्वनिचित्र आणि दृश्यचित्र यांचे रम्य संकलन. मंदिरात आरती वाजू लागली आहे.

दिवस भराभर उजाडतो. खेड्यातली कामे सुरू होतात. उन्ह चढत निघते.

पाखरांचे थवे शेतावरून भिरकांडताना पिकावर उतरू लागतात. शेताची राखण करणारी शेतकऱ्याची मुलगी पारो मचाणावर उभी राहून गोफणगुड्याने पाखरे निवारीत राहते. पाखरे पांगतात, चौदिशा विखुरतात, पुन्हा जमून उतरू बघतात. पुन्हा भिर्र्रकन वर उडून जातात. त्यांना अन्न हवे आहे आणि पारोला पिकाची राखण करायची आहे.

पाखरे, पारो सारे एकाच सपाट रंगमंचावरून फिरते. पण पाखरांच्या अंग-प्रत्यंगात अंतराळाचा मुक्तपणा नि हलके फूल होणे आहे तर पारोची प्रत्येक हालचाल थोडी जड आणि जमिनीवरची आहे. या हालचालींनीच रंगमंच एकदा जमीन होतो तर एकदा अंतराळ होतो आणि एकेकदा दोन्ही एका वेळी होतो. ' पाखरा 'नी शुभ्र सलवारी नि कमीज घालून मस्तकी एकेक रंगीत फीत बांधली आहे आणि तिची फुलपाखरासारखी गाठ कपाळी ठेवली आहे. बाकी, चोची नाहीत की पिसे नाहीत आणि पखही नाहीत, तरीही ती शरीराच्या कणाकणात पाखरेच भासतात. त्यांची बोटे, त्यांचे बाहु, त्यांचे पाय, त्यांच्या माना, त्यांच्या नजरा, त्यांचे फिरणे-चालणे-पाहणे-वहाणे सारे पाखराचे आहे. आणि तितकीच पारो माणसातली आहे. पारो गोफण चालवते आणि एक पाखरू वर्मी दुखावते; जायबंदी होऊन खाली पडते. तडफडते आणि प्राण सोडते. त्याचे निष्प्राण शरीर मातीत पख पसरल्यागत पडून राहते. पारोला धक्का बसतो. तिच्या निरागस मनावर तिने पाहिलेल्या या एका कोमल, अजाण जिवाच्या यातनामय मरणाचा जबर परिणाम होतो. या पखराला आपण मारले. या सुंदर, नाजूक, निष्पाप, कोमल पाखराचे मरण आपल्यामुळे घडले. मरण असे असते ? इतके भयंकर, सारे-सारे कायमचे मिटवणारे आणि संपवणारे ? आपण ते या पाखराला का दिले ? त्याचा कोणता अपराध होता ?

पारो सुन्न होते. ती काहीच बोलेनाशी होते. कामे करीनाशी होते. शेतावर जाईनाशी होते. आई ओरडते, पाठीत धबके घालते पण पारो तशीच. ती जमिनी-कडे टक लावून भ्रमिष्ट बसून राहते. मंत्रतंत्र केले जातात, पण पारो सुधारत नाही. जणू तिच्या थिजल्या नजरेसमोर ते जाया आणि निष्प्राण पाखरू तसेच आहे; धुळीत पख पसरून वासल्या चोचीने पडलेले.

गावातला अनुभवी, जाणता म्हातारा पारोची अवस्था पाहतो. शेतावर पाखराचा बंदोबस्त तर व्हायलाच हवा. तो पारोच्या आईला एक तोड सुचवतो. शेतात स्वतःच एक बुजगावणे आणून उभे करतो. मोठे, माणसाहून बोजड आकाराचे, वेड्यावाकड्या केविलवाण्या चेहऱ्याचे, केरसुणीच्या हाताचे नि गवत ठासलेल्या अष्टवक्र देहाचे.

काय गमत ! पाखरे तर त्याने वचकतातच पण पारोची या बुजगावण्याशी दोस्ती जमते. ती त्याच्याशीच बसून राहते. तिच्या स्वप्नात ते येते. ते हलते, चालते, माना मुरडते, खुणांच्या भाषेत बोलूदेखील बघते. पारोला जोडीदार

मिळतो. भला थोरला तरी पोराहून पोर. कुरूप तरी लोभस. वर वर भयावह पण आतून माया लावणारा, माया मागणारा.

हा जोडीदार पारोला आपल्या देशात घेऊन जातो. बुजगावण्यांचा देश. इथे बुजगावणीच प्रजा नि तिचा राजाही एक बुजगावणेच. जरा जास्त उग्र, उगीच दाणदाण पावले टाकणारे नि आपला भुस्सा नि गवत भरलेला अष्टवक्र राजबिंडा डौल जपणारे. याच्या मुलीचे लगीन ठरायचे आहे. ही मुलगी आहे एका तरुण बुजगावण्याच्या प्रेमात; पण राजाला तिचे लगीन दुसऱ्याच घरंदाज बुजगावण्याशी लावायचे आहे. मुलीचा फाटका प्रियकर त्याला पसत नसतो. पण राजकन्या ऐकत नाही. तिला तिचेच आवडते बुजगावणे नवरा म्हणून हवे! राजा तिच्यावर चिडतो, खवळतो पण हतबल होतो. मग तो बेत करतो-एक कारस्थान रचतो. त्या फाटक्या, कगाल बुजगावण्याला पकडून त्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा सोडतो. जुन्या काळच्या ठकी नावाच्या लाकडी भावलीसारखी थोडीशी दिसणारी लांब मुखवटेवजा चेहऱ्याची कन्या बिचारी अश्रू ढाळण्यापलीकडे आणि भयभीत होण्या-पलीकडे काय करणार?

पण न राहवून पारोच इथे एकदम मध्ये पडते. ती राजापुढे घुसते. राजाला म्हणते, नका महाराज, तुमच्या लाडक्या मुलीवर असा क्रूर आघात करू नका! आपण हे सारे लपून फक्त पहायचे आहे हे मुळी त्या क्षणी पारोच्या ध्यानातच राहिलेले नसते आणि एकदम राजापुढे येऊन ती उभी राहिलेली असते. बुजगा-वण्याच्या राजाला या कोणा माणसाच्या मुलीला पाहून भयकर संताप चढतो. ही इथे कशी? कोण आहे रे तिकडे? हिला फासावर चढवा!

...बापरे? राजाचीच आज्ञा; मग राजा बुजगावण्याच्या राज्यातला नि पेंढा भरलेला असला म्हणून काय झाले? बिचारी पारो! तिचे मरणच ओढवते.

पण धीर करून ते तिच्या आईच्या शेतातले आणि तिला या राज्यात घेऊन येणारे बुजगावणे इथे मध्ये पडते. ते राजाची विनवणी करते, पारोला मारू नका. ती निरपराध आहे राजा म्हणतो, नाही, पारो फाशी जाणारच!!

पण या प्रश्नावर दरबारात तट पडतात. पारोच्या पार्टीचे कोणी कोणी तिला फाशी देण्याला सक्त विरोध करतात. म्हणतात, आधी आमचे देह पडतील, मगच पारो फाशी जाईल!-किंवा असेच काही.

झाले. भयकर यादवी भडकते. बुजगावणी एकमेकावर सीमेच्या हिंस्रपणे तुटून पडतात. खणाखणी आणि कापाकापी चालते. पारोला हे सहन होत नाही. आपल्यामुळे काय हा प्रसग! ती खुषीने राजापुढे जाऊन म्हणते, महाराज, मी फाशी जाते पण ही लढाई आधी थांबवा! दुष्ट राजा इथे स्वतःच पारोचे मस्तक धडावेगळे करण्यासाठी सरसावतो. पण काय चमत्कार! राजाचेच मस्तक धडा-वेगळे होते आणि एकुलत्या एका मुलीला मनासारखे लगीन करू न देणाऱ्या, पारो-सारख्या भल्या मुलीला ठार करू बघणाऱ्या जुलमी राजाच्या वधाने प्रजा हर्षभराने



बरेचसे
अबोल
असलेले
हंसाबाईंचे हे चरित्र
अत्यंत
बोलके
आहे.

वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

किंमत : आठ रुपये
राजहंस प्रकाशन

जयजयकार करते, उत्सव करते, जल्लोष करते–

आणि पारो जागी होते. तर सगळे स्वप्न ! पहाट झाली आहे. पक्षी शेतावरून किलबिलत भिरकांडत गिरगिरत थव्यांनी उडताहेत. गावातली माणसे देवाला नाहीतर कामाला निघाली आहेत. लांबच्या मंदिरात घंटानाद चालू आहेत. आणि शेतातले ते बुजगावणे बिचारे हात पसरून आभाळात पहात रात्रभर उभेच आहे– निर्जीवपणे. केविलवाणे.

पडदा हळूवारपणे खाली आला. बुजगावण्यांची नृत्यमय गोष्ट संपली. प्रेक्षागृहातल्या तमाम बुजगावण्यानी टाळ्या पिटल्या. पडदा पुन्हा वर गेला आणि आपली गावरान पारो, बुजगावणी, पक्षी सारे एका रांगेने उभे राहून प्रेक्षकांना प्रसन्न आणि सहास्य नमस्ते करताना दिसले.

इतरांमागून बिर्ला मातुःश्री सभागाराबाहेर पडताना पारोची कथा मनातून गेली होती. पण रंगमंचाच्या अंतराळातून नृत्यनाट्याच्या आरंभी नि अखेरी, थव्यांनी, मुक्त तरी शिस्तीने उडत राहिलेले सलवार–कमीजातले ते कितीतरी शुभ्र पक्षी काही नजरेपुढून हलत नव्हते. त्यांचे ते मज्जेत उडणे, पंख ताठ पसरून वाऱ्यावर अल्लद तरंगणे, मध्येच खाली झेपावणे, पुन्हा उंच जाणे, पिकावर झुलत टकटका इकडे तिकडे पहाणे, दाणे पट्पट् वेचणे, गोफण गरगरताच भिर्रर्रकन् पिकांवरून आभाळात थव्याने झेपावणे – डोळे मिटले तरी नजरेसमोर येत होते. आणि ती एकेक बुजगावणी – बेडौल देहाची, पण अतिशय डौलदार हालचालींची; उग्र आणि कुरूप तरी विलोभनीय. त्यातली बुजगावण्यांची राजकन्या – पत्त्यातल्या राण्यांची उगीच आठवण करून देणारी. बुजगावण्यांची प्रीती, क्रोध, कटकारस्थाने *हिंसता – एका लयीत बांधून मांडलेली. सारे एक रंगीबेरंगी सुरेल स्वप्न.* विलक्षण देखणे नि कर्णमधुर.

बाहेर पडल्यावर कार्यक्रमपत्रिकेत सहज नावे पाहिली : नृत्य–कल्पक : प्रभात गांगुली. संगीतनियोजक : राणु वर्धन, गायक : मंजु भट्टाचारजी, श्याम भट्टाचारजी, हेमेनदास गुप्ता, लतिफ अहमद, मुन्नालाल...नर्तक : गुल, रेवा, शर्मिष्ठा, पांचाली, राधा, ललिता, राघवन, तंडन, रामचंद्रन, अनिल, शिवदास ..

सगळीच अनोळखी. या खऱ्या नावानी काही नजरेपुढेच येत नव्हते, पण पारो म्हटले, पारोची आई म्हटले, थव्यातले ते मधलेच एक अचपळ नि अवखळ हसरे पाखरू म्हटले, अलंकारिक लांब लांब शिंगे झुलवीत भाले परजीत रणवाद्यांच्या तालावर नाचणारे नागा योद्धे म्हटले किंवा ते सजीव होऊन पारोला घेऊन आपल्या देशात निघालेले बोजड, अजागळ, कुरूप, येडबंबू पण खूप खूप प्रेमळ बुजगावणे म्हटले की नजर कशी ताज्या आठवणींनी भरून नुसती सांडत होती.

–गंमत होती. वास्तव झाले होते भास आणि भास वाटत होते हे आत्ता घडलेले साक्षात वास्तव.

□ □ □

# मुक्ताफळे

## □ मुंगीने गिळलेला मेरू

आपल्या हातापायांना अधूनमधून मुंग्या येतात. अशक्त माणसांच्या अवयवांना येतात. सशक्त माणसांच्या येतात. सज्जनांच्या येतात. दुर्जनांच्या येतात. दोन्ही थोडथोडे सज्जन-दुर्जन असतात, त्याच्याही येतात. दुष्टांच्या येतात. देश-द्रोह्यांच्या येतात. देशभक्ताच्या सुद्धा येतात. वर्षानुवर्षे सत्तेवर नसलेल्या मंत्र्यांच्या मेंदूला देखिल मुंग्या येतच असल्या पाहिजेत.

या ज्या मुंग्या येतात, त्या जशा येताना दिसत नाहीत, तशा जातानाही दिसत नाहीत. समाजवादासारखे हे आहे. समाजवाद येताना दिसतो का? नाही. जात चालला आहे, असे म्हणावे, तर चहूबाजूनी, हा पहिलवान 'आला रे आला' असा इतका प्रचड गदारोळ उठला आहे, की 'समाजवाद जाताना पाहिला बुवा!' असे कुणी म्हणाला तर जनता त्याला मूर्खात काढते. तर तशाच आहेत या मुंग्या.

एखादा मनुष्य खुर्चीत चांगला घट्ट चिकटून बसलेला असताना, अचानक पाहता पाहता हातपाय झाडू लागला, की समजावे मुग्या आल्या! परवा पजाबचे मुख्य-मंत्री गुरुनामसिंग असे 'अकाली' हातपाय झाडू लागले. लोकाना वाटलेच, मुग्या आल्या. मुंग्याच आल्या—पण या मुग्या पाढऱ्या होत्या. मुग्यांमधली ही 'व्हाईट अँट' जात फार वाईट! एकदा का लागल्या, की माणूस 'अकाली' गडगडतो. खुर्ची देखिल कोसळते.

पांढऱ्या मुग्या महाराष्ट्रात खूपच आहेत. महाराष्ट्र शासनाने 'गांधी शताब्दी' म्हणून गाधी साहित्य छापले. गांधी साहित्य हे 'क्लासिकल लिटरेचर' झालेलें आहे. क्लासिकल लिटरेचर म्हणजे जे बहुतेक कुणी वाचलेले नसते, आणि जे थोर आहे याबद्दल मात्र कुणालाही शका नसते! तर महाराष्ट्र सरकारने हे १३ ग्रथात छापले. हा आकडाच अशुभ असावा. १३ ऐवजी १४ छापले असते तर? समजा गांधी साहित्याचे १३ च ग्रथ झाले, तर १४ व्या ग्रथात मत्री वगैरेंची ग्रंथात बस-तील तेवढी गांधीवादी चरित्रे छापायची होती. यांच्या चरित्रात सांगण्यासारखे फारसे नसले, तर काही पद्मश्रींची चरित्रे समाविष्ट करता आली असती. ग्रंथात नेहमी काहीतरी 'समाविष्ट' केल्याखेरीज तो ग्रथ कसला? ग्रथ नक्कीच १४ हवे होते. १३ छापल्याने काय झाले?

'पांढऱ्या मुंग्या' या ग्रंथाना लागल्या!

विधानसभेत मुख्यमंत्रीजी वसंतरावजी नाईकजी म्हणाले–

" जवळजवळ १००० प्रती पांढऱ्या मुंग्यांनी खाऊन टाकल्या. यामुळे सरकारचे ३००० रुपयांचे नुकसान झाले.

ज्या अर्थी प्रती जवळजवळ १००० होत्या, त्याअर्थी नुकसान देखिल जवळजवळ ३००० असावे. कदाचित कमी पण बहुधा खूपच ! मुख्यमंत्रीजींनी उपप्रश्नाला दिलेले उत्तर याहून चांगले आहे–

जून १९६८ मध्ये आम्ही १३ ग्रंथ छापले. छापायला खर्च ३,४६,१२,८४९ रुपये आला. तीन कोटी शेहेचाळीस लाख बारा हजार आठशे एकूण पन्नास. प्रती काढल्या ६३५००. १९६९ अखेर यातल्या ८९२६ विकल्या. विक्री करून पैसे आले रु. ३०,०००

हे ग्रंथ आम्ही पाहिलेले नाहीत. परंतु एवढो 'मूल्यवान' छपाई पाहण्यासारखो असलीच पाहिजे. नाहीतर तीन कोटीचे तेरा होणे अन्यथा केवळ अशक्य होय ! हे ग्रंथ 'गोडगोड' असले पाहिजेत. उगाच का हजार प्रतींवर पांढऱ्या मुंग्यांनी एवढा ताव मारला !

सरहद गांधींच्या झोळीत फक्त ३६ लाख रुपयेच जमले यावरून इथे गांधीवादाचे काय होणार अशी चिंता ज्यांना वाटते, त्यांनी हे लक्षात घ्यावे की गांधीसाहित्यावर तीन कोटी रुपये साडेतीन कोटीचा महाराष्ट्र खर्च करतो ! इथे गांधीवाद फोफावतो आहे असेच आम्ही तरी म्हणू. समजा काही ग्रंथ मुंग्यांनी खाले-खाऊ द्या ! पण मुंग्या पांढऱ्या होत्या ना ? मुंगीवर्गातील सर्व खादीधारी मुंग्यांनीच हा फन्ना केला आहे. प्राणीसृष्टीतील गांधीसाहित्यावरचे हे प्रेम पाहून आमचे तर हृदय आनंदाने भरून येत आहे.




आता फक्त ५४५७४ प्रती शिल्लक आहेत. ग्राहकांनी त्वरीत रांगा धराव्या ! नाहीतर मुग्याच्या रागा तयार आहेतच ! गांधीसाहित्याचा मेरु मुग्यानी, गिळला, असे होऊ नये ! !

## □ इश्श ! हे काय वागणं ! !

' प्रेम पुजारी ' हा एक हिंदी चित्रपट आहे. तसे सगळेच हिंदी चित्रपट हे भरमसाट ' प्रेम ' पुजारी असतात. ' घालीन लोटांगण–वंदीन चरण ' ही भक्ताची प्रेमावस्था या चित्रपटात पराकोटीला गेलेली असते. या चित्रपटातील नायक ' मादक अॅटम बॉम्ब ' मागून जो धावपळ करतात ती प्रेक्षणीय असते. सैन्ये ' पोटावर ' चालतात, आमदार ' नोटावर ' चालतात. परतु पोटावर, नोटांवर आणि ओठावर चालणारे ' याहू ' हे अधिक लोकप्रिय आहेत.

कलकत्यात १९ चित्रपटगृहात चाललेले प्रेम पुजारी तावूत काही दिवसापूर्वी अचानक थड झाले. मार्क्सवादी तरुण विद्यार्थ्यांनी या चित्रपटाची तिकिटे काढून सर्व १९ चित्रपटगृहात प्रवेश मिळवला....आणि चित्रपटात चिनी आक्रमणाविरुद्ध असलेला त्याच्या दृष्टीने गैरप्रचारकी भाग पडद्यावर येताच, गृहात ' वादक ' बॉम्ब उडाले ! मेलं वगैरे कुणी नाही. नुसतेच आवाज निघाले. याच वेळी चित्र-पटगृहाबाहेर नेमकी निदर्शने झाली. बंगालमधून ' प्रम पुजारी ' पळाला !

अहिंसक बॉम्ब वगैरे टाकणे देखील एकदरीत वाईटच. परतु या कृत्यामुळे फायदाच अधिक होईल प्रेमाच्या धावपळीत आणि कॅब्रे नृत्यात अधूनमधून छटाक छटाकदेशभक्ती टाकल्याने जी ' फिल्म ' वाया जाते व रंगाचा बेरग होतो तो यामुळे थांबेल. शेवटी ' जनगणमन ' असतेच...लोक उभेसुद्धा राहतात. मग चित्रपटात खुद्द हे कशाला ? हा व्यय आता थाबेल. ' वादक ' बॉम्ब व ' मादक ' बॉम्ब असे एकत्र येऊ नयेत, याची काळजी हिंदी भाषेत ' इग्रजी ' चित्रपट काढणारे निर्माते आता घेतील. चिनी आक्रमणाविरुद्ध प्रचाराला विरोध करणारे सगळेच मार्क्सवादी असतील यावर आपला विश्वास नाही. बरेच इदिरा कॉंग्रेसवाले याच मताचे आहेतच ना ! ते देखिल गडबड करण्यात असतील. कुणी सागावे ?

पण हे कसले मार्ग ! आपण तीव्र निषेध करू या. चित्रपट आवडला नाही, तर वाचकाच्या पत्रव्यवहारात तरुणानी पत्रे लिहावी, चित्रपट भिकार आहे–असे ' सडेतोड ' परीक्षण लिहावे. चित्रपटगृहात शिरून दगल करणे तरुणाना मुळीच शोभत नाही. तरुण कसा ' लक्स 'च्या न वापरलेल्या वडीसारखा गुळगुळीत असावा. सोललेल्या केळ्यासारखा मऊ आणि लुसलुशीत असावा. आमचे महाराष्ट्रीय तरुण किती किती चागले आहेत ! त्याना चीड म्हणून कशाकशाची येत नाही.

**–ग्यानबा**

रंगभूमी

■■

सौ. पुष्पा भावे

# मन पाखरू पाखरू

या वर्षीच्या प्रारंभी (माणूस : २४ जानेवारी १९७०) श्री. शं. ना. नवरे याच्या 'ग्रँड रिडक्शन सेल' या लक्षणीय नाटकावर अभिप्राय लिहिताना मी, श्री. शं. ना. नवरे याच्या भावी नाट्यलेखनाविषयी फार मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्याचे वाचकांना कदाचित स्मरत असेल. यामुळे 'मन पाखरू पाखरू' या त्याच्या नव्या नाटकाला जाताना विशेष कुतूहल मनात होते. शिवाय नाटकाचे नाव पाहून हे नाटक मानसिक संघर्षावर आधारलेले असावे, असा आपला एक समज उगाचच झाला होता.

भास्कर (श्रीकांत मोघे) हा एक अपयशी नट, आपल्या म्हाताऱ्या आईच्या समाधानासाठी स्वत:च्या यशाची-सुखाची एक मयसृष्टी निर्माण करतो. त्या मय-सृष्टीत त्याच्या आईला भास्करच्या विवाहाची फक्त उणीव दिसते. तिच्या समाधानासाठी आपण लग्न केल्याचे एक नवे नाटक उभारू बघतो. पण हे नाटक लेखणीच्या फटकाऱ्याने उभे राहणारे नाही. आईला सूनमुख साक्षात दाखवायचे तर आणखी कोणाचे तरी सहकार्य हवे. भास्करच्या नाटकमंडळीतील नेत्रा

(भावना) ही नटी घरातील बाजारी वातावरणात गुदमरली आहे; त्यातून दोन दिवस सुटका म्हणून ती या फसवणुकीच्या नाटकात भास्करच्या पत्नीची भूमिका पत्करते. गावातील वास्तव्यात भास्करच्या मायाळू आईची व घराची नेत्राच्या मनावर विलक्षण मोहिनी पडते. आपल्याला जे हवे आहे ते सारे या आडगावातील छोट्याशा घरात मिळेल असे वाटून ती नाटक हेच सत्यसृष्टीत आणू पाहते. यातील विदारक विनोद भास्करला जाणवतो. भावविवश नेत्राला आपल्या आततायी विचारापासून परावृत्त करण्याचा तो प्रयत्न करतो. परतु नेत्राला आपल्या मनाचा कौल योग्यच वाटतो. उलट नेत्रासारख्या गुणी, सुस्वरूप, श्रीमंत मुलीला त्या घराच्या पिंजऱ्यात ठेवण्याचे सामर्थ्य आपल्या कुरूप, अपयशी, दरिद्री व्यक्तिमत्त्वात नाही असे भास्करला वाटते. भावना, आपल्या लाडक्या गंगारामाला (पोपटाला) पिंजऱ्यातून मुक्त करून, तो व्यक्त करतो. पण नेत्राच्या बाजूचा प्रतीकात्मक कौल देत गगाराम परत पिंजऱ्यात येतो; आणि एका नव्या अर्थपूर्णतेने 'सासूबाई' अशी हाक मारून नेत्रा भास्करच्या आईच्या पायाशी लोळण घेते. इथे नाटक संपते.

पतिपत्नीनात्याच्या फसवणुकीच्या नाट्याचे नाविन्य मराठी वाचकप्रेक्षकाला वाटण्यासारखे नाही. मराठी विनोदी चित्रपटात व कथात ते अनेकदा वापरले गेले आहे. तसेच अकुलिनेने कुलवंत उबऱ्याची आस धरणे हेही मराठी वाचकप्रेक्षकाला नवीन नाही. किंबहुना अशा प्रसगात गरिबीला मिळणारा उजाळा मराठी मध्यमवर्गीय प्रेक्षकाला फारच प्रिय आहे. श्री. शं. ना. नवरे यांच्या या नव्या नाटकाची कथावस्तु ही अशी, त्यांच्या प्रयोगशील वृत्तीपेक्षा मराठी रंगभूमीवर लोकप्रिय झालेल्या कोल्हटकरी-कालेलकरी पद्धतीच्या नाटकाला अधिक जवळची आहे. पण या कथावस्तूची मांडणी त्यानी वैशिष्ट्यपूर्ण करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक केले आहेत.

भास्कर चारचौघापेक्षा वेगळा आहे हे दाखवण्यासाठी त्याची स्वगते मुक्तछंदात लिहिली आहेत. त्याच्या विनोदी भूमिकांमुळे आणि रूपामुळे निर्माण झालेली प्रतिमा आणि त्याच्या मनाचे सुसंस्कृत गाभीर्य, यातील विरोध नाट्यात्मक करण्याचे प्रयत्न नाटककाराने केले आहेत. परंतु दुसऱ्या-तिसऱ्या अकात नेत्राला मिळालेल्या महत्त्वामुळे भास्करची व्यक्तिरेखा झाकळून जाते. त्यामुळे नाटकाच्या अंती, नेत्रा मायेच्या घरासाठी भास्करशी लग्न करू पाहाते असे काहीसे विपरीत स्वरूप नाटकाला प्राप्त होते. दुसऱ्या-तिसऱ्या अंकांच्या रचनेत, नेत्रा-भास्करची आई-गावकरी याच्या सबधांना इतका उठाव न देता जर पतिपत्नीच्या नात्याने नाटक करता करता भास्करचे एक नवे दर्शन नेत्राला घडते आणि त्यामुळे तिला हे नाते कायम जडावे असे वाटते असे रूप नाटककाराने दिले असते तर पहिल्या अंकात भास्करच्या व्यक्तिमत्त्वाविषयी निर्माण होणाऱ्या अपेक्षा फलद्रूप

झाल्या असल्या. या नाटकातील दाजी टेलर व सदाशिव पोस्टमन ही दुय्यम पात्रे व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने उत्तम वठली असली तरी नाटकाच्या रचनेत त्यांना मिळालेले स्थान अवाजवी वाटते. या दोन पात्रांच्या आधारे निर्माण केल्या गेल्या विनोदाला या नाट्यकृतीत लक्षणीय स्थान मिळू शकले नाही. श्री. शं. ना. नवरे याच्या कथांतून त्यांच्या चमकदार कल्पनाशक्तीचा व विनोदबुद्धीचा प्रत्यय येतो; पण या नाटकात हा गुण नाट्यघातक ठरला आहे. १९७० साली गडकऱ्यांच्या नाट्यरचनेतील दोषविशेष घेऊन येणारे हे नाटक मराठी नाट्यलेखनाविषयी काही नव्या अपेक्षा बाळगणाऱ्या वाचकाची निराशा करते. मात्र अशा या मर्यादित नाट्यगुण असणाऱ्या नाटकाचा अत्यंत नेटका प्रयोग 'अभिजात' या नव्या नाट्य-संस्थेने सादर केला.

श्री. श्रीकांत मोघे हे मराठी रंगभूमीवरील बहुगुणी नट या नाटकाचे दिग्दर्शक आहेत. माझ्या समजुतीप्रमाणे दिग्दर्शनाचा हा त्याचा पहिला प्रयत्न आहे; आणि तो चांगलाच यशस्वी ठरला आहे. वर सांगितलेल्या काहीशा भावविवश कथा-वस्तूचा त्यांनी संयत आविष्कार घडवला आहे. स्वतः नायकाची भूमिका करताना श्रीकात मोघे एका नव्या, ओबडधोबड चेहेऱ्याने प्रेक्षकांसमोर येतात. त्याच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वावर खूष असणाऱ्या अप्रगल्भ प्रेक्षकाना हे कदाचित रुचणार नाही; परंतु एका तरुण मराठी नटाने पात्राच्या व्यक्तिमत्त्वानुरूप कुरूप चेहेरा पत्करण्याचे धाडस दाखवले त्याबद्दल श्रीकांत मोघ्याचे कौतुक करायला हवे. पात्रांच्या हालचालीचे दिग्दर्शनही त्यानी चातुर्याने केलेले असल्यामुळे दृश्यपरिणाम फार सुखद झाले आहेत. भावना—सौ. सुमन ताटे यानी आपली भूमिका समजून व समरसून केली. सौ. शांता जोग यानी भास्करच्या आईची भूमिका करताना संयत अभिनयाची दुर्मिळ जाण दाखवली आहे. केवळ या भूमिकेसाठीदेखील हे नाटक पाहण्याची शिफारस मी करू शकेन. विठ्ठल पणदूरकर (पोस्टमन) आणि प्रभाकर मोने (टेलर) याचाही अभिनय उल्लेखनीय आहे. नाटकाला श्री. जितेंद्र अभिषेकी याचे संगीत दिग्दर्शन लाभले होते; परंतु बहुधा ध्वनिमुद्रणाच्या तांत्रिक दोषामुळे हे सगीत व मन पाखरू पाखरू हे गीत प्रेक्षकापर्यंत पोचले नाही. यामुळे पहिल्या अकात, स्वरलयीनी भास्करच्या स्वगतातील चित्तवृत्ती दर्शवण्याचा प्रयत्न उमजला पण नाट्यरूप झाला नाही.

श्रीकांत मोघे याच्या दिग्दर्शनाचा उल्लेखनीय प्रथमप्रयत्न, शाता जोग यांचा अकृत्रिम, स्मरणीय अभिनय यांमुळे या सदोष नाटकाला नेटके स्वरूप प्राप्त झाले असले तरी श्री. शं. ना. नवरे याच्यासारख्या कल्पक लेखकाने लोकप्रिय मराठी नाटकाच्या ढोबळ ठोकताळयांना इतके का अनुसरावे हा प्रश्न उरतोच. हे श्री. शं. ना. नवरे यांचे एखादे मागे राहिलेले जुने नाटक तर नव्हते?

□ □ □

हूडच्या सर्वनाशानंतर शत्रूशी प्रत्यक्ष संपर्क असणाऱ्या नौकांपैकी नॉरफोकवरील कर्णधार रिअर अॅडमिरल वेकवॉकर याच्यावर लढाईच्या सूत्रचालनाची जबाबदारी पडली. वेकवॉकर ह्या मोठा कल्पक, धाडसी आणि चिवट कर्णधार होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन त्याने डेन्मार्क-सामुद्रधुनीमधून 'बिस्मार्क'चा पाठलाग केला होता. तो करताना आपल्या नौकांना अपाय होणार नाही अशी दूरदर्शी दक्षता त्याने घेतली होती. डेन्मार्क-सामुद्रधुनीमध्ये पिच्छा पुरवून त्याने 'बिस्मार्क' हूड आणि प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या मारक टप्प्यात आणून सोडली होती. 'बिस्मार्क'ची त्यांच्याकडून उडणारी दैना पाहताना त्याच्या श्रमांचा परिहार होणार होता. पण वेकवॉकरला भलतेच भीषण शोकान्त नाटय पाहावे लागले.

अनंत भावे




## तीन

लढाईला तोंड लागल्यापासून काही मिनिटातच हूड छिन्नविछिन्न होऊन समुद्रतळाशी गेली आणि प्रिन्स ऑफ वेल्सदेखील अनिवार माऱ्यामुळे काही काळ बेकाम झाली.

'बिस्मार्क' आणि प्रिन्स युजेन मोठ्या दिमाखात आपला दक्षिणमार्ग आक्रमू लागल्या. त्यांचा पुन्हा पाठलाग केल्यावाचून वेकवॉकरला गत्यंतर नव्हते. या वेळी 'बिस्मार्क'ला टोव्हींच्या हाती निरवण्याची महत्त्वाकांक्षा वेकवॉकरने बाळगली होती.

शत्रू माऱ्याच्या टप्प्यात असतानाही, वेकवॉकरने, प्रिन्स ऑफ वेल्सचा कर्णधार कॅप्टन लीच यांच्या संगनमताने त्याचा केवळ पिच्छा पुरवण्याचाच पवित्रा घेतला होता. कारण प्रिन्स ऑफ वेल्सवरील कित्येक तोफा निकामी झाल्या होत्या. त्यामुळे लढाई ह्या आत्मघात ठरला असता. शिवाय टोव्हींचा सुसज्ज काफिला 'बिस्मार्क'ला दुसऱ्या दिवशी गाठण्याची शक्यता

होती तोपर्यंत 'बिस्मार्क' निसटणार नाही अशी दक्षता वेकवॉकरला घ्यावी लागणार होती.

खरे म्हणजे नौदलप्रमुखांनी वेकवॉकरला 'बिस्मार्क'शी दोन हात करण्याची अप्रत्यक्ष सूचना केलीही होती. पण एकंदर परिस्थितीचा विचार करता तिची अंमलबजावणी करणे इष्ट होणार नाही असे वेकवॉकरला वाटले, आणि त्याने नौदलप्रमुखांना तसे कळवलेदेखील. यावर, वेकवॉकरने योग्य तेच केले, असे मत चर्चिलसाहेबांनी व्यक्त केले.

प्रिन्स ऑफ वेल्सने 'बिस्मार्क'च्या तेलटाकीवर केलेला आघात वेकवॉकरला माहीत नव्हता. त्याच्या आणि इतरांच्याही दृष्टीने 'बिस्मार्क' अक्षतच होती. 'बिस्मार्क'वरील मर्माघाताची महत्त्वाची गोष्ट त्याला माहीत असती तर मात्र कदाचित वेकवॉकरने आक्रमक पवित्रा घेतला असता. आणि त्याला ही गोष्ट जवळजवळ कळलीदेखील. पण–

प्रथम सफोकवरून वेकवॉकरला "'बिस्मार्क'वर आग भडकली असून तिची गती मंदावली आहे" असा संदेश मिळाला. बातमी संतोषाची होती. पण इतक्यात आईसलँडहून अकस्मात तेथे प्राप्त झालेल्या संडरलँड जातीच्या एका हवाई जहाजाने (flying boat) 'बिस्मार्क'बद्दल अगदी उलटी बातमी पुरवली : 'बिस्मार्क'वर आगीचा मागमूस नाही आणि तिचा वेग तीस नॉट एवढा आहे. 'बिस्मार्क'च्या तेलटाकीतून तेल गळत असल्याची वार्ताही सफोकने पाठवली होती. पण नॉरफोकवर ती पोहोचली नाही. संडरलँड हवाई जहाजालाही 'बिस्मार्क'ची तेलगळ दिसली होती. परंतु वेकवॉकरला त्याच्या कर्णधाराने जो संदेश पाठवला तो घोटाळा करणारा होता. त्याने कळवले: 'तेलगळ होते आहे.'–'बिस्मार्क'वरून विमान-प्रतिबंधक तोफांनी आग ओकायला सुरुवात केल्यावर संडरलँडने काढता पाय घेतला होता. त्यामुळे वेकवॉकरला वाटले, तेलगळ होते आहे ती संडरलँडची– 'बिस्मार्क'ची नव्हे!

वेकवॉकरच्या हिशेबाप्रमाणे 'बिस्मार्क'ला काहीही झाले नव्हते; आणि उत्तर अटलांटिकमधील अन्नवाहू नौकांची वाटमारी करण्याचा तिचा विचारही अजून बदललेला नव्हता.

हूडची वार्ता कळल्यावर टोव्हींना धक्का बसला. पण त्यातूनच एक नवा निश्चय उदयाला आला. मात्र 'बिस्मार्क'ला गाठण्यासाठी आपल्या व्यूहाची पुनर्रचना त्यांना करावी लागणार होती. 'बिस्मार्क' आणि प्रिन्स युजेन यांचा पुढील पवित्रा काय आहे, हा महत्त्वाचा प्रश्न होता. सकाळच्या लढाईनंतर या दोन शत्रुनौकांची स्थिती नेमकी कशी आहे, याची टोव्हींना यत्किंचित माहिती नव्हती. गंभीर स्वरूपाची दुखापत तिला झाली असेल तर 'बिस्मार्क' दुरुस्तीसाठी फ्रेंच, स्पॅनिश वा जर्मन बंदराकडे वळण्याचा संभव होता. किंवा हूडवरील विजयाचे राजकीय

भोडवल करण्यासाठी ती आपल्या तळावर परतणेही संभवनीय होते. किंवा महा- सागरातच कोठेतरी तेलवाहू टँकरमधून तेलसाठ्यात भर घालून पूर्वीप्रमाणे ती अस्रवाहू नौकांच्या रोखाने जाण्याचा संभवही दृष्टिआड करता येत नव्हता. आणि यापैकी अमूक एकच पर्याय शत्रूच्या-दृष्टीने दुसऱ्या कोणत्याही पर्यायाहून अधिक आकर्षक ठरेल असे मानण्याजोगा कोणताही सबळ पुरावा टोव्हीजवळ नव्हता.

यामुळे सर्वविषयी सावधपणा राखून टोव्हीना निर्णय घ्यावा लागला. 'बिस्मार्क' अमुक एकच मार्ग स्वीकारेल असे ठरवून त्या मार्गावर सारे लक्ष केंद्रित करण्याच्या एकांगी मार्गापेक्षा टोव्हीनी मध्यममार्ग पसंत केला. यातही धोका होताच: 'बिस्मार्क'ला, तिने स्वीकारलेल्या विशिष्ट मार्गावर सर्व शक्ती एकवटून तोंड देणे अवघड होणार होते. परंतु मध्यममार्गक्रमणामुळे, 'बिस्मार्क' कोणत्याही दिशेने गेली तरी ती सर्वथैव निसटून जाणे शक्य नव्हते. टोव्हीचा हा निर्णय कमोडोर ब्रिडला पसंत नव्हता; पण टोव्हीनी त्याची पर्वा केली नाही.

'बिस्मार्क' आणि प्रिन्स युजेन जर्मनीकडे परत फिरण्याची शक्यता लक्षात घेऊन टोव्हीनी निर्णय घेतला होता. पुढील इतिहास टोव्हीचा निर्णय किती योग्य होता याची साक्ष देतो. मौजेची गोष्ट अशी की टोव्हीनी आपला निर्णय घेतला त्याच सुमारास, जर्मनीला परतावे की नाही याविषयी 'बिस्मार्क'वर अधिकाऱ्यांची भवती न भवती चालली होती.

'बिस्मार्क' जर्मनीला परत फिरवावी, असे कमांडर कॅप्टन लिंडेमानचे मत होते. कारण त्यामुळे तिची दुरुस्ती निर्वेधपणे करता येणार होती. शिवाय डॉ. गोबेल्सच्या प्रचारयंत्राला केवढेतरी खाद्य पुरवता येणार होते. परंतु अॅडमिरल लटयेन्सने लिंडेमानचे मत धुडकावून लावले. त्या आधी, जखमी प्रिन्स ऑफ वेल्सवर धसरून तिचा संपूर्ण निकाल लावण्याचा लिंडेमानचा हितकर सल्लाही त्याने धुडकावून लावला होता. स्कीअर आणि हिप्पर या नौकांच्या साहाय्याने यापूर्वी त्याने अटलांटिकमध्ये कितीतरी ब्रिटिश नौकाचा फडशा पाडला होता. 'बिस्मार्क'बरोबर त्याचे पुन्हा अटलांटिक महासागरात आगमन झाले होते; आणि येथून फार दूर जाण्याने ब्रिटिश नौकाची ससेहोलपट करण्याची चालून आलेली संधी वाया जाणार होती. म्हणून लटयेन्सने 'बिस्मार्क' फ्रान्सच्या सेंट नाझेर बंदरात नेण्याचा हुकूम सोडला. तेथे दुरुस्ती करून, तेलटाक्या भरून, पुन्हा अटलांटिकमध्ये मुसंडी मारून हलकल्लोळ करण्याचा त्याचा मनोदय होता. अॅड- मिरल लटयेन्सला युद्धाची नशा चढली होती.

दरम्यान वेकवॉकरचा पाठलाग चालूच होता. वेळोवेळी तो टोव्हीना 'बिस्मार्क'ची वार्ता कळवत होता. काही काळ सारे व्यवस्थित चालले होते. आकाश निरभ्र होते. आणि 'बिस्मार्क'ची तेलगळही माग काढायला मदत करत होती. 'बिस्मार्क' हुलकावणी देण्यासाठी मध्येच आपला मार्ग बदलायची; पण नॉरफोक, सफोक, प्रिन्स ऑफ वेल्स अशा सहजी फसणाऱ्या नव्हत्या.

माध्यान्ह उलटली, आणि ' बिस्मार्क'ला साहाय्यकारी होण्यासाठीच जणु हवामान बदलले. हळूहळू पाऊस पडू लागला. चोहोबाजूनी धुके दाटून आले. मैल दोनमैला-पलीकडील परिसर दिसणे दुरापास्त होऊ लागले. त्यामुळे मध्येच काही काळ ' बिस्मार्क'ची चाहूल नष्ट व्हायची. पुन्हा काही वेळाने तिचा तलाश लागायचा. सफोकवर अतिसंवेदनक्षम रडारव्यवस्था होती; म्हणून वेकवॉकरला फारशी चिंता करण्याची जरूर वाटत नव्हती.

असा काही काळ गेला आणि वेकवॉकरला अचानक कसलीशी अनामिक हुरहूर वाटू लागली. कसे कोणास ठाऊक, पण ' बिस्मार्क ' आता डाव्या बाजूला वळणार असे वेकवॉकरला वाटू लागले. वास्तविक तशी कोणतीही सूचक चिन्हे दिसत नव्हती; पण तरीही त्याला त्याचे मन तसे सारखे सागत राहिले. शेवटी त्याने नॉरफोकच्या कमांडर फिलिप्सला आपल्या मनाची इशारत सांगितली आणि त्याप्रमाणे आपली क्रूझर डाव्या बाजूला वळवली. वेकवॉकरच्या अंदाजाप्रमाणे डाव्या बाजूला न वळता ' बिस्मार्क ' सरळ मार्गक्रमण करत राहती आणि वेक-वॉकर एकटाच वळता तर त्याचा ' बिस्मार्क 'शी संपर्क तुटण्याचा धोका उद्भव-णार होता. परंतु बऱ्याच वेळाने धुक्याचा पडदा उचलला गेला आणि खरोखरच ' बिस्मार्क ' अवघी आठ मैल दूर होती ! म्हणजे वेकवॉकरला हुरहूर वाटू लागली त्याच सुमारास ' बिस्मार्क 'ने आपला मोहोरा डाव्या बाजूला वळवला होता. आपला आतला आवाज जर वेकवॉकरने मानला नसता तर बदललेल्या मार्गाने जाणाऱ्या ' बिस्मार्क 'च्या तावडीत तो आयताच सापडला असता. रडारचे काम करणारे मन लाभण्याचे भाग्य काही साऱ्याच नौदल-अधिकाऱ्यांच्या वाट्याला येत नाही !

आठ मैल हे ' बिस्मार्क 'च्या तोफमाऱ्याचा विचार करता सुरक्षित अंतर नव्हते. म्हणून वेकवॉकरने झपाट्याने नॉरफोक धुक्याच्या आवरणाआड नेली. यथाकाल पुन्हा पंधरासोळा मैलाचे अतर ठेऊन तो पाठलाग करू लागला.

' बिस्मार्क ' डाव्या बाजूला वळल्यामुळे, आता तिला गाठणे टोव्हीना अधिक शक्य झाले होते. नवीन मार्गाने जाणारी ' बिस्मार्क ' जर्मनीला नक्कीच निघाली नव्हती. मग कोठे ? – उत्तर अटलांटिकमध्ये जर्मन पाणबुड्या संचार करत होत्या. त्यांच्या काळमुखात तर ती टोव्हीच्या काफिल्याला नेत नव्हती ना ?

दरम्यान सर्व दुपारभर ' बिस्मार्क 'चा पाठलाग चालू राहिला. कधी नॉरफोकचा शत्रूशी संबंध तुटे तर कधी सफोकच्या रडरवरील ' बिस्मार्क ' आणि प्रिन्स युजेन याची दर्शकचिन्हे अदृश्य होत. पण दोहोपैकी एक क्रूझर तरी शत्रूवर नजर ठेऊन होतीच. पण आता ' बिस्मार्क ' जसजशी अधिकाधिक दक्षिणेकडे जाऊ लागली तसतसे पाठलागाचे काम अधिक बिकट झाले. ' बिस्मार्क 'ला युद्धात खेचण्याची

[ पृष्ठ ५२ वर ]

# विचार धारे

समीर

## ◻ पार्किन्सन उवाच

प्रा. नॉर्थकोट पार्किन्सन यांनी दिल्लीतल्या प्रमुख भाषणात व पत्रकार-परिषदेत मांडलेले उपहासगर्भ पण मार्मिक विचार गेल्या अंकात दिले. इतर ठिकाणी बोलतानाही त्यांनी निरनिराळ्या विषयांवर असेच काही मर्मभेदक विचार सोदाहरण मांडले त्याची वानगी :

एक उच्च सरकारी अधिकारी सकाळी ऑफिसात आला की रोज आपल्या सहाय्यकाला बजावीत असे, 'नियम सहा विसरू नकोस.' सहाय्यक मान डोलवून उत्तर देई, 'होय साहेब.' हा प्रकार काही दिवस सतत चालल्यावर सहाय्यकाने धीर करून विचारले, पण साहेब, नियम सहा काय आहे?' साहेब म्हणाले, 'तो नियम म्हणजे कुठल्याही गोष्टीला फाजिल महत्त्व देऊ नये.' सहाय्यक म्हणाला, 'नियम खरोखरीच चांगला आहे.' आणखी काही दिवसांनी सहाय्यकाने विचारले, 'साहेब, पहिले पाच नियम काय आहेत?' साहेब उत्तरला, 'आणखी कुठलाच नियम नाही।'

कुठल्याही सरकारी समितीचे कार्य हे संडासात घडणाऱ्या कामासारखे असते. प्रथम 'बैठक' होते, मग 'रिपोर्ट' होतो (श्लेष : रिपोर्ट म्हणजे अहवाल, त्याचप्रमाणे 'आवाज'), अन् शेवटी 'मॅटर' 'ड्रॉप' करण्यात येते.

हल्लीची विश्वविद्यालये इतरांना 'शास्त्रशुद्ध सल्ला' देण्यात गुंतली आहेत, पण तो स्वतःला लावायचे त्यांच्या लक्षात येत नाही. परिणाम असा झाला आहे की ज्ञान, अध्ययन इत्यादि गोष्टींशी काडीमोड घेतलेली मंडळी उपकुलगुरू होऊन बसली आहेत.

आफ्रिकन देशांतल्या बहुतेक सर्व लष्करी क्रान्त्या लेफ्टनंट-कर्नल असलेल्या अधिकाऱ्यांनी घडवून आणल्या आहेत. कारण लेफ्टनंट-कर्नलच्या हाताखाली प्रत्यक्ष फौज असते तर वरच्या अधिकाऱ्याच्या हुकमतीत फक्त हेडक्वार्टर असते. दोन लेफ्टनंट-कर्नल म्हणजे एक लष्करी क्रांती असे समीकरण मांडायला हरकत नाही.

इतिहासाची कधीच पुनरावृत्ती होत नसते, पण इतिहासकार एकमेकांची पुनरावृत्ती करीत असतात.

'समिती-शास्त्र' हा जीवशास्त्राचा एक पोट-विभाग असून त्यात समित्यांच्या जीवन-मरणाचे अध्ययन असते.

## ◻ राष्ट्रीय समस्यांवर रामबाण उपाय : शिक्षण.

प्रा. पार्किन्सनच्या मागोमाग भारतात आलेली आणखी एक प्रमुख ब्रिटिश व्यक्ती म्हणजे भूतपूर्व उपप्रधानमंत्री व जगप्रसिद्ध ट्रिनिटी कॉलेजचे प्रमुख लॉर्ड बटलर. 'उच्च शिक्षणावर राष्ट्राचे जीवन अवलबून असते' या विषयावर 'आझाद मेमोरियल भाषण' देताना त्यांनी प्रकट केलेले विचार :

देशाच्या समस्या सोडवायच्या असतील तर पैसे गुतवले पाहिजेत ते शस्त्रास्त्रात नव्हे, इतकेच काय पण धान्योत्पादनातही नव्हे, किंवा मोठमोठ्या उद्योगधंद्यात नव्हे, तर प्रामुख्याने शिक्षणात. भारतासारख्या प्रगतिशील देशानेच काय पण प्रगत देशानीही शिक्षणावरील आपला खर्च अगदी संरक्षणावरील खर्चाइतका ठेवला पाहिजे. शिक्षणाचा प्रश्न हा राष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. प्रगत देशापेक्षाही प्रगतिशील देशाना ज्ञानाचे व तंत्रज्ञानाचे महत्त्व अधिक आहे, म्हणून त्यानी शिक्षणाला आर्थिक विकासाच्याही वरचे स्थान दिले पाहिजे.

मात्र उच्च शिक्षणासाठी पैसे पुरवताना सरकारने विश्वविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नोकऱ्याची सोय केली पाहिजे. शिक्षण जेवढ द्रव्यार्जनाभिमुख असेल तेवढे विद्यार्थ्यांमधले असमाधान कमी होईल. कुठल्याही देशाला बेकार सुशिक्षिताची भाऊगर्दी पेलणार नाही.

विश्वविद्यालयाची स्वायत्तता त्याना सरकारपासून दूर ठेवूनच राखता येईल. विश्वविद्यालयाना एखाद्या विशिष्ट दिशेने ओढीत नेण्याची विश्वविद्यालय अनुदान आयोगाची वृत्ती वाढत आहे. तिच्यापासून सावध राहिले पाहिजे. भारतासारख्या विस्तीर्ण देशात रेडिओ व टेलीव्हिजनचा उपयोग शिक्षणाचे साधन म्हणून करणारे 'खुले विश्वविद्यालय' फार उपयोगी पडू शकेल. अर्थात त्यासाठी आधी या दोन्ही साधनाचा देशात नीट विस्तार व्हायला पाहिजे.

बटलर याना एका पत्रकार-परिषदेत इतर विषयावरही प्रश्न विचारण्यात आले; त्यावेळी त्यानी दिलेली काही उत्तरे :

- इनॉक पॉवेलच्या अतिरेकी इमिग्रेशन धोरणाशी हुजूर पक्ष सहमत होण्याची शक्यता नाही. या पक्षाच्या नेत्याला व इतर सदस्यानाही हे धोरण मान्य नाही. पण इमिग्रेशनवर नियत्रण आवश्यक आहे. याचे एक कारण म्हणजे ब्रिटनमध्ये राहण्याची सोय व इतर सोयीही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. दुसरे म्हणजे 'इमिग्रट' बरोबर 'डिपेंडट' किती यावेत यावरही नियत्रण आवश्यक आहे, कारण हिंदु संयुक्त कुटुब-पद्धतीत 'डिपेंडंट' याचा अर्थ सैलपणे लावण्यात येतो.

—भारताने अणुबाँब करावा की नाही ? पुरेशी साधनसामग्री असेल तर भारतानेच काय ते ठरवावे. मात्र ब्रिटनजवळ अणुबाँब नसता तर ब्रिटनला कोणी विचारले नसते हे खरे आहे, पण अणुबाँब बाळगणाऱ्या कुठल्याही देशाने त्याचा 'आक्रमक' उपयोग केला तर तो देश मानवी संस्कृतीचा विनाश घडवून आणायला मदत करील.

◻ ◻ ◻

आठ-दहा दिवस झाले त्या गोष्टीला.

रविवार सकाळ. न्याहरी चाललेली असते. नव्हे माझी संपत आलेली असते. एकदम विषयाला कलाटणी मिळते. मित्र म्हणतो, 'आज रात्रीं Stay–Longer ला जाऊं या का ?'

'पैसे फार झाले वाटतं ?' ह्याचा आवाज.

लगेच लक्षात येऊन मी घाईघाईने वेसिनशी जाऊन हात धुऊन दिवाणखान्यात जाते. हो, असून अडचण होणार होती. नाही म्हटलं तरी माझं मास्तर-मन. एक दोन नव्हे चांगली दहा वर्षे मास्तरकी करून त्यावरच गुजराण केलेली. फक्त जेवणाकरता-म्हणजे माझ्या दृष्टीने फक्त जेवण–कॅबेरे भानगड कुठे माहित होती मला–७०-७५ रु. खर्च करायचे म्हणजे...

जाना दो. ह्या लोकांचं वागणं अंगवळणी पडायला काही वर्षे जावी लागणार.

मी वर्तमानपत्र धरून वाचते. तरी शब्द कानावर पडतात.

'जाऊं या रे, कध्धीचं चाललंय्'

'अरे, नको रे, तिला आवडणार नाही' ह्याचा आवाज.

# Chai

**सौ. पद्मा साठे**

'आता अशोक फार बदलला हं. पूर्वी कसा चटकन् हो म्हणत असे'–इति मित्रपत्नी.

ऐकूं येऊं नय म्हणून धडाडकन् रेडिओ सुरूं करते मी.

२–४ ध्वनिमुद्रिका होताच सर्वजण दिवाणखान्यात येतात. मी जरा सावरूनच बसते. कोण जाणे. आताच निर्णय करावा लागतो की काय ही चिंता. पण तांत्रिक विषयांवर गप्पा चालू असतात. तेवढंच बरं.

'अरे अशोक, तू दिलेल्या design मुळे दर Piece मागे किमान २० पैसे वाचतात बघ.'

'अरे, कध्धीचा सांगत होतो. पण तुला म्हणजे नवीन स्वीकारायला फार वेळ लागतो. आता Lapping का करून बघत नाहीस ?'

'मग तूं ये फॅक्टरीत, आपण बघूं.'

'ए, अशोकनी तुझा येवढा फायदा करून दिलान्, त्याला काही द्यायला नको का ?'–मित्रपत्नी.



'हॅट्, त्याला काय द्यायचं ?...हां, म्हणून तर म्हणतोय आज रात्री जाऊं या Stay–Longer मध्ये.'

'मला आज फार झोप येते आहे रे'–ह्याचं गुळमुळीत उत्तर.

'दुपारी भरपूर झोप काढ, आणि जाऊं या'

'बरं, संध्याकाळी ७ पर्यंत येतो. मग ठरवूं या.'

घरी गेल्यावर थोड्या वेळाने बिचकतच विषय निघतो. 'आज जावं लागणार संध्याकाळी. काय करावं ? नेहमी कसं ग नाही नाही म्हणायचं ?'...

'ए, बोल ना ! जायला हवं ग. अग, कॅबेरे म्हणजे ऑकवर्ड वाटलं तरी'

'Please, आज मला बरं वाटत नाहीय्. मी आले नाही तर...?'

नुसतीच शांतता. विचित्र शांतता.

'च्, ए, नेहमीचा उत्साह येऊं दे. मी येणार आहे. खरंच अगदी मजेत येणार आहे.'

'खरंच' 'बघ तर खरं,' अन् घर परत हसाय-खेळायला लागतं.

संध्याकाळी नटून तयार होते. स्लिव्हलेस घालायचं रद्द करते. शक्य तो आपलं सर्व अंग झाकलं जाव असं वाटतं. नाईटक्लबच एवढं का वाटावं हेच कळत नाही. रमेश मंत्रीचे कितीतरी लेख वाचले आहेत. सिनेमात थोडंफार बघत नाही का? मनाचा इतका गोंधळ का उडावा? आता तयार झालो आहोत. तर खुषीनं वागायला हवं आपल्या वागण्यामुळं इतराचा विरस होता कामा नये. किती वेळा मनाला बजावल तरी धाकधुक वाटते आहे. काहीतरी विचित्र पहाणार आहोत. पण घडणार काहीच नाही हेही ठाऊक आहे.

पहिल्यांदा शिकायला बाहेर राहल्यावर पुण्याला जीवनमध्ये जाताना उत्सुकता होती. थोडं ऑकवर्ड वाटल होतं. आता हॉटेल्स म्हणजे काहीच वाटेनासं झालय्. तरी बार रेस्टोरांमध्ये जाताना दचकलोच होतो आपण. आता त्याचही काहीच वाटत नाही. दरवेळेस, 'ए, बीअर तरी घे ना थोडी' असा आग्रह होतो. पण साध्या Colddrink वर भागतं. आता कॅबेरे. पण फार विचित्र होतय्. कळत नाही काय पाहणार ते?

सगळेच अननुभवी. लवकरच जातो. एकदा आत गेल्यावर इतर लोकांवर माझी दृष्टी जाते. २–४ घरंदाज जोडपी पाहून माझा जीव निम्मा ठिकाणावर येतो. टेबल रिझर्व असल्यामुळे भटकून याव अस सर्वांनाच वाटत. आरामात ९॥ ला टेबलावर येतो. मदसा उजेड. हळूहळू डोळे सरावतात. भोवताली पाहतात. अजून काही टेबल रिकामी आहेत. शेजारी प्रौढ पंजाबी बसले आहेत चारजण. पलीकडच्या टेबलावर चौकोनी कुटुंब आहे. बाळ, बेबी, आई, बाबा. पलीकडे मित्र-मैत्रिणीचा कॉस्मॉपॉलिटिन ग्रुप दिसतो आहे. तितक्यात एक टोळकं येतं. चित्रकार वाटतात. हॅपी गो लकी प्रकारातले. दाढीवरून. हळूहळू वेटर येतो. मेणवत्ती व्हिस्किबॉटलवर लावतो. ऑर्डर लिहून घेतो. केव्हा जेवण आणू म्हणून विचारतो. १०॥ वेळ ठरते. तोपर्यंत कोको-कोला व बीअर हवी असते. 'को-क्को'वाली व 'घासपाला'वाली मी एकटीच असेन बहुधा.

एकदम ठण्णाणकिनी आवाज होतो. मूनरॅकर्स ओरडायला नव्हे गायला लागतात. येवढासा हॉल. पण यत्किंचितही खोलीच्या आकारमानाचा विचार न करता आवाज कोसळत असतात. त्यात संगीत सापडणंच कठीण.

एकदम शरीर आखडतं. इतका वेळ भोवतालची हवा थंड होती पण शरीर आताच सकोचत. पण प्रकाशित वर्तुळात काहीच घडत नाही. एक-दोन-तीन गाणी बडवल्यावर हळूहळू २–३जोडपी येऊन नाचायला सुरुवात करतात. एका जोडप्याला तर काहीच येत नसतं. उगीचच अंगाला अंग घासताहेत असं वाटतं. फुटवर्क वगैरे भानगड तर कुठेच दिसत नाही.

'अरे, त्यांच्या स्टेपस् अगदी शिमग्यातल्या नाचण्यासारख्या दिसताहेत, नाही?'

लगेच गतवर्षीची पुण्यातली एक लग्नाची मिरवणूक आठवते. लग्नाची जाहि

रातच ती. नाच्ये पोऱ्ये असेच चालले होते. तेव्हा आपण म्हटलं होतं, 'काय अभिरुची ही!'

अशीच २–४ गाणी होतात. को-का अर्धा सपतो. बीअर संपत आलेली असते. तितक्यात दिवे मंदावतात. अनाऊन्समेंट होते. दाराकडे प्रकाशाचा झोत जातो. पारदर्शक काळे वस्त्र पांघरलेली स्त्री लचकत लचकत येते. सर्वांचे डोळे तिकडेच. मीही सावरून बसते. हळूहळू गोल गोल फिरते. अंग लचकवते. अवगुंठन काढून टाकते. नाईट गाऊनसारखा प्रकार अंगावर असतो. तोही काढून टाकते. फक्त अंतर्वस्त्र राहतात. सर्वांना सर्वांग थरथरून दाखवते. खूप लाजल्याचा अभिनय करते. अन् हळूहळू परत जाते. एकदम मन सैल होतं. किती भ्यायलो होतो! एवढच होत तर. मग जेवणावर चर्चा सुरू होते. ११ वाजून गेलेले असतात. अजून जेवण का नाही? वेटरला घाईघाईने बोलावल जात–ए, जेवण आण, वगैरे. परंतु कोणाच्याच टेबलावर जेवण नसत. इतकावेळ कोणाचंच जेवणाकडं लक्ष नसतं.–पण आता– वेटर्सची धावपळ–

'अशोक, अजून सेकंड कॅबेरे आहे ना!'

'काय पाह्यच रे त्यात?'


'तरीपण, आलो तर पाहू या.'

'जेवण तर घेऊ, मग बघू'...वगैरे वगैरे हळूहळू वाद्य संगीत मंद होतं. जेवण मांडल जातं. पदार्थ येतात. परत एकदा आवाजाचा अतिरेक होऊन डान्ससाँग्ज् सुरू होतात. 'नृत्यसंगीत' हे सुदर नाव डान्ससाँग्ज्ना द्यायला आतल्याआत मन तयार होत नाही. पहिलं गाणं सपायच्या आतच २–३ जोडपी येतात. एक बाई खरच छान नाचते आहे. पदन्यास पहावेसे वाटताहेत. शरीर लयबद्ध हलत आहे. नुसतं सेक्सी नाही. दुसऱ्या गाण्याला तिचा जोडीदार बदलतो. 'पार्शी नोज् आहे ना!' 'पार्शीच असणार तो' दोघं खरच गतिमान आहेत. प्रेक्षकातून आणखी आणखी जोडपी उठताहेत. जोडीदार बदलले जाताहेत. वेग येतोय गाण्यांना. एक मुलगी किरट्या आवाजात गाते आहे. कॉल गर्ल असावी. बेचव अन्न कोण जाणे काय आहे असं म्हणून एखादा घास खातो आहोत. परत दिवे जाऊन मंद मंद प्रकाश पडतो नृत्यस्थानावर. दुसऱ्या भागाला सुरुवात झाली तर. परत खूपच धाकधूक वाटायला लागते. प्रकाश दरवाजाकडे जातो. मीनी पोषाख घालून मधाचीच जोसेफीन वाँग येते. प्रथम नाचत नाचत टेबलांशी जाते. स्कर्ट फेकून देते. अतर्वस्त्रात सर्व टेबलांशी हिंडते नव्हे नाचत येते जाते. अतिशय सेक्सी अभिनय करते. तिच्याबरोबर प्रकाशाचा झोत असतोच. त्यामुळे सगळ्या प्रेक्षकांचे चेहरेही एकमेकांना दिसून जातात. कोणाशी गप्पा करते. हास्याचे फवारे उठतात. तिच्या प्रमाणबद्ध गौरशरीराची रेषन्रेष हलवून दाखवते आहे. ती मध्यावर जाते. हृदयाचे ठोके आपले आपल्यालाच ऐकू येतात. तिचं फालतू ॲक्टींग झाल्यावर

अंतर्वस्त्र हळूहळू एकेक काढते. मधल्या भागावर बसून लोळण घेते. हे सर्व भरभर का होत नाही ! आता इतरांना आपला श्वास ऐकू जाणार. भिऊन मी इकडे तिकडे बघते. सर्वांचे लक्ष्य एकच. अशोकचं लक्ष आपणाकडे. आपण परत सावरून तिच्याकडे बघतो. एवढ्यात ती उभी राहते. वस्त्र पांघरते. अंधार होतो. ती बाहेर जाते.

शरीर गोठून गेलं आहे. इथून लवकर बाहेर पडावसं वाटत आहे. सर्वांचं जेवण झाल्यासारखंच आहे. बिल देऊ या चटकन्. मी खूप अस्वस्थ होते आहे.

तितक्यात तीच शेजारच्या रिकाम्या टेबलाशी येऊन बसते. तिच्याकडे बघायची पण शरम वाटते आहे. प्रत्येकजण चोरून बघतो आहे आणि आपण त्या गावचे नाही अशा थाटात एकमेकांशी गप्पा सुरू होताहेत. मघाच्या चित्रकार टोळक्याने चालतू विनोद केलेले असतात; पण त्यांच्यापैकी एकालाही तिच्याकडे पहाण्याचा धीर होत नाही. वेटर येऊन तिला काय हवं ते विचारून जातो. ती डोळ्याचा मस्करा सारखा करत असते अन् गंभीर हंसते, आपण केवढ्या दचकतो. म्हणजे हिलाही गंभीरपणा वगैरे आहे तर. सुरेख शरीर अन् त्याचा विक्रय हे जगायचं भांडवल आहे तिचं. नाहीतरी सर्व स्त्रियांचं काय ? छे. काहीतरी डोक्यात होतं आहे. चला नं लवकर. नशीब. उठले सर्वजण. कित्ती अफाट गोठलो आहोत. स्कूटर-वर बसल्यावर नेहमीसारखा हातही टाकावासा वाटत नाही. स्वतःचीच लाज वाटायला लागली आहे. घर लवकर यायला हवं. ' मॉडर्न तमाशा नाही का ग ?' उत्तर द्यावसंच वाटत नाही. कशी बधीरता आली आहे. 'कां ग, बोलत कां नाहीस ? फार थंडी वाजते का ?' 'नाही रे, स्वेटर आहे ना !' 'मग काय वाटलं तुला ?' 'अरे, तमाशा कसला हा ! तमाशात निदान नृत्य न् संगीत तरी असतं.



हे काय ? जाऊं दे, आतां बोलायचं नाही काही, आता घरी गेल्याबरोबर मला झोपायचं आहे हं ! ' हो, सूचना दिलेली बरी. चर्चा, मतं काही नको आहेत मला. डोकं भणभणायला लागलं आहे.

झोपायचं सोंग घेतलं आहे. पण झोप येत नाही आहे. अशोकला जाणीव आहे ' ए, आता झोप. २ वाजले बघ. विसर अन् झोप. ' तोंड वळवून गप्प पडून रहातो आपण. डोकं सणकायला सुरुवात झाली आहे. स्त्रियानी शरीर द्यावं अन् जगावं. आपण लग्न झालेल्या स्त्रिया तरी काय करतो ? शिवाय दिवसा घर सांभाळतो... एवढच का ? एवढच तर ! कशाला आपण स्त्री झालो ? पण आपण पुरुष असतो तर...तर काय ? फक्त आपल्याच माणसाला शरीर देण्यात पवित्रता आहे. आहे का ? काय होतंय् डोक्यात ? जाना दो. थंडपणे जगाकडे पाह्यला आपल्याला कधी येणार ? रोजच नव्हे तर इतिहासपूर्वकालापासून हे सर्व प्रकार चालू आहेत आपण स्त्रीची शिल्पकृती पहात नाही का ? ही फक्त हलणारी होती.

उठून ॲनासिन घेतल. घटाघटा पाणी ढोसल हळूहळू शात झाले. ती पैसे मिळवते आहे. मी का चिंता करावी ? भिकारी ओरडत असले तरी आत मजेत जेवतोच ना आपण ! तसंच हे. स्त्रीत्वाची लाज वाटायला नको. परत काय होतं डोक्यात ? डोकं आहे का काय आहे ? पूर्वीच्या स्त्रीसारखी असते तर देवाजवळ बसून मन शात केल असतं–पण आपला विश्वास आहे का ? काय करू ? दोन सॉरिडान गिळाव्यात.

शरीर देणं अन् जगणं येवढच होतं तर ७–८ वर्षे आपण आणि अशोकनी अट्टाहास का केला ? इतर काही तडजोड पत्करायलाच आपण तयार नव्हतो ? त्याला काय दुसर शरीर मिळालं नसत ? पण आजचं समाधान मिळालं असतं कां ? पुढची स्वप्न, काहीतरी नवीन संशोधन करण्याची उमेद खचली नसती का ?

डोकं शांत होतं आहे. जीवन काही का असेना. आपण पटेल तसं जगावं. हळूच हात डोकं दाबायला सुरुवात करताहेत. ' आपण काही वाचूं या का ?' ' नको, मला झोप येते आहे ' ' मघापासून म्हणते आहेस अन् केवढी अस्वस्थ आहेस. वेडी, झोप आता ? आणि हात माथं शात करतात. ' दुपारचं Mod–Algebra तील उदाहरण सुटलं कां ?'......, ' ते सोडव बरं. विचार कर, ' खरच...काय होतं बरं ते......'



# सात नव्या कादंबऱ्या

विश्वकर्मा साहित्यालयाने सात नव्या लेखकांच्या नव्या कादंबऱ्या गेल्या वर्षी एकदम प्रसिद्ध केल्या आहेत. साती लेखक नव्या उत्साहाचे, ताज्या दमाचे आहेत; आणि या सातही कादंबऱ्या नव्यानव्या आकृती रेखणाऱ्या आहेत. कथा-प्रधान, व्यक्तिप्रधान, संघर्षप्रधान अशी सारी रूपे त्यात आलेली आहेत. चटकदार कथेपासून संवेदनाग्राही मनोविश्लेषणापर्यंत सारे प्रकार त्यात सामावलेले आहेत. प्रा. ल. ग. जोगांसारख्या अनुभवी नि अभ्यासू प्राध्यापकांपासून तो श्री. शेणई, श्री. हिदायत खान यांसारख्या अगदी तरुण लेखकांपर्यंत विविध व्यक्तिमत्त्वांचे हे सात लेखक आहेत. आणि या साती कादंबऱ्यांतून रेखाटलेले जगही निरनिराळ्या प्रकारचे, निरनिराळ्या स्तरावरील आहे. त्यात गलिच्छ झोपटपट्टीही आहे, महा-विद्यालयीन उथळ वातावरणही आहे, आणि अमेरिकेचे व्हाईट हाऊसही आहे. त्यातल्या सूत्ररूप समस्याही निरनिराळ्या पातळीवरील आहेत. जीवनमरणाचा विदारक प्रश्न 'बावर'मध्ये दिसेल, तर राजकीय पातळीवरील फार मोठ्या लष्करी कटाची हकीगत 'मेतील सात दिवस' दाखवतील. सामाजिक, वैयक्तिक, भावनिक असे विविध ताण या सात कादंबऱ्यात गुंतलेले आहेत. अशा या सात कादंबऱ्या प्रकाशकांनी मोठ्या योजकतेने निवडल्या आहेत असे मला वाटते. आजच्या कादंबरीलेखनातले हे विविध प्रवाह त्या निमित्ताने एकत्र बाहेर पडले आहेत. अर्थात हे अगदी नव्या पद्धतीचे लेखन नाही. पण विस्कळीत आणि अनियमित वाङ्मयनिर्मितीच्या आजच्या काळात निदान हे विविध प्रवाह तपासून पाहणे मोठे उद्बोधक ठरणार आहे. त्या दृष्टीने या कादंबऱ्यांचा थोडासा एकत्र विचार येथे केलेला आहे. अर्थात त्या त्या कादंबरीचे पृथगात्म वैशिष्ट्य शोधण्याचा हा केवळ कौतुकाचा प्रयत्न आहे. जास्त खोलवर चिकित्सा करण्यास येथे अवकाश मिळालेला नाही.

---

**निशिकांत मिरजकर**

---

काळोख आणि किरण । ल. ग. जोग
अंधाराचे अश्रू । हिदायत खान
'मे' तील सात दिवस । नरुभाऊ लिमये
कोहिमा । केशव केळकर
बावर । प्र. ना. शेणई
प्रतीक्षा । प्रभाकर पेंढारकर
प्रतिष्ठा । अनत मनोहर

---

विद्यार्थिजगातील
भावनिक
ताण

## काळोख आणि किरण

ल. ग. जोग

---

कॉलेजातून निवृत्त होणाऱ्या एका प्राचार्याच्या स्मृतिविश्वातून या कादंबरीचे संविधानक गुंफलेले आहे. आजच्या महाविद्यालयीन जीवनातल्या विविध वास्तव पातळ्यांचे एका वेगळ्याच दृष्टीने केलेले हे आलेखन आहे. इथे बेजबाबदारपणा, निर्मूल्यता, विध्वंस यांच्या जोडीने माणुसकी, प्रीती यांचेही रेखन झालेले आहे. आणि हे सारे निवेदन एका जबाबदार सवेदनाक्षम प्राचार्याच्या विलक्षण जिव्हाळ्याच्या भूमिकेतून केलेले आहे. त्यामुळे जिव्हाळा आणि अलिप्तपणा या दोहोंचा सुरेख समन्वय या निवेदनात झालेला आहे. एका दृष्टीने, विविध प्रसंगांचे आणि त्या अनुरोधाने गुंतवलेल्या कथासूत्रांचे हे पॅचवर्क आहे. पण कादबरीची विषय-प्रवृत्तीच अशी आहे, की हे पॅचवर्कच तिला अधिक चागला न्याय देते. प्राचार्य फाटकाच्या निवृत्तिसोहळ्याच्या वर्णनाने कादबरीला सुरुवात होते. एकेक स्मृती त्याच्या मनात उचबळून येऊ लागते, आणि त्या निमित्ताने कादबरीत एकेक कथा-सूत्र गुतत जाते. म्हटले तर प्रत्यक्ष म्हटले तर अप्रत्यक्ष असे त्या त्या कथासूत्राचे आविष्करण लेखकाकडून केले जाते आणि कादंबरी आकार घेऊ लागते. पण हा आकार बांधेसूद, रेखीव नसतो. तो काहीसा विस्कळीत, तरीही सोपा असा असतो.

कॉलेजातल्या फटाकेबाज उत्साहाचे हलकेफुलके वर्णन आणि एखाद्या जीव-घेण्या प्रसगाचे धीरगभीर वर्णन जोगानी सारख्याच समर्थपणे केलेले आहे. सूक्ष्म निरीक्षण, काहीशी अलिप्तता आणि एका ठराविक रेषेतून साधलेली समरसता यामुळे हे शक्य झालेले आहे. एक प्रकारच्या सुजाण अलिप्तपणाने विविध प्रसग आणि व्यक्ती यांच्या आकृती जोग चितारीत जातात; पण त्याच्या समरसतेची

तीव्र रेषा मधूनमधून या प्रसंगातून आरपार भेदून गेलेली असते; आणि ते ते बिंदू मग विशिष्ट तीव्रतेने उजळतात....'पोहायला येणारे कुणाला हात देऊन जगवण्याची कोशीस करीत होते. त्या क्षणी भाषेला 'मला जगवाल का' ह्याच एक अर्थ होता. थरथरणाऱ्या हातांना, बावरून गेलेल्या डोळ्याना हा एकच प्रश्न विचारायचा होता. पाय जमिनीला लागत नव्हते. पाण्याच्या पृष्ठभागावर पाय पुढे सरकून माणसं उताणी पडत होती. वस्त्राचं भान नव्हत. जगणं नि जगवणं याखेरीज आयुष्यात दुसरं काही उरलंच नव्हत....' यासारख्या ठिकाणी हे बिंदू स्पष्टपणाने जाणवतात. पाल्हाळ कटाक्षाने टाळल्यामुळे असे बिंदू अधिकच स्पष्ट नि ठळक कोरले जातात. असे अनेक.

आजच्या विद्यार्थिजगतातल्या एकेक 'अचाट' गोष्टी कादबरीच्या कथासूत्रात आपोआप आलेल्या आहेत. नलू आणि विजय ट्रिपमधून मागे राहून परस्पराचा मुक्त प्रणयसहवास अनुभवतात. माणिकच्या लाबसडक वेणीचा झुवका वर्गात कापला जातो. कॉलेजच्या गॅदरिंगमध्ये दगा, विध्वंस आणि बीभत्सपणा याचे थैमान माजते. राष्ट्रासाठी विद्यार्थी अहमहमिकेने मदत जमवतात आणि एखादी मध्यमवर्गीय कॉलेजकन्यका बेहोषपणे सोन्याची चेन देऊन टाकते . अनेक प्रसंगांतून आजच्या विद्यार्थीजीवनावर प्रकाशाचे झोत पडत राहतात नि त्यातून आजच्या विद्यार्थ्यांचे एक निराळेच व्यक्तिमत्त्व साकार होऊ लागते. अनेक पदरी असूनही दिशाहीन असणारे व्यक्तिमत्त्व. उराशी जपलेला चांगुलपणा आणि परिस्थितीचा प्रतिक्रियात्मक कडवटपणा याचा सतत सघर्ष शोधणारे, सहन करणारे व्यक्तिमत्त्व. क्षणावर प्रेम करणारे क्षणजीवी व्यक्तिमत्त्व.

यातून विविध प्रकारचे 'नमुने' जोगानी कादबरीच्या प्रवाहात निर्माण केलेले आहेत विद्यार्थिजगाशी संबधित असणाऱ्या कार्यकारणरूप परिस्थितीचे प्रतिनिधित्व हे नमुने करतात. त्यात प्रेयसीबरोबर विवाहपूर्व प्रणयसुख अनुभवणारा आणि पुढे प्रेमभंगाने खरोखरीचा वेडा होणारा विजय आहे, तसाच आघाडीवर उजवा हात गमावूनही माणिकच्या प्रेमनिष्ठेने सुखी होणारा प्रकाश आहे. उत्तम शिकवणारा एक प्राध्यापक पैसे घेऊन कुणालाही पास करतो. जुगाराच्या आकड्यावर पैसे घेतो. अफरातफरी करतो. सैन्यात शिरलेला एक तरुण घरच्या परिस्थितीला नि वातावरणाला वैतागलेला असतो. जीवनाविषयी बेफिकिर बनलेला असतो. बीभत्स परखडपणाने आई, वडील, बहीण याविषयी बोलतो. दुसरा एकजण स्वप्नाळू ध्येयवृत्तीने भारलेला असतो. नाजुक स्वप्नाळूपणा व कठोर वास्तव यातला विरोध तो पचवू शकत नाही. प्राचार्य फाटकाचा मुलगा मुकुदा गैरसमजाने पित्यावर कायम चिडलेला राहतो. पित्याच्या लोकप्रियतेशी अकारण शत्रुत्व करतो. मनोगंडाने पछाडला जातो नि त्या भरात मैत्रिणीवर बलात्कार करून तिचा खून करतो. राघव कुलकर्णी जीवनाचा विचार करताकरता अचानक रामदासी बनून

जातो. भगवी कफनी पेहरून गुरूच्या आज्ञेखातर परीक्षेला नाइलाजाने बसतो. असे कितीतरी नमुने विद्यार्थिविश्वाच्या आजच्या विलक्षण भावजीवनाची चौकट तयार करतात. माणिक-प्रकाश, विजय-नलू, ललित-मुकुदा, एकाकी राघव ही आजच्या तरुण पिढीची प्रातिनिधिक वर्तुळे त्या चौकटीत वेगवेगळया कक्षातून गरगरत राहतात. त्या सर्वांच्या केंद्रस्थानी प्राचार्य फाटकांचे संवेदनाक्षम समर्थ व्यक्तिमत्त्व असते. तो सर्वांचा 'न्यूक्लिअस असतो. कादबरीचाही. त्यामुळेच त्यांच्या स्मृतितरंगांतून कादबरीचे निवेदन केले जाते; आणि वेगवेगळया वाटणाऱ्या अनेक तुकडयांतून हळुवारपणे धागा जोडून घेता येतो.

काही प्रसंगाचे, भावनिक ताणांचे जोगांना विश्लेषण करावेसे वाटते. 'मी साऱ्यांचं नीट करायचं नी त्यांनी मात्र रडायचं नी हसायचं हा उद्योग अधनमधून करीत राहायचं.' या विचाराने वैतागलेला बाळ प्रकाशपुढे आपल्या जीवनाची मळमळ ओकून टाकतो तेव्हा तो स्वतःच्या विचाराचे विश्लेषण करीत असतो तर प्रेमभंगाने सुन्न झालेल्या विजयच्या मनात आत्महत्येच्या कल्पनेने विचारांचा कसा गोंधळ माजला आणि त्यातूनच त्याला शेवटी वेड कसे लागले याचे लेखक स्वतः त्रयस्थतेने विश्लेषण करतो. असले स्पष्टीकरणात्मक परिच्छेद काही ठिकाणी उत्कटता वाढवतात, तर काही ठिकाणी कलात्मक उंची कमी करतात. व्यक्तीच्या प्रतिक्रियांतून, कृतीतून सुचविलेले भावनिक ताण मात्र सर्वत्र परिणामकारकच वाटतात. प्रकाशच्या घरी त्याच्या गैरहजेरीत माणिक जाते, तो प्रसंग या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

---

**वेगळया समस्येची**
**वेगळी** **अंधाराचे**
**कादंबरी** हिदायत खान **अश्रू**

---

ह्या कादंबरीचे वैशिष्ट्य तिच्या संपूर्ण वेगळेपणात आहे. यातले जीवन तर एका वेगळया स्तरावरचे आहेच, पण त्यातली सूत्ररूप समस्याही अगदी निराळी आहे. ती समस्या प्रखरपणाने नि प्रामाणिकपणाने सडेतोड माडल्याबद्दल लेखकाचे जितके कौतुक करायला हवे, तितकेच मुळात ती समस्या हाताळण्याच्या त्याच्या धाडसपणाचे कौतुक करायला हवे. वेश्यागमन, नपुंसकत्व हे विषय तसे मराठी कादंबरीला अपरिचित नाहीत. पण वेश्यागमनाचा अपरिहार्य परिणाम म्हणून गुप्तरोगाने पछाडलेल्या एखाद्या व्यक्तिगत आयुष्यात कशी • वादळे निर्माण होऊ शकतील हे हिदायत खानांनी इथे पहिल्यादाच दाखवले आहे. -आणि हे दाखवत

असताना एका निराळ्या कोनातून एका निराळ्या जीवनक्षेत्राचे दर्शन घडवले आहे. रेल्वेचे ड्रायव्हर्स, पोर्टर्स आणि त्याच्या विशिष्ट वातावरणाची पार्श्वभूमी या कादवरीला लाभलेली आहे. मराठी कादवरीला हे सगळे वातावरण नवीन आहे.

हिदायत खान त्या वातावरणाशी समरस झाले आहेत त्या विशिष्ट जीवनातली सुखदु:खे त्यामुळे अगदी नेमक्या परिमाणात त्यानी व्यक्त केलेली आहेत. असे करताना त्यातल्या जीवनाच्या वास्तव प्रत्ययासाठी तिथल्या वैशिष्टयपूर्ण भाषेचा त्यानी मोठ्या कुशलतेने उपयोग करून घेतला आहे. हिंदी आणि मराठी याच्या अजब धेडगुजरी मिश्रणातून बनलेली ही भाषा कादबरीभर त्यानी अशा सराइतपणे नि सहजपणे वापरली आहे की जीवनाच्या वेगळेपणावरचे भान कायम राखून जिवत तीव्रतेचा प्रत्यय ती देत राहते. सुभानच्या तोडची 'मा का लवडा' ही शिवी, त्याच्या सहकाऱ्याशी होणाऱ्या गप्पा, शानो, जमीर, आबेदा हे सगळे खरेखुरे वाटत राहते.

सुभान हा एक साधासुधा मुसलमान एजिन-ड्रायव्हर. वृत्तीने भावडा व भडक. बेदरकार व बेफिकीर जीवन जगणारा. बायकाच्या बाबतीत लालचावलेला आणि तरीही आपल्या लाडक्या सोज्वळ पत्नीवर निर्मळ प्रेम करणारा. त्याच्या व त्याच्या पत्नीच्या–शानोच्या–फेसासारख्या निर्भर प्रेमतुषारांचे वर्णन लेखकाने अगदी नाजुकपणे केलेले आहे. गरिबीच्या साध्यासुध्या ससारात हे जोडपे आपल्यामध्ये तृप्त असते. "मौत की मा भी आई तो तेरे गालोंके गडेमें अटकी हुई मेरी जान नै छिन सकतीया" हा सुभानचा काव्यमय विश्वास असतो. सुभानचा लहान मुलासारखा सरळपणा, शानोची त्याच्यावर असणारी अपार माया, एकमेकांना जपण्याची त्याची वृत्ती हे कादवरीच्या पहिल्या काही पानांवर टवटवीत फुललेले आपल्याला दिसते आणि सुभानचा बाहेरख्यालीपणा तितकाच सरळभावडा असल्याने अपेक्षा आपोआप उचावतात.

या पार्श्वभूमीवर 'ते' घडते. स्वत:ला गुप्तरोग झाल्याची सुभानला जाणीव होते. तो भाबावतो. गोंधळतो. सुन्न होतो. त्याच्या मनात विचाराची उलटसुलट गर्दी उसळते. सहज ओघाओघाने हे मनोविश्लेषण येते आणि सुभानच्या मनातली प्रचड उलघाल शब्दातून साडत जाते. कुठेही सुभानचे मन लागू शकत नाही. हिय्या करून तो डॉक्टरला दाखवतो आणि त्यानी सागितलेला उपाय ऐकूनच पुरा कोलमडून पडतो. आता त्याला पौरुषहीन जिणे पत्करावे लागणार असते. नवऱ्याच्या तोडून सारे ऐकून शानो सुन्न होते. तिचे अश्रू थिजून जातात. निराकार आणि निराधार भवितव्याचा आघात तिला असह्य होतो.

सुभानच्या संसाराच्या वादळी परवडीला इथून सुरुवात होते. त्याचे ऑपरेशन केले जाते. आणि विलक्षण कारुण्यपूर्ण सीमान्त नाटय त्याच्या आयुष्यात रंगू लागते. एकेका प्रसगातून लेखकाने नाट्याची एकामागोमाग एक गडद रेघ रेखली

आहे. जाड ठसठशीत नाटय. विलक्षण, करकरीत, नि खरेखुरे. सहकाऱ्यांच्या फाजील चेष्टामस्करीत सुभान आतल्याआत जळत राहतो. शानोवर चिडचिडत राहतो. स्वत.ला कामात कितीही व्यग्र ठेवले तरी त्याच्या डोळ्यापुढे स्वत च्या अवस्थेची भीषण कल्पनारजिते तरळत राहतात. आपला भाऊ आणि बायको याच्याबद्दल निष्कारण संशय घेऊ लागतो.

शानोचे यौवन व लावण्य त्याला अजूनही चेतवत असते आपल्या अपौरुषत्वाचे भान न राहून तो तिला जवळ ओढतो. आग भडकत राहते आणि ऐन अपेक्षेच्या क्षणी तो अतृप्त व असमाधानी शानोला तशीच अगतिकपणे सोडून देतो. रात्री-अपरात्री शानो नळाखाली बसून आपले तापलेले शरीर थड करते. मनातल्या मनात तळमळत राहते. मनावर दगड ठेवून निष्पाप दीराला वेगळे राहायला सांगते.

पुन्हा एक नाटयाचा वळसा चढतो. सुभानच्या मुलीची-आबेदाची-शादी ठरते. पण सुभानचे व्याही म्हणजे, जिथे त्याचे ऑपरेशन झाले, त्या दावाखान्याचे कपौंडर असतात. ' रसम 'च्या दिवशी सुभानचा गौप्यस्फोट करून ते ठरलेले लग्न मोडून टाकतात, आणि सुभान सगळ्याच्या कुचेष्टेचा बळी बनतो. तशाही परिस्थितीत शानो सुभानशी एकनिष्ठ राहते, घरी चलण्याचा आग्रह करणाऱ्या आईला कायमचे दुखवून घरातून हाकलून देते.

वयात आलेली आबेदा हे सगळे पाहात असते. तिच्या शरीरात वासना जाग्या होऊ लागतात. कशाही मार्गाने ती त्या शात करण्याचा प्रयत्न करू लागते आणि शानोला एक नवाच घोर लागून राहतो. डोळ्यादेखत आबेदाचे दुर्वर्तन पाहून सुभान चिडतो, सतापतो. पण अपघातात लंगडा झाल्याने तो प्रत्यक्ष काही करू शकत नाही. अखेर आबेदालाही तोच रोग झाल्याचे कळते तेव्हा शानोची दु खाची कमान कळसास पोचते. सारे आता सहनशक्तीच्या पलीकडे पोचलेले असते. दारा-पुढेच झालेला भीषण ॲक्सिडेट पाहात ती मनोमन म्हणत राहते, " ऐ मालिकऽए खुदा ! मै भी ये गाडीमें अचती तो कित्ता अच्छा हुया हुता ! पन–पन मेरे नसीबमें इतना सूख बी नै. इतना सुख बी नै–" अगदी विरळ असणारे अनिश्चित भवितव्य शानोच्या या उद्गारात गडदपणे हिंदकळताना दिसते.

सुभानच्या वाटयाला आलेले हे दुर्दैवी नाटय हिदायत खानांनी मोठ्या परिणाम-कारकपणे टप्प्याटप्प्याने रंगवले आहे. कादबरीच्या एकेका प्रकरणातून या नाटयाचा हळूहळू विस्तार होत गेला आहे. प्रत्येक प्रकरणाची अखेर एखाद्या तीव्र नाटयबिंदूपाशी झालेली आहे. उन्मनस्क आणि भावनाचे कल्लोळ या प्रत्येक नाटयबिंदूपाशी थबकलेले आहेत. घटना, मनोवस्था आणि व्यक्तिमत्त्वाचे विशेष या सर्वांनी ते नाटयबिंदू आलेखित झाले आहेत.

हे सगळे घडत असताना सुभान आणि शानो या दोघांच्या मन.पटलावर त्याच्या

खोलवर प्रतिक्रियांच्या आकृती उमटत राहतात. शानोच्या मन:पटलावरील आकृती हिदायत खानानी लोभस सहानुभूतीच्या आणि सुभानच्या मनातील विचित्रे उत्कटतेच्या, समरसतेच्या रगांनी चित्रावली आहेत. आपले पौरुष आपल्याच कर्तुकीने हरवून बसलेला सुभान खिन्न, उदास आणि अगतिक बनलेला आहे. त्याला ते पटतच नाही. वास्तवाचा तो धैर्याने स्वीकार करू शकत नाही, आणि म्हणून आपले पौरुष शाबीत करण्याचा कसातरी वेडावाकडा प्रयत्न करीत राहतो. आवरता न येणाऱ्या वासनांच्या पुनः पुन्हा भक्ष्यस्थानी पडत राहतो. स्पष्टीकरणाच्या चौकटीत न मावणारे हे सुभानचे चित्र हिदायत खानांनी फार सामर्थ्याने रेखाटले आहे.

रेल्वेच्या कर्मचाऱ्यांच्या जीवनातील बारकावेही त्यानी अगदी मार्मिक रीतीने सूक्ष्मपणे भरलेले आहेत. त्यामुळे सतत जिवत वातावरण तर कादंबरीला लाभले आहेच; पण त्यातील समस्येचे सारे धागेदोरे नीटपणाने लक्षात येण्यास ते पूरकही झाले आहे. सुभान आणि त्याचे सहकारी यांच्यातल्या 'अश्लील' गप्पाटप्पाही याच प्रकारच्या आहेत. सुभानचे सरळ, भावडे, पण उच्छृंखल व्यक्तित्त्व स्पष्ट करणे, सुभानच्या वाट्याला आलेल्या समस्येची विदारकता सखोल करणे आणि मुख्य म्हणजे कथासूत्राला निष्कारण कुठल्यातरी गाढ भावनिक पातळीवर न नेता वास्तवाच्या मापानेच त्याला मोजणे अशा विविध प्रयोजनाचा स्पर्श या 'अश्लील' संभाषणाना झालेला आहे.

---

| | | |
|---|---|---|
| एक<br>कल्पित<br>कारस्थान | नरुभाऊ लिमये | 'मे'तील<br>सात<br>दिवस |

---

अमेरिकेसारख्या प्रगत लोकशाहीच्या वातावरणात घडलेली ही काल्पनिक कथा आहे. या कथेला सत्याचा आधारही भरपूर आहे असे लेखकाने म्हटले आहे.

रविवारी सुटीच्या दिवशी जबाबदारीचे काम पाहणाऱ्या कर्नल केसीच्या हाती जनरल स्कॉटने आपल्या पाच मित्राना पाठविलेले साकेतिक गुप्त सदेश पडतात. मित्र हेडरसन अचानक भेटतो आणि त्याच्याकडून एका मोठ्या गुप्त लष्करी तळाची माहिती कळते. सीनेटर प्रेन्टीस मध्यरात्री रहस्यमय रीतीने जनरल स्कॉटला गुपचूप भेटताना दिसतो. गुप्त तळावर विमाने पाठविली गेल्याचे कळते. कर्नल केसी या साऱ्या घटनानी अस्वस्थ होतो. त्याला संशय येतो आणि साऱ्या गोष्टी तो तडक राष्ट्राध्यक्षांच्या कानावर घालतो. राष्ट्राध्यक्षांविरुद्ध काहीतरी

लष्करी कट शिजत असल्याचे त्यातून ध्वनित होत असते.

क्षणभर त्यावर अध्यक्षांखेरीज कुणाचाच विश्वास बसत नाही. मग एकेक पुरावा अधिक स्पष्ट होऊ लागतो. सगळे सुटे तुकडे एकत्र जोडले जाऊन त्यातून एक तर्कसंगत सूत्र गुफता येते. अध्यक्ष आणि त्याचे सहा जिवलग या प्रकरणाचा छडा लावण्याचा निश्चय करतात.

प्रत्यक्ष गुप्त तळाचा ठावठिकाणा लावण्यासाठी सीनेटर रे क्लार्क त्या भागात जातो. जनरल स्कॉटच्या मैत्रिणीकडून अधिक माहिती काढण्यासाठी कर्नल केसी न्यूयॉर्कला जातो. आणि जो स्कॉटच्या विश्वासघातकी योजनेत सामील झाला नाही त्या दर्यासारंग बार्नेझ्वालची भेट घेण्यासाठी पॉल गिरार्ड अध्यक्षाचे ओळखपत्र घेऊन निघतो. स्कॉटवर पाळत ठेवणाऱ्या आर्ट कोरविनला कटात सामील झालेल्या आणखी काही व्यक्ती आढळतात. अध्यक्षांवर टीकास्त्र सोडणारा विरोधक मॅक पियर्सनही त्यात सामील असतो.

रे क्लार्क मोठ्या प्रयत्नाने गुप्त तळ शोधून काढतो. पॉल गिरार्डला दर्यासारंग बार्नेझ्वालचे कबुलायतपत्र मिळते. जनरल स्कॉटच्या नावे त्याच्या मैत्रिणीच्या इन्कमटॅक्स फॉर्ममध्ये फार मोठी रक्कम खर्ची पडल्याची माहिती कर्नल केसीला न्यूयॉर्कमध्ये मिळते. आणीबाणीच्या वेळी स्कॉटविरुद्ध ही माहिती उपयोगी पडणार असते. पण इकडे दुर्दैवाने पॉल गिरार्ड विमान अपघातात मृत्यू पावतो. बार्नेझ्वालचे पत्र त्याच्याबरोबर नाहीसे झाले या कल्पनेने अध्यक्षांचा धीर सुटतो.

रे क्लार्क कॉमकॉनच्या गुप्त तळावर कैदेत अडकलेला असतो. हेडरसनच्या मदतीने मोठ्या मुष्किलीने तो सुटका करून घेतो. कॉमकॉन तळाची चक्षुर्वैसत्यं हकीगत आता अध्यक्षांना कळते. पॉल गिरार्डच्या सिगारेटकेसमध्ये सापडलेले बार्नेझ्वालचे पत्रही अध्यक्षांकडे येते. त्या भक्कम पुराव्याच्या बळावर अध्यक्ष लेमन स्कॉटच्या कृत्यांचा पाढा त्याला वाचून दाखवितात, आणि त्याचा राजीनामा मागतात. जनरल स्कॉटला राजीनामा द्यावा लागतो !

अशी ही सगळी कटाची गुतागुंतीची कथा. कटाची रचना कित्येक दिवसांपासून काळजीपूर्वक झालेली असली तरी प्रत्यक्ष कादबरीच्या प्रारंभी अतिशय कंटाळवाणे निवेदन आहे. अत्यत सथपणाने कथा सरकत राहते. मुळात नाट्य भरपूर अपेक्षित असूनही प्रारंभी मात्र ते नाट्य उभेच राहू शकत नाही. पुढे एकदम नाट्य उभे राहते. गतिमान बनते. एकेक रहस्याची उकल तितक्याच रहस्यमय रीतीने होत राहते. जनरल स्कॉट आणि अध्यक्ष लेमन यांच्यातील शेवटचे संभाषण म्हणजे कादबरीचा क्लायमॅक्स आहे. एकमेकाच्या विरुद्ध दोघेही ताठ कणखरपणे उभे आहेत. हल्ले-प्रतिहल्ले करीत आहेत. लष्करी सघटनेचा सूत्रधार विरुद्ध जनतेचा प्रतिनिधी. या खटकेबाज संभाषणात लेखकाने सारे कौशल्य पणाला लावले आहे. आतापर्यंतची रहस्यमय गती या बिंदूपाशी उत्कठित

होऊन थबकली आहे. अध्यक्षाचा दृढ निश्चय, निर्धार आणि स्कॉटची बेपर्वा बडखोरी याच्यातला हा संघर्ष आहे. आणि शेवटी स्कॉटला बडतर्फ केल्यानंतर अध्यक्षांनी जनतेला उद्देशून टेलिव्हिजनवर केलेले भाषणही असेच नाट्यपूर्ण, निर्धारमय आहे. काहीशी संथपणे सुरू झालेली ही कादंबरी तिथे अत्यंत आकर्षकपणे संपली आहे.

अर्थात या कादंबरीचे सारे यश हे मूळच्या लेखकाचे आहे, कारण ते संविधान-काच्या रचनेतून निर्माण झालेले आहे मूळ कथावस्तूची घटना व तिची गुंफण हेच या यशाचे मर्म असल्याने अनुवादकाच्या वाट्याला ते यश फारसे येऊ शकणार नाही असे वाटते

'हे रूपांतर मी का केले' ते सांगताना अनुवादक श्री. नरूभाऊ लिमये म्हण-तात, "देशोदेशी एखाद्या राष्ट्रावर संकट आले की नकळत माणसे लष्करी अमलाखालच्या शिस्तीच्या गोष्टी बोलू लागतात. सद्यःस्थितीला कंटाळलेले लोक वैतागाच्या भरात तसे बोलतात. जर ते चित्र प्रत्यक्षात आले, तर मोकळेपणाने बोलण्याचा आपला अधिकारच गमावून बसतात. त्या बंद नजरेच्या, बंद आवाजाच्या देशाचे भवितव्य घनदाट अंधारलेले असते. म्हणून शेवटी चुकणारी, अडखळणारी पण अनेकांच्या मन आणि मतातून व्यक्त होणारी हीच मानवी भावना समाजाला हितकारक ठरली आहे ..मराठीत हे विचार पोचावेत म्हणून हे भाषांतर वाचकां-समोर ठेवले आहे." हे त्याचे ईप्सित कितपत साध्य झाले आहे याची साशंकता वाटते. कारण संबंध कादंबरीभर लक्ष केंद्रित केले गेले आहे ते लष्करी रहस्याच्या नाट्यपूर्ण गुंतागुंतीवर, त्यातल्या विचारधारेवर नाही.

---

| | | |
|---|---|---|
| **एका वेगळ्या जगातील वेगळे अनुभव** | **केशव केळकर** | **कोहिमा** |

---

नोकरीच्या निमित्ताने श्री. केशव केळकर यांनी नागालँडमधले लोकजीवन अगदी जवळून पाहिले. त्यांच्या मनावर त्याचे काही विशेष, त्यातल्या काही घटना, काही अनुभव ठळकपणाने उमटले. ते वेगळ्या परिसीमेतले जीवन त्यांनी या कादंबरीत स्वानुभवाच्या वाटेने मांडले आहे. "सत्यदर्शनाच्या या प्रयत्नामागे आग्रह नाही, अभिनिवेश नाही. आहे ती मुळातली एकच इच्छा. भाग्यवशात् मला जे पाहायला मिळाले ते जास्तीतजास्त लोकांना सांगता यावं." असे स्वतः लेखकाने कादंबरीचे प्रयोजन सांगताना म्हटले आहे. कादंबरीलेखनात हा हेतू तर साध्य

झाला आहेच, पण त्याखेरीज त्याला फार चागले कलात्मक मूल्यही लाभले आहे.

'तो' आणि 'ती' याची ही कथा आहे. तो रेडिओस्टेशनवरचा एक कर्मचारी. त्याची अचानक कोहिमाला बदली होते आणि त्याच्या जीवनात एक नवे अनुभवविश्व उलगडते. नव्या लोकजीवनपरिचयाचे आपले प्रयोजन लेखकाने अशा तऱ्हेने कादवरीत गुंफले आहे. पण या जीवनपरिचयाला एक भावनिक दृष्टिकोन लाभला आहे. कोहिमाच्या व्यक्तिलेखनाबरोबरच तो आणि ती याच्या भावलेखनाची ही कहाणी आरंभापासून अखेरपर्यंत राहिली आहे. एका–नव्हे दोन व्यक्तीच्या भाववृत्तीतून कोहिमातल्या नव्या (भौगोलिक, नैसर्गिक आणि व्यावसायिक) अनुभवाचे दर्शन घडत राहते.

प्रत्येक नव्या अनुभवात समांतर जुन्या स्मृतीचे तरंग रेखून त्यातून हृद्य व्यक्तिस्वदर्शन घडवले आहे. त्यामुळे त्याला डायमेन्शन्स लाभलेल्या आहेत आणि मोठे नाजूक भावबंध त्याभोवती लपेटले गेले आहेत.

काहीकाही अगदी विलक्षण प्रसंग या वेगळ्या अनुभवविश्वात घडून येतात. सर्वार्थाने विलक्षण. एका नागाला सहज जाताजाता धक्का लागतो आणि खून करण्याइतका तो संतापून चवताळतो. "साला इंडियन!" अशी शिवी देतो. त्या नागाच्या सतापापेक्षा त्या शिवीचेच जास्त वाटत राहते. रस्त्यात जराशी धडक झाल्याबरोबर चार नागा–तरुण दाओ घेऊन मारायला घरी येतात, आणि बजावणीमुळे फसून निघून जातात. आपल्या जगापेक्षा हे सगळे अगदीच निराळे असते. त्यातले थ्रिल कादबरीला एक निराळे परिमाण सातत्याने देत राहते. आणि नुसत्या थ्रिलपेक्षाही त्यात आणखी बरेच काही जाणवून जाते.

कौटुबिक आणि व्यक्तिगत भावनाचे नाजुक वलय आणि भोवतालच्या अनुभवांचे जरा विस्तृत वर्तुळ यांचा सतत एकमेकाना स्पर्श होत राहतो आणि त्यातून कितीतरी सुरावटी निनादत राहतात. तसेच 'तो' आणि 'ती' याच्या अनुभवपद्धतीची दुपेडी गुंफणही सर्वत्र मोठी वेधक वाटते. प्रत्येक अनुभव त्यामुळे द्विविध रंगानी उजळून निघतो. "परिमलाचं पत्र म्हणजे शरणागती आहे. कटाळली. आता मला तिला बोलवायला काहीच हरकत नाही–" ही त्याच्या बाजूची नोद, आणि "यांच्या पत्रांतल आर्जव पाहून मी पार विरघळून गेले आहे." – ही तिची कबुली म्हणजे दोघानाही जाणवणाऱ्या एकाच भावनेच्या दोन अबोध बाजू आहेत. दोन व्यक्तोचे भावनिक जीवन, कौटुबिक–वैयक्तिक समस्या आणि वेगळया वातावरणातले अनोखे समाजजीवन या सगळ्याच्या हळुवार मिलाफाने मनोज्ञ रगच्छटा निर्माण झाल्या आहेत. ही गुंफण कुठेही एकमेकाना काचत नाही, तिचा एकसध गोफ बनतो, हे विशेष. "यांनो त्यांच्याबरोबर इम्फालचे हातमागाचे क्विल्ट्स पाठविले होते. मुलं उल्हासानं पांघरून निजलो. रात्री उठून मीपण ती ऊब जवळ केली. भेट झाल्यासारखं वाटलं. उगीचच रडायला आलं." यासारख्या साध्यासरळ

निवेदनातून हृदयाला भिडणारी भावना पाझरत राहते ते त्यामुळेच.

मानवी स्वभावाचे, एखादा अनुभव स्वीकारताना आपातत: घडणाऱ्या विविध प्रतिक्रियाचे कितीतरी बारकावे लेखकाने अगदी तरलपणे टिपले आहेत. साऱ्या निवेदनाला त्यामुळे प्रामाणिकपणा आलेला आहे, आणि एक वेगळीच हृद्य छटा प्राप्त झाली आहे. अलेम्ला आणि माधवन् यांचे सूत लक्षात येताच "देसाई-साहेबाना ते अजिबात आवडणार नाही" असे उद्गार 'त्या'च्या नोंदीत येतात. खरे म्हणजे त्याच्या स्वत:च्याच नाराजीचा तो प्रतिध्वनी असतो. भूमिगत नागानी आगगाडी उडवून दिल्याच्या वार्तेवर भाष्य करताना 'तो' लिहितो.–"माझी काळजी वेगळीच आहे. ही बातमी तपशीलासकट नागपूर–मुबईकडे पोहोचली तर परिमलाला येऊ देतील की नाही?" तिला पाहिल्यानतर त्याच्या मनात सानद रुखरुख उमटते : "अगानं भरली होती. चागली झाली होती. रोड वगैरे होण्याचे संकेत उगीचच म्हणायचे!"

काहीकाही ठिकाणी अशी मार्मिक वाक्ये प्रसगाच्या शेवटी येतात की फार अर्थच्छटा त्यातून व्यक्त होतात. परिमला आल्यानंतर देसायांकड पहिले जेवण होते. त्यामुळे शेजारची सेठाणी रागावते. परिमलाचे म्हणणे, की मग तिने तसे आधी सागायला नको होते का? यावर 'तो' एकच वाक्य लिहितो : "चला. बिऱ्हाडात बायका आल्या." आणि त्याला काय म्हणायचे आहे ते सगळे त्यातून मिस्किलपणे व्यक्त होते.

'तो' आणि 'ती' याच्याखेरीज विविध वैशिष्टयपूर्ण व्यक्तिचित्रे कादवरीत उठावदारपणे दिसतात. त्यात बोर्डावर मेहेतर म्हणून आपले नाव लागले म्हणून रडणारा नागा असतो; 'मॉडर्न' क्लबातल्या तथाकथित मॉडर्न बायका असतात; विश्ववद्य व्यक्तिमत्त्वाचे राष्ट्रपतीही असतात. अलेम्ला, माधवन्, सेटना, देसाईसाहेब वगैरे पात्रे तर सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाने नटलेली असतात. ओळखीची बनतात.

या साऱ्या व्यक्तिचित्राना आणि अनुभवाना एक काव्यात्म बाजूही आहे. हे सर्व नानाविध अनुभव घेणारे मन रसिक आहे. त्याला सौंदर्याची जाण आहे. "लाजलेली नागा मुलगी पाहणं हा एक सुखद अनुभव आहे. 'हलकेच फूल उमलल्यासारखं वाटतं' यासारखे रम्य उल्लेख ठिकठिकाणी तुषारलेले आहेत; आणि या काव्यात्मतेच्या जोडीनेच कोहिमातील राजकीय, सामाजिक नि सास्कृतिक सत्यदर्शन कठोरपणे व परखडपणे घडत राहिले आहे. अलेम्लाला 'तिने' केळवण केले तो प्रसंग या सर्व धाग्यानी गुफलेला आहे. अलेम्ला व माधवन् याच्या एकनिष्ठ प्रेमापुढे वरिष्ठ अधिकाऱ्याचा विरोधही लटका पडतो. 'त्या'चा विरोध असतानाही 'ती' अलेम्लाला केळवण करते. सास्कृतिक पद्धत निराळी असली तरी त्यातल्या आपुलकीने अलेम्ला वेडावून जाते. तिच्या डोळ्यात पाणी येते. बाकीच्या मुलीही भारावून जातात. आणि 'ति'ला कृतकृत्यता वाटत राहते. असे अनेक प्रसंग.

त्याच्याच जोडीने काही मूलगामी विचारही. ' धर्मनिरपेक्षतेचं हे धोरण अकरात्मक का असावं ? अभिमुख का नाही ? होळी, दिवाळी, ईद, मोहरम, ख्रिसमस हे राष्ट्रीय सण म्हणून साजरे केले तर प्रजासत्ताक दिनालासुद्धा जो उत्स्फूर्त उल्हास दिसत नाही, तो अशा दिवशी दिसेल. आणि त्यातूनच राष्ट्रीय एकात्मता—" ... " जनावरांच्या राहणीत आणि आमच्या राहणीत काय फरक होता ? मिशनऱ्यांनी आम्हाला माणसात आणलं. एक संस्कृती दिली. कोणती, ते विचारण्याचा कुणाला काय अधिकार ? जे आज प्रश्न विचारताहेत ते त्या वेळी कुठे होते ?'...विचार आणि घटना, राजकीय-सामाजिक अनुभव आणि व्यक्तिगत जीवन, कोहिमाचे वातावरण आणि ' तो ' व ' ती ' यांच्या प्रतिक्रिया यातली सांधेजोड फार आकर्षक आहे. झुळझुळत्या गतीने कादंबरीला पुढे नेणारी आहे. कोहिमामध्ये लेखकाच्या भावना खरोखरीच्या गुंतल्या आहेत, म्हणूनच असे जिवत चित्रण त्याला करता आले असावे.

---

**झोपडपट्टीत फुललेले
नि मावळलेले
काव्य** **प्र. ना. शेणई** **वावर**

---

झोपडपट्टीतले जीवन अलीकडे तसे अनेकानी रंगवले आहे. पण दळवी—कर्णिकांच्या मळवाटेने जाणाऱ्या या चित्रणाला कठोर करकरीत वास्तवदर्शनाचे एकच माप आहे. शेणईंच्या या कादबरीला मात्र परखड वास्तवदर्शनाबरोबर एक हळुवार काव्यात्मतेचा रंग आहे. काही ठिकाणी ही काव्यात्मता भाबडीभावुक झालेली आहे. पण तेवढे नजरेआड केले तर फार हृद्यता तिला सर्वत्र लाभलेली आहे. एकदरच मानवी अस्तित्वाविषयी या निम्नस्तरीय जगाच्या अनुभूतिचित्रातून काही आकृतिबंध घडवण्याची कादंबरीकाराची दृष्टी आहे.

दादू नावाच्या एका व्यक्तिहीन प्रवाहपतिताची ही कथा. पूर्वाश्रमी ड्रायव्हर असताना त्याच्या हातून एक अपघात झाला; आणि दादूला सहा वर्षांची सजा झाली. तुरुंगातून पळून जाण्याचा त्याने एकदाच प्रयत्न केला आणि त्यावेळी बसलेल्या बेदम मारामुळे कानास खडा लावला. शिक्षा सपल्यावरही त्याला तुरुंगातून बाहेर जाऊ नयेसे वाटत हाेते. बाहेरच्या जगाची भीती वाटत होती. तरीही स्वत भोवती फेसाळत राहणाऱ्या आणि शेवटी फुटणाऱ्या लाटेसारखे जीवन त्याला जगावे लागले. बाहेरच्या जगात वावर करावा लागला. क्वचित हर्षफेनाने थुईथुई उचंबळत तर बऱ्याच वेळा अगतिकतेच्या भोवऱ्यात गरगरत. त्याची ही कथा.

शणइच्या भाषेला एक लय आहे. कधीकधी ती लय एकसुरी, कंटाळवाणी आणि कृत्रिमही वाटते. पण बऱ्याच वेळा हळुवार काव्यात्मतेचे पुजके तिच्यातून उमलत राहतात. दादूच्या मनातल्या लाटाचे हिंदोळ त्या लयीतून उमटत राहतात. दादूच्या मनात येणारे विचारतरंग कादबरीत शब्दरूप घेतात. त्यातूनच कादबरीचे निवेदन केले जाते. दादू आणि वाचक याच्यातली सीमारेषा नकळत पुसली जाते. तृतीयपुरुषी निवेदन असूनसुद्धा दादूचे मन साक्षात वाक्यावाक्यातून उघडे होत राहते. अगदी छोटीछोटी कारीव वाक्ये लिहून तीव्र परिणाम साधण्याची शेणईंची लकब आहे. पाल्हाळिक फापटपसाऱ्याला त्यात जागा नाही. मर्मभेद करणारी सुट-सुटीत वाक्ये. त्यातच वर्णनाचे आकार बेतलेले.

दादूच्या दिशाहीन व्यक्तित्वाला कसलाच निश्चितपणा नाही. विचाराचाही नाही त्या त्या क्षणापुरता दादू भडकून विचार करतो. पुन्हा थडावतो. त्याच्या मनाचा लबक सारखा अस्थिरपणे भेलकांडत असतो. परिस्थिती त्याला झोके देत असते. सडास साफ करण्याची नोकरी मिळाली म्हणून तो भयकर पिसाळतो, अर्थात मनातल्या मनातच. 'कशाला जगायचं' असे त्याला वाटत राहते. पण लगेच त्याच्या मनाचा लवक दुसऱ्या टोकाला भिरकटतो. 'आपणच किडके. नोकरी चागली. आतून बाहेरून नक्षत्रासारखी. पाण्याइतकी जुनी. रक्ताइतकी मूलभूत. श्वासोच्छ्वासाइतकी आवश्यक. नोकरी म्हणजे माणूसच.' दादूच्या बुरस-लेल्या मनात परिस्थितीनुरूप उठणारे हे बुडबुडे

शहरी परीटघडीच्या दृष्टीने झोपडपट्टीची वस्ती म्हणजे तिरस्काराची, उपेक्षेची बाब होती. एका परीने ते खरेही होते. घाण, गलिच्छपणा, शिवीगाळ, हातभट्टी, भाडणे, दादागिरी याचा वस्तीत बुजबुजाट होता. पण त्याच वस्तीला एक माणुस-कीची बाजूही होती. अबा पोटेशी असतानाच तिचा नवरा तिला टाकून पसार होतो, अबेचे जीवन उघड्यावर पडते, तेव्हा वस्तीतली माणुसकीच तिला आश्रय देते. चुकलेल्या जिवाला वस्तीत वावर करता येत असतो. परस्परविरोधी अनेक वृत्तीची सरमिसळ किडामुगीसारखे जिणे जगणाऱ्या या वस्तीत झालेली असते.

म्हणूनच की काय, भकास वास्तवतेच्या सागाती तिथं क्वचित मुग्ध काव्यही पाहायला मिळते. दादूइवलीची कथा अशीच काव्याच्या अंगणात उतरते. तसा दादू वस्तीत उपराच. तिथली रोकठोक बेपर्वाई त्याच्या वृत्तीत अजून मुरलेली नसते. त्यामुळे त्याच्या मनाला अशा भलभलत्या काव्यात्म जाणीवा होऊ शकत असाव्यात. 'इवली डबक्यात उतरली म्हणजे दादूला वाटायचं, चादण्याचा झोत पाण्यात मिसळतोय.' इवलीच्या सदर्भात दादूच्या मनात निर्माण होणाऱ्या नाजुक प्रेमभावना याच तऱ्हेच्या काव्यमय प्रतिमांच्या साहाय्याने शेणईंनी वर्णन केल्या आहेत. मात्र कधीकधी या काव्यात्मतेच्या नादात त्याचे कथेच्या अनुसूत्राचे भान सुटलेले आहे. झोपलेल्या इवलीला पाहताना हिरव्या गवतावर निखळून पडलेली

विजेची इंग्लिश तार, किंवा वितळलेल्या चंद्राचा वोहोळ या प्रतिमा दादूच्या मनात निर्माण होणे काहीसे स्वाभाविक म्हणता येईल. पण 'कदाचित विधात्यानं आपल्या साखरझोपेतून उठता उठता टाकलेला नि:श्वास विसावला असावा हा!' ही खाडेकरी कल्पना झोपडपट्टीतल्या दादूच्या मनात येणे अगदीच अप्रस्तुत वाटते. दादू कितीही वेगळा होता असे मानले तरीही. अशा कल्पनाचमत्कृती लेखकाला रंजिताच्या अवकाशात भराऱ्या मारावयास आकृष्ट करीत असल्या तरी कथासूत्राची वास्तवता घालवतात. अर्थात हे असे क्वचित काही ठिकाणीच झाले आहे हे सुदैव.

स्वत:च्या कर्तृत्वशून्यतेची व प्रवाहपतित्वाची जाणीव असलेले, केवळ मनातल्या मनातच आनंद, दु:ख, संताप उगाळीत बसणारे, मनात सीमान्त वल्गना करणारे, पण कृतीची वेळ येताच गागरणारे दादूचे व्यक्तिमत्त्व शेणईंनी इतक्या प्रभावीपणे रंगविले आहे, की वरीलसारख्या काही प्रमादांकडे आपोआप दुर्लक्ष होते. इवलीला अंबा फोरासरोडला धंद्याला पाठवणार हे कळल्यावर दादूला किळस येते. संताप येतो पण 'अंबाला कापली पाहिजे. खाटकाकडे दिली पाहिजे. मानेवरून सुरी फिरवायला सांगितले पाहिजे. हलकट कुठली.' असे मनातल्या मनात बडबडण्यापलीकडे तो काही करू शकत नाही. इवलीच्या स्पर्शाने त्याच्या शरीरात निरनिराळे सोनेरी कण उतरत असतात. शरीर मोहरते. पण इवली प्राप्त करून घेण्यासाठी त्याला केरूकडेच पाहावे लागते. केरूच्या धाडसाचे त्याला मनोमन कौतुक वाटते. पण त्याने इवलीला हात लावताच तो तडकतो. तरी मनातल्या मनात चडफडण्यापलीकडे काही करू शकत नाही. केरूच्या खिशातील चाकू आठवताच चुळबुळत राहतो.

दादूच्या उलट केरू. सारी वस्ती त्याला टरकते. अंबाला चाकू दाखवून तो खुशाल इवलीला घेऊन येतो. तो हातभट्टीचा धंदा करतो. 'आपून लोकांचा' संसार भरडणाऱ्या सरकारबद्दल त्याच्या मनात संताप आहे. बंड करून सरकार उलथावे असे त्याला वाटते. पण बंड करणे हे एकट्याचे काम नाही याचाही त्याला शहाणपणा आहे. केरूसारखेच हेरबा, दमडी, आणखी कितीतरी.

या क्षुद्र जीवनातले हर्षामर्षही क्षुद्रच. शोकेसमधल्या भारीभारी साड्या इवलीच्या अंगावर कशा दिसतील याच्या कल्पना करणे हा दादूचा आनंद. बोहरी पाळणा कमी किंमतीला देत नाही म्हणताना 'साला बोरीला ठोकायला पाहिजे.' पण किंमत कमी केल्याबरोबर 'बोरी माणूस आहे. चांगला आहे. जगला पाहिजे. खूपखूप वर्षे. आपल्यापेक्षा जास्त.' ही दादूच्या मनातली आंदोलने. क्षुल्लक कारणाने घडलेली. आपले जीवन म्हणजे त्याला नियतीच्या हातातला पतंग वाटते आणि ते तसे असतेही. म्हणूनच इवलीला आनंदी पाहून त्याचे मन मोरासारखे थुईथुई नाचू लागते, तर सपाचे चटके बसताच देवाला शिव्याशाप देऊ लागतो.

खरे म्हणजे ह्या सगळ्यात दादू आहेही आणि नाहीही. एकाच वेळी एक झोपडपट्टीतले प्रातिनिधिक चित्र आहे आणि त्याचवेळी त्या वस्तीत अपरिहार्यपणे राहिलेल्या, पण मनाचे लागेबांधे कुठेतरी गुतवून ठेवलेल्या दादूची ही कथा आहे. त्याचे स्वप्नरंजन, त्याच्या क्षुद्र चैनी हे असे सगळे दुहेरी आहे. म्हणूनच कादंबरीच्या अखेरीस झोपडपट्टी आणि दादूचा बाह्य जगातील वावर हे दोन्ही एकदमच संपुष्टात येतात व मनाला एक अर्थपूर्ण पोकळी नुसती जाणवत राहते.

---

युद्धस्य
कथा
रम्या — प्रभाकर पेंढारकर — प्रतीक्षा

---

'दीपावली'ने आयोजित केलेल्या कादंबरी स्पर्धेत १९६८ सालातील पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक ह्या कादंबरीला मिळाले आहे. भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर ह्या कादंबरीची रचना झालेली आहे. युद्धशास्त्राच्या सूक्ष्म माहितीचा योग्य उपयोग करून बांधेसूद कथा कशी रचावी याचे ही कादंबरी म्हणजे उत्कृष्ट उदाहरण आहे. कृती, गती आणि सतत जाणलेली अपेक्षा ही यातल्या संविधानकाची वैशिष्ट्ये आहेत. अनेक वळणेवळणे घेत, अपेक्षाभंगाचे धक्के देत, उत्सुकता वाढवीत यातली कथा गतिमानतेने धावत असते. त्यातले प्रसंगही मोठे विलक्षण. एकाच ठोशात शत्रूला खाली लोळवण्यापासून तो विमानातून उडी मारताना पॅराट्रुपरचा हात दोरीत अडकणे आणि हळूहळू कापला जाणे, इथपर्यंत भीषणतेच्या थक्क करणाऱ्या नाना छटा त्यामध्ये भरलेल्या.

पण त्याचबरोबर लष्करी कठोर शिस्तीत प्राणाची पर्वा न करता धडाडीने वागणाऱ्या सैनिकालाही भावनाची, विचाराची बाजू असते ही गोष्टही जिव्हाळ्याने लक्षात घेतलेली. सामाजिक आणि राजकीय घडामोडीचा आलेख सैनिकाच्याही मनावर उमटत असतो. त्यानेही काही श्रद्धामूल्ये जोपासलेली असतात; आणि त्याचा भग होताना तो कळवळतो. यश चौधरीचे उमदे व्यक्तिमत्त्व या दृष्टीने पाहण्यासारखे आहे.

युद्धात अटीतटीने भाग घेताना सैनिक भान विसरून लढतो. हवे तितके क्रौर्यही प्रसंगी दाखवतो; पण अखेरीस तोही एक माणूसच असतो. मरणाच्या सीमेपाशी तो पोचतो तेव्हा द्वेषाचा, क्रौर्याच्या, सूडाचा मागमूसही मनात राहात नाही. युद्धाविषयी, जगाविषयी एक तऱ्हेची विचारशील निष्क्रियता त्याच्या मनात दाटून राहते. मन एका अबोध पातळीवर तरंगत राहते. कादंबरीच्या अखेरच्या प्रकरणांतील अनुभव या प्रकारचा आहे.

पॅराट्रुपर्सच्या जीवनाशी, अनुभवाशी श्री. प्रभाकर पेंढारकर अत्यंत समरस झालेले आहेत. तांत्रिक माहितीची सूक्ष्मता तर त्यानी मिळविलेली आहेच, पण त्याहीपेक्षा विविध अनुभव घेणाऱ्या त्या एका विशिष्ट जीवनाचा धागा त्यांनी नेमका पकडलेला आहे.

धिप्पाड दिलदार कॅप्टन डॉक्टर बत्रा, तरुण भावनाप्रधान यश चौधरी, शत्रूला सभावितपणे मदत करणारे धूर्त शेटजी वगैरे आनुषंगिक व्यक्तिचित्रेही मोठी ठसठशीत रंगविलेली आहेत. विशेष म्हणजे पेंढारकराची भाषा अगदी पारदर्शक आहे. ती हळवी कुठेच नाही. अनुभवाचे प्रामाणिक वस्तुनिष्ठ रूप तिने मोठ्या धैर्याने बेतलेले आहे. अलंकरणाच्या भरीला तर ती पडलेली नाहीच; पण निवेदन आणि भाष्य, कथा आणि व्यक्तिमत्त्व, प्रसंग आणि जीवनदर्शन याची गुंफण तिने अत्यंत सहजतेनें आणि आकर्षकपणे गुंफली आहे.

सैनिक म्हणजे भावनाशून्य यंत्र असे समजले जाते. पण ह्या कादंबरीत 'यंत्रा' पेक्षाही कार्यक्षम असणाऱ्या आणि तरीही भावनाशील राहणाऱ्या सैनिकांचे जीवन पेंढारकरांनी फार यशस्वीपणे दाखविले आहे.

---

**एक खलनायकाची कथा** | **अनंत मनोहर** | **प्रतिष्ठा**

---

एखादा माणूस व्हिलन अथवा खलनायक का होतो? त्याच्या जीवनातील विशिष्ट प्रवृत्ती आणि त्याच्या वाट्याला आलेली परिस्थिती यांचा संघर्ष विशिष्ट वाटेने जातो म्हणून. कादंबरीत खलनायकाचे चित्रण लेखक का करतो, आणि वाचकाला ते का आवडते? जीवनाचे अनुभव घेण्याच्या संदर्भात विशिष्ट आव्हानात्मक परिस्थितीचे मानवी प्रतिनिधित्व त्यातून घडते म्हणून. खलनायकाच्या दुष्टाव्याला तोंड देत देत नायकाच्या सत्प्रवृत्ती विजयी झाल्याचे चित्रण कादंबरीत करणे हा कादंबरीलेखनाचा एक पुरातन मान्यवर प्रकार आहे. खलनायकाच्या काळ्याकुट्ट पार्श्वभूमीवर नायकाच्या उदात्ततेची चमकदार रेघ चांगली उठून दिसते.

पण या कादंबरीत खलनायकाचा तसा 'उपयोग' करून घेतलेला नाही. ही एका खलनायकाचीच कथा आहे. म्हणजे एका दृष्टीने या कादंबरीत खलनायक हाच नायक आहे. त्याचे एक विशिष्ट तत्त्वज्ञान आहे. जगाला आणि जीवनाला सामोरे जाण्याची त्याची एक पद्धत आहे. भावना, हृदय, माणुसकी या गोष्टी

त्याला माहिती नाहीत. अत्यंत थंड हिशेबीपणा आणि इष्ट स्वार्थप्राप्तीसाठी कुठल्याही मूल्यांची क्षिती न बाळगणारा हा दत्ताजी प्रत्येक गोष्टीत यशस्वीच होत जातो. अपयशातूनसुद्धा आपल्या पद्धतीने यशाची वाट निर्माण करतो. तो बदलतो, पण हरत नाही. दुसऱ्याच्या दयेवर आश्रित म्हणून राहिलेला ब्राह्मणाचा मुलगा, पैशाशिवाय ऑपरेशन हाती न घेणारा सर्जन, मुलाच्या व्यभिचारीपणाचे निर्लज्जपणे कोडगे समर्थन करणारा बाप, नातवाला स्वतःसारखा महत्त्वाकांक्षी बनवू पाहणारा आजोबा अशा ह्याच्या विविध भूमिकांतून जीवनाच्या प्रतिक्रियेचे एकच निर्दय सूत्र गुंफलेले असते. सर्वसामान्य नीतीच्या बंधनात पापभिरू वृत्तीने जाणाऱ्या सर्वसामान्य जगाची मळकी चौकट वापरून या खलपुरुषाच्या हिरव्या काळ्या थंड हिशेबीपणाचे चित्र अधिक गडद केलेले आहे. हे सगळे चित्र फार जाणवणारे, काहीसे सुन्न करणारे आहे.

त्या मानाने बाकीचे तपशील मात्र निष्कारण पसरट झालेले आहेत. जॉन खानसामा आणि त्याच्या आवडीनिवडी, खेड्यातले वातावरण वगैरे विस्ताराची कादंबरीच्या आकृतिबंधात तशी निकडीची गरज नाही. उलट त्यामुळे निवेदनाचा प्रकाशझोत मुख्य विषयावरून निष्कारण आजूबाजूला गरगरत राहतो

दत्ताजीच्या विशिष्ट जीवनप्रवृत्तीच्या मागे अनेक गोष्टी कारणभूत आहेत. त्याच्या वाट्याला आलेले दरिद्री, अपमानित जीवन, त्याला लाभलेले ढोंगी वडील ही झाली व्यक्तिगत बाह्य कारणे. पण दत्ताजीच्या कडवट हिशेबी निर्घृणतेचे मूळ एकदर सामाजिक विस्कळीतपणात व ढोंगीपणातच आहे. प्रतिष्ठेच्या मापनाच्या आजच्या कसोट्या फारच विलक्षण आहेत. आपण सारेजण त्या कसोट्या अपरिहार्यपणे स्वीकारून ढोंगी मानभावीपणाचे बळी ठरत असतो. दत्ताजीने त्या खरोखर मनापासून प्रामाणिकपणे स्वीकारल्या. त्यामुळे इतरजण बळी ठरले, आणि दत्ताजी नेहमीच त्याच्या दृष्टीने तरी कृतार्थ ठरला. अनेक पराभव आले. व्यथा आल्या, पण दत्ताजीने त्या पचवल्या. त्याच्या चेहऱ्यावरचे विजयाचे हसू कधी मावळले नाही—त्याची जिद्द ही अखेरपर्यंत तशीच राहिली. त्याचीच राहिली. इतरांच्या दृष्टीने ही एका खलपुरुषाची कहाणी असली तरी त्याच्या स्वतःच्या परिमाणांच्या मापांनी मोजल्यावर ती एक सफलतेची कहाणी ठरू शकेल. हे कठोर सत्य अनंत मनोहरांनी आपल्या रोखठोक परिणामकारक भाषेत मांडलेले आहे. संथ वळणा-तली ही कादंबरी नकळत खोल रुतणारी आहे. □ □

---

[ सर्व कादंबऱ्यांचे प्रकाशक : विश्वकर्मा साहित्यालय, पुणे ]

---



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ◻ एक्सप्रेस विद्या

कुठलाही अन्याय दूर करण्यासाठी उपोषणाचा असंबद्ध मार्ग वापरणारी पिढी आता मागे पडली आहे. नव्या पिढीबरोबर नवे मार्ग पुढे येऊ लागले आहेत, व त्यातला एक लोकप्रिय मार्ग म्हणजे आगगाड्या अडविणे. उदाहरणार्थ, काही कॉलेज-विद्यार्थ्यांनी इंटरच्या परीक्षेसाठी चारच विषयांचा अभ्यास करण्याऐवजी पाच विषयांचा करावा लागणार म्हणून निषेध व्यक्त करण्यासाठी म्हणे आगगाडी अडविली. एकदम एक्स्प्रेस उपाययोजना आहे की नाही बोला! शिवाय उपास-तापासासारखा जुना-पुराणा नाही. आता हा उपाय त्या विद्यार्थ्यांना किती उपयोगी पडला याची माहिती उपलब्ध नाही, पण मला वाटते कुठली आगगाडी अडविली गेली यावरही प्रस्तुत निषेधाचे यश अवलंबून असावे. म्हणजे असे की अभ्यासाचे विषय कमी करण्यासाठी मालगाडी अडविली तरी पुरे असा माझा अंदाज आहे. उलट परीक्षेत कॉपी करण्याची सूट हवी असेल तर किमान एक्सप्रेस गाडी अडविल्याखेरीज काम फत्ते होणे नाही. अन् अभ्यास, परीक्षा इत्यादि कटकटी मुळातच कटाप करण्यात याव्यात अशी न्याय्य पण जरा क्रांतिकारक मागणी असेल तर एकच उपाय, व तो म्हणजे डीलक्स गाडी अडविणे.

## ◻ घोड्यापुढे धावणारा साम्यवाद

ईश्वराची लीला अगाध असो की नसो, माओची निश्चित आहे. कारण माओच्या कृपाप्रसादाने साम्यवादी चीनमध्ये जे अनेक चमत्कार आतापर्यंत घडले आहेत त्यात एक नवीन भर पडली आहे. एका चिनी वर्तमानपत्रात अशी बातमी आली आहे की चीनमध्ये एका ठिकाणी काही घोड्या बरीच वर्षे वांझ होत्या. त्यांना शिंगरे झाली असून हा अर्थात माओचा विजय आहे. म्हणजे घोड्यापुढे धावणारी अक्कल माहीत होती तिच्या जोडीला आता घोड्यापुढे धावणारा साम्यवाद निर्माण झाला आहे. आता या चिनी घोड्या माओच्या एकनिष्ठ अनुयायिनी होत्या म्हणून बरे, पण त्यांनी प्रतिगामी लिऊ शाओ-चीचे 'चांगला साम्यवादी कसा व्हावे' हे पुस्तक वाचले असते तर त्यांच्यावर काय अनर्थ ओढवला असता. त्यांना शिंगरांच्या ऐवजी चक्क रेडके झाली असती! ते काही

असो, आता 'क्रांतीची निर्यात' करण्यासाठी माओने एक सुलभ मार्ग दाखविला आहे यात संशय नाही. हिंदुस्थानातले प्राचीन राजे दिग्विजय करण्यासाठी अश्व-मेधाचा घोडा मोकळा सोडीत त्याचप्रमाणे एखादी चिनी घोडी मोकळी सोडली की झाले. आता माओने घडविलेल्या चमत्कारांच्या यादीत एकच शेवटची भर शिल्लक आहे, व ती म्हणजे 'माओचा विचार' करून करून चिनी टोणगे गाभण केव्हा राहणार?

## ¤ गाढवाला टॉफीची चव

इग्लंडमध्ये एका मोटार-अपघातात एका बाईचे पाच दात पडल्यावर तिने फिर्याद केली की यापुढे आपल्याला टॉफी खाता येणार नाही, तेव्हा कोर्टाने तिला दर दाताला १८०० रुपये या हिशेबाने नुकसान-भरपाई मंजूर केली. म्हणजे कायदा गाढव असतो असे यापुढे म्हणून चालणार नाही. कारण गाढवाला गुळाची चव नसते तर टॉफीची कुठून असणार? तेव्हा टॉफीच्या स्वादिष्टपणाला मुकलेल्या या बाईला मिळालेला न्याय हा निश्चित गाढवपणापेक्षा अधिक वरच्या श्रेणीचा आहे. हाच न्याय तिला बिस्किट खाण्यासाठी मिळाला असता काय? मला नाही वाटत. अन् पाव खाण्यासाठी तर नक्कीच मिळाला नसता. आता दर दाताला १८०० रुपये ही किंमत कोर्टाने कुठल्या आधारावर ठरवली हे सांगणे तितकेसे सोपे नाही. कदाचित दातावर मारायला कवडी नसलेल्या एखाद्या इसमाने सांगित-लेल्या दंतकथेत न्यायाधिशाला हा हिशेब सापडला असावा.

## ¤ संपावर न जाणारी कबुतरे

सरकारी ऑफिसात नोकरी करणारी माजरे असतात, त्याचप्रमाणे पोलीस खात्यात नोकरी करणारे कुत्रेही माहीत आहेत, पण परवा वाचले की ओरिसाच्या पोलीस खात्यात कबुतरे वार्ताहर म्हणून नोकरीला ठेवली असून त्यांनी गेल्या वर्षी बारा हजार निरोप नेण्या-आणण्याचे काम केले. आश्चर्य आहे! सबंध वर्षात या कबुतरानी एकदाही संप केला नाही हे खरोखरीच आश्चर्य आहे. कारण आता पोलीसही सप करू लागले आहेत तर पोलीसाच्या कबुतरानी मागे का रहावे? आपल्याला मिळणाऱ्या जोंधळ्याच्या दाण्यात वाढत्या महागाईनुसार वाढ व्हावी असे त्यांना वाटत नाही? त्याचप्रमाणे उडण्याच्या मार्गावर त्यांच्यासाठी बांधलेले खुराडे पोलीसी इतमामाला शोभेलसे रेस्टहाउस असावे असे त्यांना वाटत नाही? अन् मुख्य म्हणजे किती फ्लाइग अवर्स नतर किती दिवस सुटी असावी हे ठर-विण्यासाठी त्याना इडियन एअर लाइनच्या पायलट मडळीशी खलबत करावेसे वाटत नाही? जाऊ द्या, आपल्या काय करायचे आहे, जोंधळ्याच्या त्या दाने दानेपर लिखा है खानेवाले पोलीस-कबूतरका नाम!

## ¤ पुढाऱ्यांवर भुंकण्याची बंदी

कुत्र्यानी सतत भुकणे हा गुन्हा ठरविणारा कायदा करण्यात यावा म्हणून अमेरिकेत एका माणसाने खटपट चालविली असल्याचे नुकतेच वाचले. कल्पना अगदी कायदेशीर आहे यात वाद नाही, पण अडचण एकच–कुठला कायदेपंडित कुत्रा आपल्या जाति-बाधवाना हा कायदा समजावून सागणार? खर म्हणजे कुत्र्यानी भुंकणे, पुढाऱ्यानी भाषणे करणे, चिमण्यानी चिवचिव करणे, बायकानी दुपारच्या चकाट्या पिटणे या गोष्टी नैसर्गिक आहेत. तेव्हा त्याच्यावर कुठलाही निर्बंध घालताना सखोल विचार व्हायला पाहिजे. एखाद्या पुढाऱ्यावर भाषणबदी घातली तर त्याने कितीही पैसा खाल्ला तरी तो वाळत जाऊन झुरणीला लागेल. तीच स्थिती कुत्र्याची. शिवाय 'सतत' भुकणे याची कायदेशीर व्याख्या काय? किमान दोन-अडीच तास अस्खलित असबद्ध भाषण झोडणाऱ्या पुढाऱ्यावर सतत भुकण्याचा आरोप ठेवता येईल काय? मला नाही वाटत. शिवाय पुढाऱ्यात नसलेला एक गुण कुत्र्यात असतो. कुत्रा जितका रागाने भुकतो तितकाच लाडाने शेपूटही हलवतो. पण मत्रिपद न मिळाल्याने रागावलेला पुढारी काय करतो, तर विरोधी पक्षाला जाऊन मिळतो. म्हणजे एका धन्याचा गळपट्टा तोडून दुसऱ्याचा गळपट्टा घालून मिरवतो. तात्पर्य काय, बोलभाड माणसाच्या या जगात फक्त कुत्र्यानीच डॉग-बिस्कीट गिळून स्वस्थ का बसावे हे मला समजत नाही.

## ¤ सुग्रास मोटार

ऑस्ट्रेलियातला एक माणूस चार वर्षात एक सबध मोटारगाडी खाणार आहे असे वर्तमानपत्रात वाचल्यावर वेल्समधल्या एका पैलवानाने केवळ देशाभिमानाने प्रेरीत होऊन असा निर्णय घेतला आहे की, आपण या माणसावर कडी करण्यासाठी फक्त दोन वर्षात एक सबध बसगाडी फस्त करायची. याला म्हणतात देशभक्ती! आम्हीच असे करटे कसे की, त्या ऑस्ट्रेलियन माणसाचा बेत वाचून साधी सायकल खाण्याचाही विचार आमच्या मनाला शिवला नाही! निदान "नाष्ट्यासाठी मी रोज तावे खातो" असे सांगणारा एक माणूस हल्ली आपल्या वर्तपमानपत्रातल्या जाहिरातीत नेहमी दिसतो. त्याने तरी देशाभिमानाखातर आपला मेन्यू बदलून तांब्याच्या ऐवजी मोटारीच्या लोखडी पत्र्याचा समाचार घ्यायचा होता! छे, छे, भारताच्या मानहानीचा हा कलक धुऊन काढण्यासाठी आता मला आमरण उपोषणच केले पाहिजे. म्हणून मी या क्षणी भीष्म-प्रतिज्ञा करतो की, मरेपर्यंत मी एकही मोटार खाणार नाही,–इतकेच काय पण पेट्रोलचा एक थेबही पिणार नाही.

¤ ¤ ¤

 ( पृष्ठ २३ वरून)

निकड अधिक तीव्रतेने भासू लागली. रात्र पडल्यावर, अधाराचा फायदा घेऊन, आपला वेग वाढवून ' बिस्मार्क ' सफोक–नॉरफोकना गुगारा देऊ शकली असती. तेलगळीची वार्ता टोव्हीना विशेष महत्त्वाची वाटली नव्हती. शत्रूची गती अनिर्बंध आहे असेच त्यांनी गृहीत धरले होते. त्यामुळे रात्रीपूर्वी ' बिस्मार्क 'ची ही गती कशी रोखावी, हाच त्यांच्यापुढील सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न होता.

या प्रश्नाचा खल करणाऱ्या टोव्हीना आपल्याला असलेल्या दैवानुकूलतेची त्या वेळी कल्पना नव्हती...आश्चर्याची गोष्ट अशी होती की किंग जॉर्ज द फिफ्थ या युद्धनौकेचे नेतृत्व लाभलेल्या टोव्हीच्या प्रतिकार–प्रयत्नांची ॲडमिरल लटयेन्सला मुळी दादच नव्हती. खरे म्हणजे प्रिन्स ऑफ वेल्सलाच तो किंग जॉर्ज द फिफ्थ समजला होता. आणि ' बिस्मार्क 'शी खऱ्या अर्थाने तुल्यबळ अशी किंग जॉर्ज द फिफ्थ एकच युद्धनौका ब्रिटिश नौदलात होती. तिच्यापासून धोका उरला नाही अशा कल्पनेने ' बिस्मार्क 'चा वेग लटयेन्सने मर्यादित ठेवला होता.

आणि इकडे टोव्हीचा काफिला कमाल वेगाने ' बिस्मार्क 'जवळ सरकत होता. किंग जॉर्ज द फिफ्थचा जर्मन आरमाराला वचक वाटत असे. दैवाचे पाठबळ मिळाले तर दुसऱ्या दिवशी सकाळी लढाईला तोंड लागणे शक्य आहे, अशी टोव्हीची अटकळ होती.

पण त्यासाठी ' बिस्मार्क 'ची गती रोखणे आवश्यक होते. नाहीतर रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवून ती पसार होण्याची भीती होती. टोव्हीच्या काफिल्यात व्हिक्टोरियस ही विमानवाहू नौका होती. पण या नौकेचा भरवसा कसा धरावा? कारण मुळी डेकवर विमाने उतरवण्याचा सराव तिच्यावरील वैमानिकांना नव्हता. शिवाय आता समुद्र खवळलेला होता. व्हिक्टोरियस वेडीवाकडी हालत होती. धुक्यामुळे वातावरण कुंद झाले होते. आणि विमानाची धाव शत्रूपर्यंत जेमतेमच रेटता येणार होती. परतताना त्याचे काय होईल, याचा विचार करवत नव्हता. पण टोव्हींना गत्यंतरच नव्हते.

स्कापा फ्लो येथे असताना, व्हिक्टोरियस अपुऱ्या तयारीनिशी तिच्या नवख्या अवस्थेत, गृहसंरक्षक नौदल विभागाबरोबर मोहिमेवर येऊ शकेल काय, असे टोव्हींनी जेव्हा कॅप्टन बॉवेल या तिच्या कर्णधाराला विचारले होते तेव्हा त्याने तत्परतेने होकार दिला होता. आता अशा प्रतिकूल परिस्थितीत, ' बिस्मार्क 'वर विमानहल्ला करणे शक्य होईल काय, असे विचारल्यावरही, बॉवेलने, क्षणाचा विलंब न लावता पुन्हा होकार दिला!

त्या दिवशी दुपारी तीन वाजता, टोव्हींनी ' बिस्मार्क 'वर टॉर्पेडोमारा कर-

ण्याचा आदेश विमानवाहू व्हिक्टोरियसवरील विमानांना दिला. त्या आदेशाबर-हुकूम ' बिस्मार्क 'ला विमानाच्या टप्प्यात आणण्यासाठी युद्धनौकाची सोबत सोडून, व्हिक्टोरियस सेकंड क्रूझर्स स्क्वाड्रनसमवेत कमाल वेगाने पुढे निघाली. संध्याकाळी नऊ वाजेपर्यंत ' बिस्मार्क 'ला माराच्या टप्प्यात आणता येईल, असा कॅप्टन बॉवेलचा अंदाज होता.

त्याच सुमारास खुद्द ' बिस्मार्क 'वर अधिकाऱ्याची खलबते चालू होती. ती संपवून त्यानी जो निर्णय घेतला त्याने व्हिक्टोरियसच्या विमानहल्ल्याच्या प्रयत्नात थोडेच विघ्न येणार होते. ' बिस्मार्क 'ची सहचरी प्रिन्स युजेन तेल भरून घेण्या-साठी, ' बिस्मार्क 'ची सगत सोडून, वेगळ्या मार्गाने जाणार होती. प्रिन्स युजेनचा मार्ग निर्वेध करण्याची जबाबदारी ' बिस्मार्क 'ची होती. सहा वाजून तीस मिनिटे झाली होती. ' बिस्मार्क ' दाट धुक्याच्या पडद्याआड होती. – आणि मोहोरा फिरवून अचानक सफोकवर घसरली. परंतु सफोकवरील विश्वासू रडारमुळे, अनपेक्षितपणाचा फायदा ' बिस्मार्क 'ला उठवता आला नाही. लगटणाऱ्या ' बिस्मार्क 'ला चुकवण्यावाचून गत्यंतर नव्हते कॅप्टन एलिसने सफोक वळवली. तोपर्यंत ' बिस्मार्क ' अवघ्या अकरा मैलांवर येऊन ठेपली होती. तिच्या तोफातून गोळे सुटले. त्यांचा नेम अचूक असता तर सफोकचा लगेच चक्काचूर झाला असता. पण सुदैवाने तसे झाले नाही. आणि ' बिस्मार्क 'च्या गोलंदाजांना अचूक माराचा टप्पा मिळेपर्यंत सफोकने धुराचा पडदा निर्माण करून त्याचा आडोसा घेतला.

सफोकने चकवले आणि ' बिस्मार्क ' नॉरफोक व प्रिन्स ऑफ वेल्सच्या टप्प्यात आली. त्यांनी ताबडतोब तिच्यावर तोफमारा सुरू केला. ' बिस्मार्क ' पूर्ण वेगाने पश्चिमदिशेला वळली. या चपळ व धूर्त हालचालीमुळे जर्मनांचे नियोजित उद्दिष्ट सफल झाले होते : प्रिन्स युजेन सहीसलामत निसटली होती.

या सगळ्या धकाधकीत, अनपेक्षितपणे, जर्मनांचा आणखी एक मोठा फायदा झाला. अभावितपणे ' बिस्मार्क ' व्हिक्टोरियसपासून अधिक दूर गेली होती. त्यामुळे व्हिक्टोरियसच्या विमानाना अंधार पडण्यापूर्वी ' बिस्मार्क 'ला गाठणे शक्य होणार नव्हते. नेमके सांगायचे तर रात्रीचे दहा वाजले तरीही ' बिस्मार्क ' व्हिक्टोरियसच्या विमानांच्या टप्प्याहून वीस मैल दूर होती. म्हणजे नऊ वाजेपर्यंत ' बिस्मार्क 'ला गाठता येईल, हा कॅप्टन बॉवेलचा हिशेब सपशेल चुकला होता.

शिवाय हवामान सारखे अधिकाधिक बिघडत चालले होते. पावसाच्या धूमधार सरी कोसळत होत्या. वाऱ्याचा वेग वाढत होता. व्हिक्टोरियसचा डेक-विमानतळ विक्राळ समुद्रात भयानक हेलकावे खात होता. कॅप्टन बॉवेलच्या वैमानिकांनी भर समुद्रात डेक-विमानतळावर विमाने उतरवण्याचा अनुभव एकदाही घेतला नव्हता. मग इथे तर शत्रूशी चार हात करून उतरण्याचा सवाल होता. शत्रूशी चार हात

करताना जायबदी होण्याचा वा विमानातील तेल संपण्याचा धोका होता.

पण आता सर्व धोके पत्करण्यावाचून गत्यतरच नव्हते. अधिक उशीर करण्यात अर्थ नव्हता.

व्हिक्टोरियसच्या डेक-विमानतळावर सोर्डफिश व फुलमार जातीची छोटेखानी विमाने उभी राहिली. टॉर्पेडोमारा करणाऱ्या सोर्डफिशना, शत्रूचे लक्ष स्वतःकडे वेधून, साहाय्य करण्याची जबाबदारी फुलमार्सवर होती. नवख्या पण साहसी वैमानिकांनी विमानाचा ताबा घेतला. हेलकावे खाणाऱ्या डेकवरून मधूनच लाटांचे पाणी जात होते. दूर आकाशात अंधार दाटत होता.

इशारत मिळताच एक एक विमान हवेत उडाले, आणि कोसळणाऱ्या पावसात अदृश्य झाले. यातील किती विमाने परत येतील, याचा विचार करत कॅप्टन बॉविल एकटाच कितीतरी वेळ काळवंडणाऱ्या आकाशाकडे एकटक पाहात उभा होता.

दहा वाजून दहा मिनिटे झाली होती. विमानांना एक तास चाळीस मिनिटांचा अवधी होता. 'बिस्मार्क'चा शोध करणे, टॉर्पेडो टाकणे आणि परत व्हिक्टोरियसवर येणे, हा कार्यक्रम तेवढ्या थोड्या अवधीत उरकायचा होता.

विमानांना ढगातून आणि पावसातून वाट काढावी लागत होती. एका तासाच्या मार्गक्रमणानंतर 'बिस्मार्क' सापडली असे वाटले. परतु ढगाचा जाड पडदा भेदून विमाने माऱ्यासाठी जेव्हा खाली आली तेव्हा 'बिस्मार्क' ऐवजी त्यांना दर्शन झाले सफोक-नॉरफोकचे. त्यांनी पुढे धाव घेतली; परतु धुक्यामुळे त्याचा गोंधळ उडाला. ती चुकीच्या दिशेने जाऊ लागली, परतु खालून नॉरफोकने व्याकुळ होऊन दिलेले इशारे पाहून वेळीच योग्य मार्गावर आली.

थोडा वेळ झाला आणि अखेर 'बिस्मार्क' दिसली. तत्काळ विमानांनी ढगातून तिच्यावर गरुडझेप घेतली. खालची नौका स्पष्ट दिसली तेव्हा मात्र त्यांना आश्चर्याचा आणि उद्वेगाचा धक्काच बसला. ती 'बिस्मार्क' नव्हतीच भलतीच कोणीतरी अज्ञात बोट होती ती. (किनारपट्टीवर फेऱ्या घालणारी–कोस्टगार्ड कटर 'मोडॉक' ही अमेरिकन आरमाराची नौका त्याच वेळी तेथे प्राप्त झाली होती.) विमानांनी तशीच आकाशात उसळी मारली. आणि सहा मैलावर असलेली 'बिस्मार्क' त्यांना स्वच्छ दिसली. निश्चित 'बिस्मार्क'च होती ती. परतु आता अनपेक्षित हल्ला चढवण्याचा विमानाचा डाव फसला होता. एकूण 'बिस्मार्क'चे भाग्य जोरावर होते. येणारी विमाने पाहताक्षणी 'बिस्मार्क' सावध झाली, आणि ती जवळ येताच 'बिस्मार्क'ने त्यांच्यावर आग ओकायला सुरुवात केली.

यत्किंचित विचलित न होता, त्या नवख्या वैमानिकांनी अग्निवर्षाव झेलीत, टॉर्पेडोमाऱ्याची तयारी केली. त्या अमेरिकन नौकेला एक चित्तथरारक समरप्रसंग अगदी जवळून पाहायला मिळाला.

विमानानी आपले गट मोडले आणि चोहोबाजूंनी ती ' बिस्मार्क 'वर झेपावली. विमानवेधी तोफातून अग्निबाण सुटत होते. त्याचा कर्णकटु आवाज आसमतात भरला होता. त्या मद गतीच्या, बोजड, टॉर्पेडो पोटात असल्यामुळे अवघडलेल्या विमानानी अग्निवर्षावाकडे लक्षच दिले नाही. ' बिस्मार्क ' मात्र स्वसरक्षणासाठी अग्निबाणाचे छतच शिरावर उभे करण्याचा यत्न करत होती.

एक, एक, आणखी एक, एकापाठोपाठ एक टॉर्पेडो विमाना ी पाण्यात टाकले. हिंस्र जलचरासारखे ते ' बिस्मार्क 'च्या रोखाने सरकू लागले. त्यातील बहुतेक चुकले. एक मात्र अचूक लागला. प्रचड स्फोट झाला आणि ' बिस्मार्क 'चा एक भाग घनदाट काळ्या धुराने लपेटला गेला.

विमाने परत निघाली. अजूनही त्याच्यावर आग बरसतच होती. दैव मात्र त्या विमानाना इतके अनुकूल होते की ' बिस्मार्क 'च्या प्रखर माऱ्यातूनही ती सही-सलामत सुटली होती. पण त्याच्यापुढे दुसरे भयानक सकट उभे होते. व्हिटोरियस-वर परतायला आता चांगलीच रात्र होणार होती. आणि आयुष्यात प्रथमच ते भर समुद्रात, हेलकावणाऱ्या डेक-विमानतळावर विमाने उतरवणार होते !

अज्ञात नौकेवरील अमेरिकन प्रेक्षकाना त्या तरुण, नवख्या वैमानिकाची सपूर्ण साहसकथा अज्ञातच होती. पुढे तिचे वर्णन करताना दर्यासारंगानी ' विलक्षण कौतुका-स्पद ' असे विशेषण योजून तिचा यथोचित गौरव केला.

इकडे व्हिक्टोरियसवर कॅप्टन बॉवेलला हुरहूर लागली होती. अधार दाटू लागला होता. त्या अधारात कोठेतरी त्याची झुजार विमाने भिरभिरत होती. अग्नि-दिव्यातून ती सुरक्षित राहतील याची त्याला खात्री वाटत नव्हती; आणि सुरक्षित राहिली तरी त्या धोकेबाज विमानतळावर ती उतरवणेदेखील जीवावरचे काम होते.

एका टॉर्पेडोने ' बिस्मार्क 'ला जखम केल्याची वार्ता ऐकून टोव्हीनी व्हिक्टो-रियसच्या वैमानिकाचे मनमोकळे कौतुक केले. त्याचे नवखेपण आणि बिघडलेले हवामान लक्षात घेता नौकेवरून विमाने उडाली हेच आश्चर्य; मग ' बिस्मार्क 'चा शोध करून तिला जायबदी करणे केवळ अद्भुत होय, अशी स्वच्छ कबुली टोव्हीनी दिली. आता पाळत ठवणाऱ्या नौकाकडून शत्रूची नेमकी अवस्था जाणायला ते उत्सुक झाले होते

परतु बराच वेळ गेला तरी काहीच कळले नाही.

व्हिक्टोरियसवर कॅप्टन बॉवेलने पुन्हा एकदा परिस्थितीचा आढावा घेतला. काळोख अधिकाधिक दाटत होता. त्याचबरोबर पाऊसही कोसळत होता. आणि त्याच्या विमानाचा पत्ता नव्हता.

आणि अचानक परिस्थिती अधिकच गभीर झाली. व्हिक्टोरियसवरील, परत-णाऱ्या विमानाना दिशा दाखवणारा दिवा एकदम विझून गेला. डेकवर सारा अधार पसरला. सर्वांचे डोळे अधाराचा भेद करण्याचा प्रयत्न करत होते, आणि कान परतणाऱ्या विमानांच्या इंजिनाचा आवाज ऐकण्यासाठी टवकारले होते.

इतक्यात कॅप्टन बॉविलला एक कल्पना सुचली. त्याने नौकेवरील प्रकाशझोत फेकणारा प्रत्येक दिवा लावला. प्रकाशाचे झोत अधाराचा भेद करत आकाशात फिरू लागले. परतणाऱ्या विमानाना ते दिसावेत अशी बॉविलची इच्छा होती.

व्हिक्टोरियसबरोबर असलेल्या सरक्षक क्रूझर्सपैकी एका क्रूझरवर असलेल्या व्हाईस अॅडमिरल कर्टिसचा आपल्या डोळयांवर विश्वासच वसेना. बॉविलच्या नौकेवरील दिवे म्हणजे कर्दनकाळ जर्मन पाणबुड्यांना आमत्रणच होते ! सागरावरील निशायुद्धातील प्राथमिक नियमच बॉविलने मोडला होता. व्हाईस अॅडमिरल कर्टिसने बॉविलला ताबडतोब दिवे विझवायचा हुकुम दिला.

बॉविलला आपल्या विमानाशिवाय दुसरे काही सुचत नव्हते. कर्टिसचा हुकुम त्याने धुडकावून लावला. काही वेळ गेला. कर्टिसने बॉविलला पुन्हा फर्मावले. नाइलाज होऊन बॉविलने दिवे विझवले. मग त्याने निराळीच युक्ती काढली. अत्यंत प्रकाशझोत टाकणारा इशारतीचा एकच दिवा त्याने लावला; आणि प्रकाशखुणाच्या साहाय्याने, कर्टिसकडे सारे दिवे पेटवण्याची परवानगी मागितली. हे अर्थात नुसते निमित्त होते. इशारतीचा दिवा तरी विमानाना दिसावा, असे बॉविलला वाटत होते.

कर्टिसचे उत्तर येण्याआधीच, दुरून येणाऱ्या विमानाचा उत्साहवर्धक आवाज कानावर आला. बॉविलने इशारतीचा दिवा विझवला. त्याची विमाने एका विलक्षण मोहिमेवरून परतत होती ! डोळयात प्राण आणून तो विमानाचे अवतरण पाहू लागला. पुढील दोन तासांच्या अवधीत डळमळणाऱ्या डेकवर, एक एक विमान उतरले. त्या अवतरणात तत्रशुद्धता नव्हती. तरीही बहुतेक सारी विमाने सुदैवाने सुखरूप होती. सर्वस्वी अशक्य वाटणारी गोष्ट प्रत्यक्षच घडली होती. व्हिक्टोरियसवर उत्साहाचे एकच वारे सचारले. आणि टॉर्पेडोमारा यशस्वी झाला हे कळल्यावर तर त्याच्या आनदाला सीमा उरली नाही.

मौजेची गोष्ट अशी होती की परतणाऱ्या विमानांना बॉविलने बेदरकारपणे पेटवलेले दिवे दिसलच नव्हते त्यांना कर्टिसने बॉविलला दिवे बद करण्याचा हुकुम देण्यासाठी योजलेला दिवा तेवढा दिसला होता !

मात्र बराच वेळ झाला तरी दोन फुलमार विमानांचा पत्ता नव्हता. बॉविलने पुन्हा पुन्हा दिव्यानी इशारत दिली; परतु ती विमाने आलीच नाहीत. अधार आणि महासागर यानी आपले हविर्भाग घेतले होते !

ढळलेल्या दिवसाचा आढावा टोव्हीनी घेतला. त्यांच्या दीर्घ नाविक कारकीर्दीतदेखील इतका दुर्दिन त्याच्या वाटयाला क्वचितच आला होता. पहाटे पहाटे हूडसारख्या बलाढय लढाऊ नौकेला 'बिस्मार्क'ने जलसमाधी दिली होती. प्रिन्स ऑफ वेल्सने इतका मार खाल्ला होता की तिच्या नवीन तोफा काही प्रमाणात निरुपयोगी झाल्या होत्या.

'बिस्मार्क' आता नागमोडीने चालत होती. जर्मन पाणबुड्या जवळपास कोठेतरी असतील असा तिचा अदाज होता; आणि त्यांनी ब्रिटिश नौकांकरता

सोडलेला टॉर्पेडो स्वत थांववण्याची 'बिस्मार्क'ची बिलकुल इच्छा नव्हती. इकडे तेलभरीसाठी आईसलॅंडला जावे लागल्यामुळे सर टोव्हीजवळ सरक्षक विनाशिका उरल्या नाहीत. लवकरच त्याच कारणासाठी रिपल्स या युद्धनौकेचीही सोबत सुटणार होती.

त्वरेने 'बिस्मार्क'चा शोध करून, हिमतीने तिचा पाठलाग करून सकाळी तिला युद्धातही खंचली होती. त्यामुळे तिच्या नियोजित कार्यक्रमात खीळ पडेल अशी आशा होती. पण ती फोल ठरली. सोर्डफिशच्या टॉर्पेडोनेही 'बिस्मार्क'चे चिलखत भेदले गेले नव्हते वा तिची गती कमी झाली नव्हती.

आलली रात्र वैऱ्याची आहे, जागे राहिले पाहिजे, अशी खूणगाठ टोव्हींनी मनाशी बाधली.

दरम्यान इकडे सफोक आणि नॉरफोकवर माणसे अधिकच दक्ष झाली होती. व्हिक्टोरियसवरून आलेली, चुकीच्या दिशेने जाऊ लागलेली विमाने नॉरफोकने नुकतीच योग्य मार्गाने धाडली होती. इतक्यात धुक्यातून एक नौका सरळ नॉर-फोकवर चाल करून येताना दिसली. ती 'बिस्मार्क' आहे, असे कॅप्टन फिलिप्सचे मत पडले. म्हणून त्याने तावडतोब नॉरफोक वळवली. परंतु रिअर-ॲडमिरल वेकवॉकरला कॅप्टन फिलिप्सचे मत पटेना. त्यांची खडाजगी झाली. मग ती 'बिस्मार्क' असावी असे वेकवॉकरलाही वाटू लागले. कारण त्यावेळी त्या विभागात दुसऱ्या कोणत्याही नौकेच्या अस्तित्वाची दाद नव्हती. त्यानी प्रिन्स ऑफ वेल्सला तोफा डागायला सांगितले. पण काहीच घडले नाही. प्रिन्स ऑफ वेल्सच्या ध्वनि-क्षेपण-यत्रणेत काही तांत्रिक बिघाड झाला होता. वेकवॉकर हात चोळत बसला. शत्रूवर जवळून, अनपेक्षित हल्ला चढवण्याची लाभलेली सोन्यासारखी सधी हातची गमावली होती. आक्रमक नौकेचे धूड धुक्यात दिसेनासे झाले. आता तात्रिक बिघाड दुरुस्त झाल्यामुळे, प्रत्युत्तर करून, प्रिन्स ऑफ वेल्सने गेलेली नौका 'बिस्मार्क' नसावी असे आपले हुच्च मत वेकवॉकरला कळवल.

प्रिन्स ऑफ वेल्सचे मत बरोबर होते. ती 'बिस्मार्क' नव्हतीच. व्हिक्टोरियसच्या विमानाना चकवणारी, किनारपट्टीवर फेऱ्या मारणारी अमेरिकन नौकाच होती ती. तिचे नशीब भलतेच बलवत्तर असले पाहिजे. कारण प्रथम सोर्डफिशच्या टॉर्पेडोमाऱ्यातून आणि आता प्रिन्स ऑफ वेल्सच्या तोफमाऱ्यातून ती सुरक्षित राहिली होती. पुन्हा मात्र ती नौका दिसली नाही. बहुधा, या बड्याच्या लढाई-तून, स्वत चे अंग, खरचटण्याआधी, वेळीच काढून घेण्याचे शहाणपण तिच्या कर्ण-धाराला सुचले असावे.

रात्र पडली आणि 'बिस्मार्क'ने प्रिन्स ऑफ वेल्सवर काही गोळे टाकले. प्रिन्स ऑफ वेल्सनेही तिला प्रत्युत्तर दिले. काळवडलेले आकाश काही काळ अग्निरेखानी उजळून निघाले. तोफांचे आणि लाटांचे आवाज एकमेकांत मिसळून गेले. थोड्या वेळाने सारे शात झाले. (क्रमशः)

# धरती

भाई भगत

आपण मोठ्या अपेक्षा घेऊन एखादं चित्र पाहायला जावं नि ते पाहिल्यावर आपल्याला अपेक्षाभंगाची शिक्षा मिळावी. तशी अवस्था चित्रालय (मद्रास)चा धरती हा अतिसामान्य बोलपट पाहून माझी झाली. ह्या चित्रालयच्या निशाणाखाली निर्माते-दिग्दर्शक व लेखक श्रीधर ह्यांनी ह्यापूर्वी 'दिल एक मंदिर' व प्यार किये जा' असे दोन सर्वांगसुदर बोलपट सादर केले होतें. पैकी 'दिल एक मंदिर' हा एक हेतूप्रधान बोलपट होता. त्यातील राजकुमार, राजेंद्रकुमार व मीना कुमारी ह्यांच्या कामाची तारीफ करावी का श्रीधर ह्यांच्या कल्पक दिग्दर्शनाचं कौतुक करावं ह्याचा संभ्रम पडावा! त्या बोलपटाचे वेळी श्रीधरनी सबंध बोलपट इन्डोअर घ्यावा अशी कल्पना होती. परंतु मेहमूद-शुभा खोटेच्या गाण्यासाठी एकच आऊटडोअर सिक्वेन्स टाकावा लागला. त्यानंतरचा त्यांचा दुसरा बोलपट म्हणजे 'प्यार किये जा' शशी कपूर व किशोरकुमार ह्यांच्या अभिनयाचा गिरसप्पा. स्लॅपस्टिक कॉमेडीचा सर्वोत्कृष्ट नमुना. इतक सुदर चित्र मद्रासकडून यावं या बाबत अचंबा तर वाटलाच पण त्याबरोबर ह्या चित्रपटाच्या गुणी दिग्दर्शकाचं अभिनदन करावंसं वाटलं. ही दोन चित्रं पाहिल्यावर मद्रासचा एकमेव कल्पक दिग्दर्शक म्हणून श्रीधर ह्यांचंच नाव घ्यावं अस वाटायला लागल. आणि त्या-साठीच 'धरती' हा रंगीत बोलपट पाहिला मोठ्या अपेक्षेनं मी गेलो.

प्रथमत: 'धरती' हे टायटल वाचून अशी कल्पना होते की बहुधा एखाद्या शेतकऱ्याची व जमीनदाराची ही कथा असेल. शेतकरी आपल्या धरतीवर जिवापाड प्रेम करणारा असेल. पण लोकहो, उत्तम बोलपट सादर करणाऱ्या श्रीधरना कुणाची तरी दृष्ट लागलेली दिसते. त्यानी ह्यावेळी कथा लिहिलीय कुठल्यातरी बसतपूर नावाच्या एका छोट्या सस्थानाची. हे संस्थान म्हणे भारताजवळच कुठं तरी असते. कथेला काळवेळाचं बधन नाही. स्वतत्र भारतावरोबर हेलिकॉप्टर्स इथं दिसायला लागली. त्यावरून वाटतं की हा काळ भारत स्वातंत्र्यानंतरचा म्हणजे १९४६ नंतरचा असावा. अशा ह्या सस्थानचा अधिपती म्हणजे दिवाणाच्या हातचं बाहुलं असतो. राजाची मुलगी परदेशात शिकायला असते. तिथ नायकही असतो- ओळख तोही ही राजकन्या आगाऊपणे करून घेते.- प्यार-दिल-दिलकी धडकन्- परदेशातील रस्त्यावरनं प्रेमगीतं इ. मामला सुरू होतो. आणि इथं बसंतपूरमधे जन-क्रांतीची लाट येते—का ते समजत नाही. कारण तशा घटनाच नाहीत मुळी.

मग दिवाणाच्या सांगण्यावरून राजा राजकन्येला बोलावणं पाठवतो–राजकन्या आपल्या अलीशान शाही विमानातून यायला निघते. अर्थात बरोबर नायकही हवाच. मग विमानाला ॲक्सीडंट-परत अनेक नाट्यपूर्ण प्रसग–आणि मग प्रसंगांची खिचडी (अर्थात नको असलेल्या). त्यानतर दिवाणाच्या गोळीला क्रांतिकारक बळी पडतो. तो नायकाचा मित्र असतो. नायक त्याच्या पार्टीच काम पुढं चालवतो– अनेक प्रसंगांची नि नाचगाण्याची खैरात. शेवटी नायक–नायिका मीलन. बस्स. प्रेक्षक ह्या अठरा रिळांत अगदी बेजार होऊन जातो. आणि म्हणतो–' यार डायरे-क्टरको गोली मारनी चाहिये. '

असा हा कथाहीन 'धरती.' सध्याच्या फॅशनप्रमाणे दिग्दर्शकांनी परदेशची वारी केली आहे. कशासाठी ते कारण समजत नाही. भूमिकांच्या बाबतीत शिवाजी गणेशनचं हिंदी बोलपटातलं पदार्पण विशेष समाधान देत नाही. आपल्याकडचे मराठीतील कलावंत ह्यापेक्षा अधिक चांगली कामे करतील हिंदी बोलपटात. त्याचे संवादही डब केल्यासारखे वाटतात. एकूण शिवाजी गणेशन दाक्षिणात्य प्रेक्षकात लोकप्रिय असेलही कदाचित. पण हिंदी पडद्यावर समाधान देऊ शकत नाही. राजेंद्रकुमार, वहीदा रेहमानबद्दल काय लिहावे? मला फक्त अभिनय-ष्टया आवडला बलराज सहानी. ह्यांचा इन्स्पेक्टर चंद्रशेखर आणि तेवढीच कामिनी कौशलन साकार केलेली नायकाची माता. अभिनयात ही दोनच माणसं इतरांवर प्रभाव पाडतात.

सेटींग्ज बरी वाटतात. फोटोग्राफीबद्दल लिहिताना असं म्हणावसं वाटतं की आऊटडोअर्समध्ये आर्टिस्टच्या तोंडावर मारलेले रिफ्लेक्टर्स बऱ्याचवेळा हालतात. कॅमेरामनसाहेब, पुढल्या बोलपटाचेवेळी असं होऊ न देण्याची खबरदारी घ्यावी हे उत्तम !

संगीत आहे शंकरजयकिसन ह्यांचं. पण त्याबाबत विशेष समाधान मिळत नाही. मला वाटतं संगीतदिग्दर्शकांजवळचा स्टॉक संपला असावा बहुतेक. कारण एकही गाणं लक्षात राहत नाही. फक्त एक गाणं म्हणजे दारूच्या गुत्त्यातलं, जे 'शू शू' हे आहे ते टेकींगच्यामळं लक्षात राहते. वास्तविक त्यावेळी काही अति-लहान प्रेक्षक गाण्याच्या आरंभातील शब्दांमुळे थिएटरबाहेरच गेले होते. (अर्थात् बरोबर पालकांना घेऊन)

एवंच. श्रीधर महाशयांनी आपल्या पहिल्या दोन बोलपटांप्रमाणे विचारप्रवर्तक किंवा बुद्धीला पटतील असे चांगले बोलपट द्यावेत. असे १८ रिळांचे डबे भरून सुबुद्ध प्रेक्षकांच्या माथी मारू नयेत. चित्रपट संपल्यावर सुबुद्ध प्रेक्षक सोडाच परंतु सामान्य प्रेक्षकही पुढल्या खेळाच्या प्रेक्षकांना सांगत होते –' यारं वापस जावो – डायरेक्टर धरतीपर नही है – आस्मानपर जाकर पिक्चर बना रहा है ऐसा मालूम होता है।'

□ □ □


पाटचा वाचायच्या. मरीन ड्राईव्हवर एक चक्कर टाकून तिथली झळाळी एकदा नजरेखालून घालायची. एखादी फेरी मलबार हिलवर-राणीच्या गळयातली हिऱ्यांची माळ आणि मान मोडायला लावणारे २५–३० मजली "स्काय स्क्रपर्स" दुरून बघण्यासाठी. जमल्यास एक भेळ मारणे.

पण हा सगळा कार्यक्रम लवकर आटपायचा. उशीर नको. प्रमुख रस्ते सोडायचे नाहीत. बाजूच्या गल्लीबोळात जाण्याची गरज नाही. कुलाब्यातही अधिक खोलात शिरण्याची आवश्यकता नाही. या उसळत्या मुंबईचं एकदा दर्शन घ्यायचं आणि समाधानाने घरी परतायच. गुलजार शोरुम्स समोर कधी कधी हिडीस अगांचे भिकारी बसलेले असतात. त्याच्याकडे क्रूरपणे दुर्लक्ष करायचे. आणि कपडयांचे एवढे लोभसवाणे प्रकार ! कुठून आणत असतील बरं हे लोक पैसे ? असल्या वाह्य विचारात वेळ घालविण्याचीही गरज नाही. झटपट चमकती झगागती मुंबई बघायची. व्ही. टी. किंवा चर्चगेटवर बसने यायचं आणि थर्डमध्ये दडावर मान टाकून घरची दिशा धरायची. सारे कसे सुरक्षित. घरी आलात की पुन्हा सारी दारे खिडक्या लावून आपल्या तिजोरीत सुरक्षित.

सुरक्षिततेचा एवढा कडेकोट बदोबस्त असताना मुंबईत सध्या सर्वत्र असुरक्षितते-बद्दल एवढी हाकाटी का चालू आहे याचच आश्चर्य वाटतं. पोलीस भ्रष्ट असल्याचं सागतात. पण पोलीसाच्या सबध तुमच्याशी कधी तरी येतो का ? आणि एवढी मोठी मुंबई ! नव्या अदाजाप्रमाणे सध्याची लोकसख्या ५० लाख. त्यातले १० लाखाहून जास्त झोपडपट्टीत. न मोजलेले आणखी किती आहेत कुणास ठाऊक. या सर्वांच्या सुरक्षिततेची काळजी घ्यायची म्हणजे काय साधी गोष्ट आहे ! प्रत्येकाच्या मागे एक पोलीस थोडाच ठेवता येणार. आणि शिवाय पोलीसांचा आणि सुरक्षिततेचा काय सबंध ? पोलिसाशी अधिक संबंध न ठेवणे हाही एक सुरक्षिततेचा भागच.

तेव्हा मुळीही शंका नको. विशालकाय महामुंबई हे एक अतिशय सुरक्षित ठिकाण आहे. काही साधे नियम पाळले तर इथे लुबाडले जाण्याची, तुमचा खून होण्याची, गुंडाच्या तावडीत सापडण्याची किंवा बस अथवा लोकलखाली सापडून जीव गमावण्याची शक्यता अगदी कमी. तेव्हा समस्त भारतवासीयानो ! इथे नोकऱ्या भरपूर आहेत, कारखाने आणखी जोराने निघताहेत, नोकरी नाही मिळाली तर पैसे मिळविण्याचे इतर अनेक सोपे उद्योग आहेत. म्हणून तुम्ही या ! मुंबईत या ! आम्ही समस्त थर्डक्लास मुंबईकर लोकलच्या थर्डक्लासमध्ये तुम्हाला कड-कडून भेटू !

— वार्ताहर



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

११ ते १७ एप्रिल १९७०

**मेष** : या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला सौख्यदायक आहे. रवी बारावा (ता. १३ नंतर पहिला) मंगळ दुसरा, बुध-शुक्र-शनी पहिले, गुरु सातवा व राहू अकरावा असे सर्व ग्रह शुभफलदायी आहेत. चंद्राचे भ्रमण २।३।४।५ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शनिवारी-रविवारी धनयोग आहे. धाडसाच्या व्यवहारात यश येईल. मंगळवार-बुधवार घरासंबंधी व्यवहार करण्याला ठीक आहे. कंत्राटदार व वहातुकीच्या धंद्यातील लोकांना भरघोस धनलाभ होईल. भागीदाराकडून मदत होईल. विद्याभ्यासात यश. संततीकडून लाभ. गुरुवार-शुक्रवार सार्वजनिक कामात यश. ता. १३ नंतर सरकारी कामे करावी. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्यांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १६।१७. मनस्वास्थ्य राहण्याकरता शंकराच्या पिंडीला दररोज १ बिल्वदळ वहावे.

**वृषभ** : या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला सौख्यदायक आहे. अकरावा रवी (ता. १३ नंतर बारावा), पहिला मंगळ, बारावे बुध-शुक-शनी व्ययात, गुरु सहावा व राहू दशमात असे सर्वग्रह शुभाशुभ स्थानात आहेत. राजयोगकारक ग्रह बुध-शुक्र-शनी व्ययस्थानात रवोबरोबर आहेत. अमाप धनलाभ होईल. भागीदार मदतीला धावून येतील. हा अनुभव ता. ११।१२।१३ ला येईल. मंगळवारी या कामानिमित्त प्रवास घडेल. चंद्राचे भ्रमण १।२।३।४ या स्थानातून आहे हे चांगलेच आहे. साहित्यिकांना व कलावंतांना सबंध आठवडा चांगला आहे. औषधांचा व्यापार करणारांना आणि कारखानदारांना सरकारी अडचणी निर्माण होतील. सुखहानी होईल. घराबद्दलच्या भानगडी विकोपाला जातील. गुरु या सर्व अडचणीतून सुखरूप बाहेर आणील. मानहानी होऊ देणार नाही. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे न, य, व, ब, आ, ई, उ ओ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ११।१२।१३

**मिथुन** : या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशीला सौख्यदायक आहे. रवी दहावा (१३ नंतर अकरावा), मंगळ बारावा, बुध-शुक्र-शनी अकरावे, गुरु पाचवा आणि राहू नववा असे सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. शत्रूनाश होईल. अचानक धनलाभ होईल. भावंडाकडून त्रास होईल. विद्येत यश येईल. सरकारी कामात संपूर्ण यश येईल. चंद्राचे भ्रमण १।२।३ या घरातून आहे ते चांगले आहे. ता. १६।१७ मानसिक त्रास जाणवेल. प्रवासात त्रास होईल. स्वभावात बेफिकीरपणा

येईल. ता. १४।१५ धनलाभ चांगलाच होईल. कमिशन एजंटचा धंदा करणारे व स्थावराचे व्यवहार करणारे (घर-जमीन वगैरे) यांना चांगला नफा होईल. भागीदारांकडून व पत्नीकडून सर्व व्यवहारात मदत होईल. मित्राबरोबर केलेल्या व्यवहारात ता. १६।१७ फसगत होण्याचा योग आहे. गुरुवार-शुक्रवार शक्यतर कामे पुढे ढकलावी. ज्या व्यक्तीची अगर संस्थाची नावे क, प, द, ध, च, फ, ह्न, ज्ञ, भ, घ, थ, छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. बाकी सर्व आठवडा चागला आहे

कर्क : या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला नाशकारक आहे. नववा रवी (१३ नतर दहावा), अकरावा मंगळ, दहावे बुध-शुक्र-शनी, चौथा गुरु आणि आठवा राहू असे मगळ-गुरु खेरीज सर्व ग्रह अशुभयोगात आहेत. धंद्यात अत्यंत हानी. धनहानी-मानहानी. धद्याच्या जागेबद्दल सुद्धा प्रश्न उत्पन्न होईल. चद्राचे भ्रमण १२।१।२ या घरातून आहे. ता. ११।१२।१३ ला अनेक आर्थिक अडचणी निर्माण होतील. शरीरस्वास्थ्य बिघडण्याचा योग आहे. मंगळवार-बुधवार थोडेसे बरे जातील. सरकारी कामात अपयश. वकील लोकांना फौजदारी खटल्यात यश मिळेल. इंडिकेटचा जोर एकाएकी फार वाढेल. प्रेमाच्या जाळ्यात सापडलेल्या पुरुषांची फसवणूक होईल. विशेषतः हा अनुभव ता. १६।१७ ला येईल. गुरुवारचा उपवास करणे म्हणजे पूर्ण अध.पात टळेल. ज, स, ख, ह, ड, ग, श, म, ट, ठ, ह्या अक्षरानी ज्या व्यक्तीची अगर संस्थाची नावे .सुरू असतील त्यानाही वरील-प्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १४।१५

सिह : या सप्ताहातील ग्रहमान सिह राशीला प्राप्ती घडवून आणणारे आहे. आठवा रवी (१३ तारखेनतर नववा), मंगळ दहावा, बुध-शुक्र-शनी नववे, तिसरा गुरू आणि सातवा राहू असे सर्व ग्रह शुभ फल देणारे आहेत. फक्त सातवा राहू मनस्ताप भयंकर देईल. विद्येत यश, सततीचा उत्कर्ष. भागीदार व पत्नीकडून सहकार्य. ता. १३ नतर सरकारी कामात संपूर्ण यश. चंद्राचे भ्रमण ११।१२।१३ या घरातून आहे. रविवार-सोमवार अचानक धनलाभाला चागले आहेत. फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणाराला अतोनात फायदा होईल. सार्वजनिक कार्यात यश येईल. स्वत.ची सरकारी कामे करवून घेण्यास काळ चांगला. वकीलांना खूप पैसा मिळेल. घर बांधण्याला काळ अत्यत चांगला आहे. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे ग, श, म, ट, आणि ठ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा १४।१५।१६

कन्या : या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला धनलाभकारक आहे. रवी सातवा (१३ नतर आठवा), मंगळ नववा, बुध-शुक्र-शनी आठवे, गुरू दुसरा व राहू सहावा असे सर्व ग्रह अचानक धनलाभ करून देणारे आहेत. चद्राचे भ्रमण १०।११।१२ या घरातून आहे ते चांगले आहे. ११।१२ चा गुरुचंद्र योग धनलाभ घडवून आणील. व्यापारात फायदा होईल. विद्येत अपयश, सततीकडून त्रास. वडील भावंडांकडून व मित्रांकडून मदत होईल. घरासबंधी व्यवहार नीट पार

चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

पडतील. सरकारी कामात दिरगाई होईल. स्वभावात हेकटपणा येईल. राग अनावर होईल. त्यावर उपाय १०८ गायत्री जप करावा. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे क, प, द ध, च फ, झ, ज्ञ, भ, घ, थ, छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणच फळे मिळतील. शुभ तारखा १२।१३।१४।१५

तूळ : या सप्ताहातील ग्रहमान तूळ राशीला यशदायक आहे सहावा रवी (ता. १३ नंतर सातवा), मंगळ आठवा, बुध-शुक्र शनी सातवे, गुरू पहिला आणि राहू पाचवा असे सर्वग्रह शुभफलदायी आहेत. सरकारी कामात यश येईल. चद्राचे भ्रमण ९।१०।११ व्या घरातून आहे ते चांगले आहे ता. ११।१२ ला अचानक धनलाभ व मानसन्मान मिळेल. विद्येत विशेषत: शास्त्रीय विषयात यशप्राप्ती होईल. भागीदाराकडून आणि पत्नीकडून प्रत्येक बाबतीत मदत होईल. घरासंबंधी असलेले काम उरकून घ्यावे. प्रवासात फायदा होईल. इंडिकेटचे काम करणारांना पाठिंबा मिळेल. प्रेमाच्या बाबतीत पुरुषाचे बाबतीत घोटाळे होतील. वागणुकीत चक्रमपणा येईल. राजकीय प्रचारात यश मिळेल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ११।१२।१३।१४

वृश्चिक : या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला सौख्यदायक आहे. रवी पाचवा (१३ नतर सहावा), मगळ सातवा, बुध-शुक्र-शनी सहावे, गरू बारावा व राहू चवथा असे गुरूशिवाय सर्वग्रह शुभफलदायी आहेत. अध्यात्मविद्येत प्रगती होईल. नाटक-कलाकाराना रंगभूमीवर येण्यास शुभयोग आहे. पत्नीकडून थोडासा त्रास होईल. शत्रूनाश होईल. थोडासा घराबद्दल व राहण्याच्या वास्तूबद्दल वाद निर्माण होईल. चद्राचे भ्रमण ८।९।१० व्या घरातून आहे. ११।१२ तारखेला अचानक धनलाभ होईल १४।१५ प्रवास योग आहे त्यात फायदा होईल. फौजदारी कामे करणाऱ्या वकिलाना अमाप पैसा मिळेल. चोरट्या व्यवहाराचे गुन्हे वाढतील. ग्रंथप्रकाशनाच्या धंद्याला दिवस त्रासदायक आहेत. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे न, य, व, ब, आ, इ, ऊ, ओ ह्या अक्षरानी सुरू आहेत त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ११।१२।१४।१५

धन : या सप्ताहातील ग्रहमान धन राशीला यशदायी आहे. चौथा रवी (१३ नंतर पाचवा), सहावा मंगळ, पाचवे बुध शुक्र-शनी, अकरावा गुरू व तिसरा राहू असे सर्वच ग्रह शुभफलदायी आहेत. हातून पराक्रम घडेल. भावडाशी मतभेद होईल. सरकारी कामात यश मिळेल. नोकरीत प्रमोशन मिळण्याचा योग आहे. विद्येत यश प्राप्त होईल. मित्रांकडून मदत होईल. चंद्राचे भ्रमण ७।८।९ व्या घरातून आहे ते चांगले आहे. ११।१२।१३ विवाहाबद्दल घटना घडतील. आपोआप मागणी येईल. १४।१५ अचानक धनलाभ होईल. १६।१७ कायम स्वरूपाच्या काही शुभ घटना घडतील. सरकारी कामात यश प्राप्त होईल. कलाकारांना आपली कला लोकांपुढे मांडण्याचे योग येतील. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे

क, प, द, ध, च, फ, क्ष, ज्ञ, भ, घ, थ आणि छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ११।१२।१३।१६।१७

मकर : या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला त्रासदायक आहे. तिसरा रवी (१३ नंतर चौथा), पाचवा मंगळ, बुध-शुक्र-शनी चौथे, गुरू दहावा व राहू दुसरा असे मंगळाखेरीज सर्व ग्रह अशुभ स्थानात आहेत. धननाश. चतुर्थातील ग्रह मकर राशीचे राजयोगकारक ग्रह आहेत. त्याची फळे दोन टोकाची मिळतील. ३६ च्या पुढे वय असलेल्या व्यक्तीच्या सर्व आशा–आकांक्षा पुऱ्या होतील. बाकीच्यांना नोकरी, धंदा, शिक्षण, सुख यात ता. १३ पर्यंत यश येईल. नतर त्रास होईल. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून होत आहे. ता. ११।१२ शुभवार्ता समजेल. योजलेल्या कामात यश येईल. फक्त दशमातील गुरू या सर्व अडचणीतून सोडवील. १६।१७ ला मनःस्ताप वाढण्याजोग्या घटना घडतील. भागीदारांशी भांडण होईल. ज्या व्यक्तीची अगर संस्थांची नावे ज, स, ख, ह, ड ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ११।१२।१३

कुंभ : या सप्ताहातील ग्रहमान कुंभ राशीला भोगदायक आहे. दुसरा रवी (१३ नतर तिसरा), चौथा मंगळ, बुध-शुक्र-शनी तिसरे, गुरु नववा व पहिला राहू असे सर्व ग्रह शुभ स्थानात आहेत. धनलाभ होईल. ११।१२ ला ह्या योग येईल. विद्येत यश येईल. मान-सन्मान मिळेल. मशिनरी, औषधे व जमिनीच्या व्यवहारात धनलाभ होईल. थोडासा स्वभाव तुसडा होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. १४।१५ सासुरवाडीची मंडळी भेटतील. १६।१७ तारखाना मनाला उद्विग्नसा येईल. सहकारी वाईट वागतील. दररोज शंकराचे दर्शन घ्यावे. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे ग, श, म, ट आणि ठ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ ता. ११।१२।१३

मीन : या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला त्रासदायक आहे. पहिला रवी (ता. १३ नंतर दुसरा), तिसरा मंगळ बुध-शुक्र-शनी दुसरे, आठवा गुरू आणि बारावा राहू असे मंगळाखेरीज सर्व ग्रह अशुभ स्थानात आहेत. धननाश, वाचा शुद्धी नसणे. उद्योगधंदा चांगला चालेल. ११।१२।१३ हे दिवस सरकारी कामाला बरे आहेत. या दिवशी विद्येत यश मिळेल. मानहानी होईल. प्रत्येक कामात धनाभावामुळे प्रगती होणार नाही. हातातली कामे अर्धवट सोडावी लागतील. मित्राकडून थोडीफार मदत होईल. भावडाशी मतभेद होईल. अनेकाकडून फक्त वचने मिळतील. चद्राचे भ्रमण ४।५।६ या घरातून आहे. ११।१२।१३ तारखाना येणारे पैसे अचानक येतील. १६।१७ तारखाना मनस्ताप फार होईल. शत्रूचा त्रास होईल. संतती नीट वागणार नाही. भागीदार व पत्नीकडून नुकसान होईल. ज्या व्यक्तीची नावे क, प, द, ध, क्ष, च, फ, क्ष ज्ञ, भ, घ, थ, छ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ ता. ११।१२।१३ □ □ ■

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise Regd. No. M–H 6




" तुम्हाला माहीत आहे, ' आमच्याकडे एकही एकर जमीन नाही ' असं म्हणणं हा दखलपात्र गुन्हा आहे ? ' आमच्याकडे एकही हेक्टर जमीन नाही ' असं म्हटलं पाहिजे तुम्ही ..."